लघु-अभ्यासक्रम / SHORT COURSE

# परिचारिकांसाठी मराठी



## COMMUNICATIVE MARATHI FOR NURSES



Gauri Brahme
Aditi Gupte
Suhas Limaye

गौरी ब्रह्मे / GAURI BRAHME
अदिती गुप्ते / ADITI GUPTE
सुहास लिमये / SUHAS LIMAYE

Communicative Marathi for Nurses

# परिचारिकांसाठी मराठी

## लघु-अभ्यासक्रम / SHORT COURSE

**संपादक / EDITORS**
मेहेर भूत / MEHER BHOOT
विभा सुराणा / VIBHA SURANA
आनन्द काटीकर / ANAND KATIKAR

संकल्पना आणि निर्मिती / **CONCEPT & PRODUCTION**

मुंबई विद्यापीठ
**UNIVERSITY OF MUMBAI**

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्था, मुंबई
**RAJYA MARATHI VIKAS SANSTHA, MUMBAI**

**ISBN No.: 978-93-5346-828-6**

**FIRST EDITION, 2019**
**पहिली आवृत्ती, २०१९**

- **प्रकल्प समन्वयक / PROJECT CO-ORDINATOR**
  विभा सुराणा / VIBHA SURANA

- **लेखक / AUTHORS**
  गौरी ब्रह्मे / GAURI BRAHME
  अदिती गुप्ते / ADITI GUPTE
  सुहास लिमये / SUHAS LIMAYE

- **संपादक / EDITORS**
  मेहेर भूत / MEHER BHOOT
  विभा सुराणा / VIBHA SURANA
  आनन्द काटीकर / ANAND KATIKAR

- **संपादकीय मंडळ / EDITORIAL TEAM**
  माधुरी पुरंदरे / MADHURI PURANDARE
  ज्योत्स्ना भिडे / JYOTSNA BHIDE
  सोनाली गुजर / SONALEE GUJAR

- **कला, मांडणी, चित्रे / छायाचित्रे / अक्षर जुळणी**
  **LAYOUT DESIGN / PHOTOS / TYPESETTING**
  नागेश सिरसाल / NAGESH SIRSAL
  सुभाष गोपाळे / SUBHASH GOPALE


- **प्रकाशक / PUBLISHER**
  मुंबई विद्यापीठ / UNIVERSITY OF MUMBAI,
  राज्य मराठी विकास संस्था, मुंबई / RAJYA MARATHI VIKAS SANSTHA, MUMBAI

- **ई-पत्ता /E-MAIL**
  rmvs_mumbai@yahoo.com

- **संकेतस्थळ / WEBSITE ADDRESS**
  https://www.learn-marathi.com
  www.rmvs.maharashtra.gov.in

**TEXT- CUM WORKBOOK AND 1 FREE DVD ₹ 500**

# प्रस्तावना | Preface

Nursing has always been considered as one of the noble professions and even today is much sought after, especially in Mumbai. A large number of nurses working in various hospitals in Maharashtra, especially in Mumbai, hail mostly from South India, viz. Kerala and Tamil Nadu. The regional language Marathi poses a major barrier for them, especially when dealing with patients in government hospitals. परिचारिकांसाठी मराठी is a Marathi text-cum-workbook specially designed for such nurses. It addresses a target group of non-native nurses, who wish to learn Marathi as beginners, particularly as adult learners, with or without any prior, little/random knowledge of Marathi. Whether the learners have some prior acquaintance with the Devnagari script or not, they can start learning the script as well as reading and writing in Marathi.

A first of its kind, this book has been prepared using an integrated communicative approach. It dedicates itself to serve the sole purpose of teaching Marathi to the non-native nurses and for them to be able to communicate in Marathi with the native patients, their relatives, doctors, co-workers and the hospital management. It focuses on understanding the problems of patients and giving them the right guidance and instructions in Marathi.

The book consists of ten chapters, each with units such as communicative texts in authentic situations, pattern drills, grammar exercises, learning games, cartoons, answer keys, audio visual components and an overview of the vocabulary along with its meanings in English. At the end of each chapter there is a section of subject related information highlighting the specialised vocabulary needed by the nurses for their routine chores, for e.g. contagious diseases, health and nutrition etc. In addition to this, a comprehensive glossary from English to Marathi is provided at the end. A final test has been included at the end to test the written and oral language skills of the learners. Special efforts have been taken to integrate the communicative approach of learning so that the learners will be able to communicate in a non-native environment.

Though the book is meant for classroom teaching of approximately 60 teaching hours, self-learners too can make use of the book with the help of the vocabulary given with the meanings in English and a glossary at the end. The course instructor may require 6 hours for each chapter. Regular dictation, additional exercises, tests and extra inputs may be used as per the target group. The course instructors are expected to use the audio-visual material, provided as free dvd with the book. Keeping in mind the aim of the target learners, which is basically to communicate, the instructor should stress on enhancing the speaking, listening and understanding skills of the learners. The writing skills are not so important for this target group. Hence the instructors are advised to undergo rigorous teachers' training for the integrated communicative approach and may contact the project co-ordinator / editors / Rajya Marathi Vikas Sanstha for the same.

*'Communicative Marathi for Nurses'* has been designed after an extensive research and a survey carried out in various government and private hospitals in Mumbai. The content and preparation of material of the book is based on the data collected from these surveys. It is created solely for teaching communicative Marathi to the nurses and does not claim to impart medical knowhow. The book aims to offer general information required by nurses for the daily routine and refrains from mention of specific ailments and illnesses.

This book has been prepared under the aegis of the project Marathi Language Teaching (MLT) spearheaded by Prof. Dr. Vibha Surana, Head of the Department of German, University of Mumbai and graciously funded by Rajya Marathi Vikas Sanstha. The innovative project MLT strives to complete six levels of courses for teaching communicative Marathi to non-native speakers and

four short-term courses for teaching Marathi to (i) non-native bank employees, (ii) government officials, (iii) nurses and (iv) rickshaw- and taxi-drivers.

We are indebted to the editorial team of Madhuri Purandhare, Jyotsna Bhide and Sonalee Gujar for reviewing this book and their invaluable inputs. We thank Girissha Tilak, Kruttika Bhosale, Shrikant Pathak, Sammati Balgi, Mihir Kulkarni, Gurunath Kalamkar, Gurudutt Kamath, Saurabh Bhosale, Manish Bawker, Disha Gudulkar for their sustained support and assistance. We are grateful to Mr. Charuhas Pandit and Mr. Prabhakar Wadekar for the copyright permission of Chintoo cartoon strips. We also thank Mrs. Sunita Deshmukh, senior nurse of Dr. Bedekar Hospital for Women and Children and the nurses Harsha Shinde, Namrata Malusare, Shubhangi Gogavle, Vandana Jadhav and Varsha Gawde for their photos and Mr. Sachin Suresh and Mr. Rajesh Wadekar for the audio recording and the making of the DVD respectively.

We appreciate and thank all those who have contributed in the making of this book.

Gauri Brahme, Aditi Gupte, & Suhas Limaye
2019

# अनुक्रमणिका


| पाठ | विषय | संवादकौशल्य | व्याकरण | शब्दसंपदा | परिस्थिती | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ओळख | अभिवादन,<br>नाव-गाव आणि स्वतःबद्दल सांगणे,<br>व्यवसाय सांगणे व इतरांना त्याबद्दल विचारणे,<br>मराठी वर्णमाला<br>सोपे मराठी शब्द | स्वर-स्वरादी<br>व्यंजन<br>स्वरचिन्हे<br>शब्द<br>जोडाक्षरे<br>शब्द<br>विशेष उच्चार<br>वाक्ये<br>प्रश्नशब्द | काय, कोणता, कुठे, कोण, कसा, कशी, कुठले, कुठल्या, अच्छा, टाटा, ठीक आहे, चालेल, उद्या भेटू, नमस्कार, व्यवसाय<br>अंक : १-२० | व्यवसायात कोण कोण आहेत?<br>परिचारिका, सिस्टर, वॉर्डबॉय, डॉक्टर, फिझिओथेरपिस्ट, ऑपरेशन थिएटरमध्ये सहाय्यिका...<br>**महत्त्वाचे :** शरीराचे भाग व अवयव | ७ |
| २ | रुग्णालय | रुग्णालय आणि वॉर्डबद्दल<br>वेळ, दिवस व महिना | व्यक्तिवाचक सर्वनामे,<br>सामान्य वर्तमानकाळ : असणे, नसणे, आणणे, देणे,<br>क्रियाविशेषणे : वर, खाली, जवळ, उजवीकडे, डावीकडे | किती वाजले?<br>कोणता, कोणते, कोणती, कोणत्या, ठिकाणे,<br>अंक : २१-५०,<br>महिने आणि दिवस | रुग्णालयाचे विभाग : कान / नाक / घसा विभाग, बालरोग विभाग...<br>**महत्त्वाचे :** रुग्णालयाची रचना – एका परिचारिकेच्या नजरेतून | २४ |
| ३ | तुम्हाला काय होतंय? | दैनंदिन व्यवहार,<br>इच्छा व्यक्त करणे,<br>दिवसाच्या वेळा,<br>ऋतू | साधा आणि अपूर्ण वर्तमानकाळ<br>दर्शक सर्वनामे<br>नामे : लिंग<br>असणे : रीतिवर्तमानकाळ | केव्हा / कधी<br>हवंय, पाहिजे<br>कळतंय, पटतंय<br>वस्तूंची नावे,<br>आजार,<br>अंक : ५०-१०० | आरोग्याच्या समस्यांबद्दल बोलणे,<br>वेगवेगळ्या प्रकारच्या उपचारांसाठी गरज<br>**महत्त्वाचे :** आतले अवयव | ४६ |
| ४ | एक दिवस सूचनांचा | आज्ञा, सूचना, सल्ला,<br>विनंती, आभार,<br>परवानगी देणे / नाकारणे,<br>रंग | आज्ञार्थी, क्रियापदे व त्यांची नकारार्थी रूपे,<br>विशेषणे | कर, करा<br>करू नकोस, करू नका,<br>कृपया...<br>लवकर, सावकाश, हळू, जपून,<br>१०० च्या पुढील अंक | पेशंटच्या नातेवाइकांना,<br>सफाईकामगारांना,<br>सहकाऱ्यांना सूचना देणे<br>**महत्त्वाचे :** विविध सूचनाफलक वाचणे | ७० |
| ५ | आता तब्येत कशी आहे? | महत्त्वाची लक्षणे तपासणे व नोंद करणे, चिकित्सा, आढावा घेणे | षष्ठी विभक्ती,<br>अप्रत्ययी कर्म,<br>रीतिवाचक क्रियाविशेषण | प्रश्नशब्द,<br>चा, ची, चे, च्या,<br>अनेकदा, पटपट,<br>आपोआप, उगीच | माहितीपत्रके समजणे,<br>लक्षणांबद्दल चर्चा करणे<br>**महत्त्वाचे :** विविध व्यवसाय | ८६ |

| पाठ | विषय | संवादकौशल्य | व्याकरण | शब्दसंपदा | परिस्थिती | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|---|---|---|
| ६ | लक्षणे | भूतकाळातली गोष्ट, समस्या सांगणे, काय त्रास होत आहे ते सांगणे | असणे : होतो / होत नाही, सामान्य भूतकाळ 'होणे', कालवाचक क्रियाविशेषणे | नेहमी, सध्या, काल, दररोज, हल्ली, कधीतरी, कुपोषण | वेदना आणि उपाय **महत्त्वाचे :** पेशंटचे बेड कसे तयार करायचे? | १०१ |
| ७ | औषधे व उपचार पद्धती | औषधोपचार, आहाराबद्दलच्या सूचना, आहाराबद्दलची आवड-नावड | वर्तमानकाळ, भूतकाळ आणि नकारार्थी : असणे, द्वितीया संप्रदान चतुर्थी, परिमाण वाचक क्रियाविशेषण | फार, कमी, भरपूर, किंचित, अत्यंत, जरा, विविध खाद्यपदार्थ | औषधांची माहिती आणि नोंद, औषध कसे घ्यावे **महत्त्वाचे :** पौष्टिक आहार | १२० |
| ८ | चाचण्या व तपासण्या | इच्छा व्यक्त करणे, पत्र वाचणे, तपासणी व पूर्वतयारी, रिपोर्ट वाचणे | साधा भविष्यकाळ : येईन, जाईन, घेईन, गुणविशेषण संख्याविशेषण | बाजूला, मागे, वर, जवळ, लांब, मध्ये सुंदर, घाण... दहावा, चाळीसावा... | विविध तपासण्यांसाठी, ऑपरेशनपूर्व सूचना देणे **महत्त्वाचे :** संसर्गजन्य रोग | १३६ |
| ९ | अपघात आणि तातडीची सेवा | पेशंटचा रिपोर्ट लिहिणे, नातेवाईकांशी बोलणे, इतर परिचारिकांशी संवाद साधणे, कुटुंब | कालदर्शक क्रियाविशेषणे चतुर्थी विभक्ती सामान्य रूपे | आज, काल, उद्या, परवा. पूर्वी, हल्ली, आजकाल, ला आणि ना | दुसऱ्या नर्सवर काम सोपवणे, अपघाताचे वर्णन, नातेवाईकांना शांत करणे, पेशंटला धीर देणे **महत्त्वाचे :** ज्येष्ठ नागरिकांशी संवाद | १५५ |
| १० | स्वच्छता | स्वतःची आणि रुग्णालयातील स्वच्छता, काम करून घेणे | कालदर्शक क्रियाविशेषणे | आधी, नंतर, पुन्हा, लगेच पण, आणि, स्वच्छतेची साधने | स्वच्छतेचे महत्त्व, सफाईपत्रक **महत्त्वाचे :** पेशंटचे स्पंजिंग कसे करावे? सूचना देणे | १७४ |
| ११ | दृक्श्राव्य | | | | | १९१ |
| १२ | परीक्षा | | | | | १९७ |
| १३ | उत्तरे | | | | | २०७ |
| १४ | शब्दसंग्रह | | | | | २३४ |

# ओळख १






## चला, शिकू या :

- ✓ अभिवादन करणे
- ✓ आपले नाव-गाव आणि स्वतःबद्दल सांगणे आणि विचारणे
- ✓ व्यवसाय सांगणे व इतरांना त्याबद्दल विचारणे
- ✓ मराठी वर्णमाला आणि सोपे मराठी शब्द वाचणे आणि लिहिणे
- ✓ प्रश्नशब्द (काय, कुठून, कुठे, कशा, कोण)
- ✓ अंक : १-२०

# १ ओळख



- हाय, मी सुरेश शर्मा.
- मी भोपाळचा.
- मी डॉक्टर आहे.



- नमस्ते, मी लक्ष्मण शेटे.
- मी मुंबईचा.
- मी वॉर्डबॉय आहे.



- नमस्ते, मी संदीप माने.
- मी नागपूरचा.
- मी सफाईकामगार आहे.



- नमस्कार, मी चित्रा राजन.
- मी केरळची.
- मी परिचारिका (नर्स) आहे.



- नमस्कार, मी अनिता घोष.
- मी कोलकात्याची.
- मी मेट्रन आहे.



- हॅलो, मी रजनी.
- मी पुण्याची.
- मी स्वागतिका (रिसेप्शनिस्ट) आहे.

## १ आता तुमच्याबद्दल सांगू या.

| | | |
|---|---|---|
| तुमचं नाव काय? | चित्रा राजन | --------------------------- |
| तुम्ही कुठल्या? | केरळची | --------------------------- |
| तुम्ही काय करता? | मी परिचारिका आहे. | --------------------------- |

### १.१ वाचू या.

नमस्कार / नमस्ते / हॅलो / हाय

| | |
|---|---|
| तुमचं नाव काय? | माझं नाव --------- / मी --------- |
| तुम्ही कुठले / कुठल्या? | मी ----------- चा / ची. |
| तुम्ही कोणता व्यवसाय करता? | मी ----------- आहे. |

अच्छा / टाटा / उद्या भेटू / उद्या भेटू या

### १.२ रिकाम्या जागी पुढीलपैकी योग्य शब्द लिहू या.

अभिवादन : नमस्कार / -------------------- / ------------------- / --------------------

प्रश्न : ------------------------------------ उत्तर : --------------------------------------

प्रश्न : ------------------------------------ उत्तर : --------------------------------------

प्रश्न : ------------------------------------ उत्तर : --------------------------------------

निरोप घेणे : --------------- / टाटा / --------------- / ---------------

### १.३ ऐकू या आणि वाचू या.

स्वर :-

अ आ इ ई

उ ऊ ए ॲ ऐ

ओ ऑ औ

ऋ

स्वरादी उदा॰ :-

अं अः

व्यंजने :-

क ख ग घ ङ

च छ ज झ ञ

ट ठ ड ढ ण

त थ द ध न

प फ ब भ म

य र ल व

श ष स

ह ळ क्ष ज्ञ

## १.४ ऐकू या आणि वाचू या.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| अक्षर | सण | पटकन | एकदम | सरळ | घर |
| बडबड | फणस | लक्ष | पळ | जग | मन |

अक्षय, घर बघ. अनय, फणस उचल. पलक, पटकन पळ.

## १.५ स्वरचिन्हे.

| | | | |
|---|---|---|---|
| क् + अ = क | क् + आ = का | क् + इ = कि | क् + ई = की |
| क् + उ = कु | क् + ऊ = कू | क् + ए = के | क् + ऐ = कै |
| क् + ओ = को | क् + औ = कौ | क् + अॅ = कॅ | क् + ऑ = कॉ |
| क् + ऋ = कृ | क् + अं = कं | क् + अः = कः | |

## १.६ स्वरचिन्हांचा वापर शिकू या.

| | | | |
|---|---|---|---|
| ‘क’ ला काना | का | ‘क’ ला काना आणि एक मात्रा | को |
| ‘क’ ला पहिली वेलांटी | ऱ्हस्व कि | ‘क’ ला काना आणि दोन मात्रा | कौ |
| ‘क’ ला दुसरी वेलांटी | दीर्घ की | ‘क’ वर अर्धचंद्र | कॅ |
| ‘क’ ला पहिला उकार | ऱ्हस्व कु | ‘क’ ला काना आणि वर अर्धचंद्र | कॉ |
| ‘क’ ला दुसरा उकार | दीर्घ कू | ‘क’ ला ऋकार | कृ |
| ‘क’ वर एक मात्रा | के | ‘क’ वर अनुस्वार | कं |
| ‘क’ वर दोन मात्रा | कै | ‘क’ पुढे विसर्ग | कः |

## १.७ वाचू या.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| अ | | क् + अ | क | कप |
| आ | ा | छ् + ा | छा | छान |
| इ | ि | द् + ि | दि | दिवस |
| ई | ी | ह् + ी | ही | बहीण |
| उ | ु | क् + ु | कु | कुलूप |
| ऊ | ू | फ् + ू | फू | फूल |
| ए | े | ख् + े | खे | खेळ |
| अॅ | ॅ | ब् + ॅ | बॅ | बॅग |
| ऐ | ै | प् + ै | पै | पैसे |
| ओ | ो | म् + ो | मो | मोदक |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ऑ | ॉ | ह् + ॉ | हॉ | हॉल |
| औ | ौ | ह् + ौ | हौ | हौस |
| अं | ं | प् + ं | पं | पंख |
| अः | ः | त् + ः | तः | अंतःकरण |
| ऋ | ृ | न् + ृ | नृ | नृत्य |

## १.८ वाचू या.

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| क | का | कि | की | कु | कू | के | कॅ | कै | को | कॉ | कौ | कं | कः |
| ख | खा | खि | खी | खु | खू | खे | खॅ | खै | खो | खॉ | खौ | खं | खः |
| ग | गा | गि | गी | गु | गू | गे | गॅ | गै | गो | गॉ | गौ | गं | गः |
| घ | घा | घि | घी | घु | घू | घे | घॅ | घै | घो | घॉ | घौ | घं | घः |
| च | चा | चि | ची | चु | चू | चे | चॅ | चै | चो | चॉ | चौ | चं | चः |
| छ | छा | छि | छी | छु | छू | छे | छॅ | छै | छो | छॉ | छौ | छं | छः |
| ज | जा | जि | जी | जु | जू | जे | जॅ | जै | जो | जॉ | जौ | जं | जः |
| झ | झा | झि | झी | झु | झू | झे | झॅ | झै | झो | झॉ | झौ | झं | झः |
| ट | टा | टि | टी | टु | टू | टे | टॅ | टै | टो | टॉ | टौ | टं | टः |
| ठ | ठा | ठि | ठी | ठु | ठू | ठे | ठॅ | ठै | ठो | ठॉ | ठौ | ठं | ठः |
| ड | डा | डि | डी | डु | डू | डे | डॅ | डै | डो | डॉ | डौ | डं | डः |
| ढ | ढा | ढि | ढी | ढु | ढू | ढे | ढॅ | ढै | ढो | ढॉ | ढौ | ढं | ढः |
| ण | णा | णि | णी | णु | णू | णे | णॅ | णै | णो | णॉ | णौ | णं | णः |
| त | ता | ति | ती | तु | तू | ते | तॅ | तै | तो | तॉ | तौ | तं | तः |
| थ | था | थि | थी | थु | थू | थे | थॅ | थै | थो | थॉ | थौ | थं | थः |
| द | दा | दि | दी | दु | दू | दे | दॅ | दै | दो | दॉ | दौ | दं | दः |
| ध | धा | धि | धी | धु | धू | धे | धॅ | धै | धो | धॉ | धौ | धं | धः |
| न | ना | नि | नी | नु | नू | ने | नॅ | नै | नो | नॉ | नौ | नं | नः |
| प | पा | पि | पी | पु | पू | पे | पॅ | पै | पो | पॉ | पौ | पं | पः |
| फ | फा | फि | फी | फु | फू | फे | फॅ | फै | फो | फॉ | फौ | फं | फः |
| ब | बा | बि | बी | बु | बू | बे | बॅ | बै | बो | बॉ | बौ | बं | बः |
| भ | भा | भि | भी | भु | भू | भे | भॅ | भै | भो | भॉ | भौ | भं | भः |
| म | मा | मि | मी | मु | मू | मे | मॅ | मै | मो | मॉ | मौ | मं | मः |

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| य | या | यि | यी | यु | यू | ये | यॅ | यै | यो | यॉ | यौ | यं | यः |
| र | रा | रि | री | रु | रू | रे | रॅ | रै | रो | रॉ | रौ | रं | रः |
| ल | ला | लि | ली | लु | लू | ले | लॅ | लै | लो | लॉ | लौ | लं | लः |
| व | वा | वि | वी | वु | वू | वे | वॅ | वै | वो | वॉ | वौ | वं | वः |
| श | शा | शि | शी | शु | शू | शे | शॅ | शै | शो | शॉ | शौ | शं | शः |
| ष | षा | षि | षी | षु | षू | षे | षॅ | षै | षो | षॉ | षौ | षं | षः |
| स | सा | सि | सी | सु | सू | से | सॅ | सै | सो | सॉ | सौ | सं | सः |
| ह | हा | हि | ही | हु | हू | हे | हॅ | है | हो | हॉ | हौ | हं | हः |
| ळ | ळा | ळि | ळी | ळु | ळू | ळे | ळॅ | ळै | ळो | ळॉ | ळौ | ळं | ळः |
| क्ष | क्षा | क्षि | क्षी | क्षु | क्षू | क्षे | क्षॅ | क्षै | क्षो | क्षॉ | क्षौ | क्षं | क्षः |
| ज्ञ | ज्ञा | ज्ञि | ज्ञी | ज्ञु | ज्ञू | ज्ञे | ज्ञॅ | ज्ञै | ज्ञो | ज्ञॉ | ज्ञौ | ज्ञं | ज्ञः |

## २ वाचू या.

| तो | ती | ते |
|---|---|---|
| कप – cup | कळ – pain | पाणी – water |
| ताप – fever | गोळी – tablet, pill | |
| हात – hand | बाटली – bottle | |
| आजार – illness | | |
| आराम – rest | | |
| कागद – paper | | |
| वास – smell | | |

### २.१ खालील चित्रे पाहून शब्द पूर्ण करा.



१. गो-----



२. -----त



३. क-----



४. -----णी



५. -----ली

## ३ अवयव वाचू या

| | | |
|---|---|---|
| तो डोळा, ते डोळे<br>eye, -s | ती जीभ, त्या जिभा<br>tongue, -s | ते कपाळ, ती कपाळे / कपाळं<br>forehead, -s |
| तो कान, ते कान<br>ear, -s | ती हनुवटी, त्या हनुवट्या<br>chin, -s | ते डोके / डोकं, ती डोकी<br>head, -s |
| तो गाल, ते गाल<br>cheek, -s | ती हिरडी, त्या हिरड्या<br>gum, -s | ते नाक, ती नाके / नाकं<br>nose, -s |
| तो ओठ, ते ओठ<br>lip, -s | ती मान, त्या माना<br>neck, -s | ते तोंड, ती तोंडे / तोंडं<br>mouth, -s |
| तो दात, ते दात<br>tooth, teeth | ती कंबर, त्या कंबरा<br>waist, -s | ते पोट, ती पोटे / पोटं<br>stomach, -s |
| तो केस, ते केस<br>hair | ती पाठ, त्या पाठी<br>back, -s | ते ढुंगण, ती ढुंगणे / ढुंगणं<br>butt, -s |
| तो घसा, ते घसे<br>(internal) throat, -s | ती छाती, -<br>chest, -s | ते ढोपर, ती ढोपरे / ढोपरं<br>knee, -s |
| तो गळा, ते गळे<br>(external) throat, -s | ती योनी, -<br>vagina, -s | ते कोपर, ती कोपरे / कोपरं<br>elbow, -s |
| तो खांदा, ते खांदे<br>shoulder, -s | ती मांडी, त्या मांड्या<br>thigh, -s | ते मनगट, ती मनगटे / मनगटं<br>wrist, -s |
| तो स्तन, ते-<br>breast, -s | ती पोटरी, त्या पोटऱ्या<br>calf, calves | ते बोट, ती बोटे / बोटं<br>finger, -s |
| तो दंड, ते दंड<br>upper arm, -s | | ते नख, ती नखे / नखं<br>nail, -s |
| तो हात, ते हात<br>hand, -s | | ते पाऊल, ती पावले / पावलं<br>foot, feet |
| तो तळहात, -<br>palm, -s | | |
| तो गुडघा, ते गुडघे<br>knee, -s | | |
| तो पाय, ते पाय<br>leg, -s | | |

## ३.१ अवयव ओळखू या आणि लिहू या.




खांदा, मांडी, बोट, हात, गुडघा, कोपर, पाऊल, पंजा, कान, डोकं, पोट.

### ३.२ क्रिया : अवयव?

१. पाहणे ..................
२. ऐकणे ..................
३. स्पर्श करणे ..................
४. चावणे ..................
५. चालणे ..................
६. लिहिणे ..................
७. श्वास घेणे ..................
८. खाणे ..................

कान नाक हात तोंड
पाय डोळे दात बोट

### ३.३ कोणता आजार कोणत्या अवयवाला होतो?

१. फ्रॅक्चर ..................
२. किडणे ..................
३. पडदा फाटणे ..................
४. घोळणा वाहणे ..................
५. फुगणे ..................

दात नाक कान पोट हात

## ४ वाचू या.



तुमचे नाव काय? – माझे नाव अचला.
तुम्ही कशा आहात? – मी छान / मजेत आहे.
तुम्ही कुठल्या? – मी नागपूरची.
तुम्ही कुठे राहता? – मुंबईमध्ये / मुंबईत.
तुम्ही काय काम करता? – मी परिचारिका आहे.

### ४.१ मराठीतील प्रश्नशब्द 'क' च्या बाराखडीतील अक्षराने सुरू होतात. वरील संवाद वाचून त्यातील प्रश्नशब्द अधोरेखित करा.

### ४.२ जोड्या जुळवू या.

| प्रश्न | उत्तर |
|---|---|
| १. काय? | अ. ठीक, मस्त, छान, बरी |
| २. कशा? | ब. नाव, गाव, वस्तू |
| ३. कुठल्या? | क. पोलीस, परिचारक, शिक्षिका, नर्स |
| ४. कुठे? | ड. नागपूरची, पुण्याची, कोचीची, दिल्लीची |
| ५. कोणता व्यवसाय? | इ. मुंबई, जमशेदपूर, चेन्नईमध्ये |

१. .................. २. .................. ३. .................. ४. .................. ५. ..................



### ४.३ विद्यार्थ्यांचे दोन दोनचे गट करून फोटोतील व्यक्तीची वरील प्रश्नांच्या आधारे मुलाखत घ्या व त्या उत्तरांची वर्गात चर्चा करा.

## ५ चला, वाचू आणि ऐकू या.

परिचारिका १ : नमस्कार, माझं नाव ललिता शेट्टी. तुमचं नाव काय?

परिचारिका २ : नमस्ते, माझं नाव छाया जाधव.

परिचारिका १ : अच्छा. तुम्ही कुठे राहता?

परिचारिका २ : मी ठाण्यात राहते. तुम्ही कुठल्या?

परिचारिका १ : मी कोचीची. मी कल्याणला राहते.

परिचारिका २ : अच्छा. मग तुम्ही इथे काय करता?

परिचारिका १ : मी परिचारिका आहे.

परिचारिका २ : ओह! मी पण नर्स आहे. चला, नंतर भेटू.

परिचारिका १ : चालेल. टाटा.

## ५.१ वरील संवाद वाचून माहिती लिहू या.

| व्यक्ती १ | व्यक्ती २ |
|---|---|
| नाव : ............ | नाव : ............ |
| कुठल्या? : ............ | कुठल्या? : ............ |
| व्यवसाय : ............ | व्यवसाय : ............ |

**मी कल्याणचा/ची**

| तुम्ही कुठ + ले? | तुम्ही कुठ + ल्या? |
|---|---|
| मी ............ चा. | मी ............ ची. |

## ६ वाचू या.

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | एक | ६ | सहा | ११ | अकरा | १६ | सोळा |
| २ | दोन | ७ | सात | १२ | बारा | १७ | सतरा |
| ३ | तीन | ८ | आठ | १३ | तेरा | १८ | अठरा |
| ४ | चार | ९ | नऊ | १४ | चौदा | १९ | एकोणीस |
| ५ | पाच | १० | दहा | १५ | पंधरा | २० | वीस |

## ६.१ खालील शब्द अंकात लिहू या.

शून्य : ____, एक : १, दोन : ____, तीन : ___, चार : ____, पाच :___,

सहा : ___, सात : __, आठ : ____, नऊ : ____, दहा : ___, अकरा :___, बारा : १२.

## ६.२ रिकाम्या जागी अंक भरू या.

क) १, २, ३, ___, ५, ___, ७, ___, ९, ___, ११, ___, १३, ___, १५, १६, ___, १८, ___, ___.

ख) खेळू या :

- शिक्षकाने फळ्यावर एक ते वीस अंक लिहावेत व एका विद्यार्थिनीला समोर यायला सांगावे. शिक्षक एक संख्या सांगतील, विद्यार्थिनी योग्य संख्येभोवती गोल करेल.
- शिक्षक – विद्यार्थिनी : आपण किती नंबरच्या वॉर्डमध्ये काम करता?

## ७ जोडाक्षरे शिकू या.

च् + च = कच्चा
क् + क = पक्का
ग् + ग = रग्गड
ख् + ख = लख्ख
ज् + ज = सज्ज
ठ् + ठ = मठ्ठ
ट् + ट = अट्टल

### ७.१ याच प्रमाणे आता आपण लिहू या.

| उदा. अक्कल : क् + क |
|---|
| अत्तर : .............................. + .............................. |
| चप्पल : .............................. + .............................. |
| अव्वल : .............................. + .............................. |
| अय्या : .............................. + .............................. |
| सल्ला : .............................. + .............................. |

### ७.२ वाचू या.

त् + य = त्य सत्य
ळ् + य = ळ्य पोळ्या
ड् + य = ड्य घड्याळ
स् + ट = स्ट पोस्ट
द् + य = द्य विद्या
म् + ह = म्ह म्हण

### ७.३ याच प्रमाणे आता आपण लिहू या.

| क् + य = वाक्य |
|---|
| .............................. + .............................. = डॉक्टर |
| .............................. + .............................. = स्वर |
| .............................. + .............................. = पुस्तक |
| .............................. + .............................. = शब्द |
| .............................. + .............................. = रस्ता |

### ७.४ वाचू या.

| | | | |
|---|---|---|---|
| क् + र = क्र | क्रम | त् + र = त्र | मित्र |
| म् + र = म्र | नम्र | र् + ष् = र्ष | वर्ष |
| ट् + र = ट्र | ट्रक | र् + य = र्य | सूर्य |
| ड् + र = ड्र | ड्रम | र् + य = ऱ्या | सुऱ्या |

### ७.५ याचप्रमाणे आता आपण लिहू या.

| त् + र = मित्र | | | | |
|---|---|---|---|---|
| ............................ | + | ............................ | = | ग्रह |
| ............................ | + | ............................ | = | बर्फ |
| ............................ | + | ............................ | = | कैऱ्या |
| ............................ | + | ............................ | = | ट्रेन |

## ८ आपले शरीर

चित्राखाली अक्षरे दिली आहेत, त्यांना काना लावून शरीराच्या अवयवाचे नाव लिहा.









१. क – कान  २. क – क..............ळ  ३. प – ..............य  ४. द – ..............त

| दृष्टिक्षेप | | |
|---|---|---|
| तो डॉक्टर, ते-<br>doctor, -s | ती परिचारिका, त्या-<br>nurse, -s | ते नाव, ती नावे<br>name, -s |
| तो वॉर्डबॉय, ते-<br>ward boy / ward boys | ती मेट्रन, त्या-<br>matron, -s | ते पाणी, –<br>water |
| तो सफाईकामगार, ते-<br>cleaner / cleaners | ती बाटली, त्या बाटल्या<br>bottle, -s | |
| तो हात, ते-<br>hand, -s | ती गोळी, त्या गोळ्या<br>tablet, -s | |
| तो कान, ते-<br>ear, -s | ती कळ, त्या कळा<br>pain | |
| तो डोळा, ते डोळे<br>eye, -s | | |
| तो आराम, –<br>rest | | |
| तो पाय, ते-<br>leg, -s | | |

| | | |
|---|---|---|
| तो आजार, ते-<br>illness, -es | | |
| तो ताप, –<br>fever | | |
| तो वास, ते-<br>smell, -s | | |
| तो कागद, ते-<br>paper, -s | | |

| सर्वनाम<br>Pronouns | क्रियापद<br>Verbs | प्रश्नशब्द<br>Question words | इतर शब्द<br>Other words |
|---|---|---|---|
| मी – I | राहणे – to stay | कोण – who | मध्ये – in |
| माझं – mine / my | असणे – to be | कुठल्या; कुठले – from where | सुद्धा – also |
| तुम्ही – you | भेटणे – to meet | काय – what | उद्या – tomorrow |
| तुमचं – your / yours | करणे – to do | कशा; कसे – how | |
| | | कुठे – where | |

| शिष्टाचार शब्द<br>Courtesy words |
|---|
| नमस्कार / नमस्ते – Hello |
| हॅलो – Hello |
| हाय – Hi |
| अच्छा – Ok / Bye |
| टाटा – Bye |

# २ रुग्णालय









## चला, शिकू या :

- ✔ वॉर्डची माहिती देणे
- ✔ सर्वनामे
- ✔ सामान्य वर्तमानकाळ : असणे, नसणे
- ✔ अंक : २१-५०
- ✔ वर, खाली, उजवीकडे, डावीकडे
- ✔ किती वाजले, वेळ सांगणे
- ✔ दिवस व महिने

## १ आपले वॉर्ड.



मी सिस्टर सुनीता. मी बालरोग विभागात काम करते. मी लहान मुलांकडे लक्ष देते.

१. सिस्टर सुनीता कोणत्या विभागात काम करते?

सिस्टर सुनिता -------------------------------- विभागात काम करते.



मी सिस्टर रोझी. मी दंतचिकित्सा विभागात काम करते. तुमच्या दातांची काळजी घेते.

२. सिस्टर रोझी कोणत्या विभागात काम करते?

सिस्टर रोझी -------------------------------- विभागात काम करते.

# २ रुग्णालय

## १.१ रुग्णालयात कोणकोणते विभाग असतात ते पाहू या.

खालील चित्रे पाहून योग्य जोड्या लावू या.



क



ख



ग



घ



च



छ



ज



झ

१. नेत्रचिकित्सा विभाग (Opthalmology Department) – .............

२. अस्थिरोग विभाग (Orthopaedic Department) – .............

३. हृदयरोग विभाग (Cardiology Department) – .............

४. कान, नाक, घसा विभाग (Ear, Nose and Throat Department) – .............

५. दंतचिकित्सा विभाग (Dentistry Department) – .............

६. प्रसूति विभाग (Department of Gynaecology) – .............

७. बालरोग विभाग (Department of Pediatrics) – .............

८. नेफ्रॉलॉजी विभाग (Department of Nephrology) – .............

तुम्ही कोणत्या विभागात काम करता?

मी -------------------------------- विभागात काम करते.

### १.२ आपले शरीर : चित्रे पाहून अवयवांची नावे लिहू या.



१. न – ............क



२. ड – डो............



३. बो – बो............



४. ग – गु............घा



५. म – म............ग............

## २ अंक : १-५०. वाचन आणि सराव.

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | एक | ११ | अकरा | २१ | एकवीस | ३१ | एकतीस | ४१ | एकेचाळीस |
| २ | दोन | १२ | बारा | २२ | बावीस | ३२ | बत्तीस | ४२ | बेचाळीस |
| ३ | तीन | १३ | तेरा | २३ | तेवीस | ३३ | तेहतीस | ४३ | त्रेचाळीस |
| ४ | चार | १४ | चौदा | २४ | चोवीस | ३४ | चौतीस | ४४ | चव्वेचाळीस |
| ५ | पाच | १५ | पंधरा | २५ | पंचवीस | ३५ | पस्तीस | ४५ | पंचेचाळीस |
| ६ | सहा | १६ | सोळा | २६ | सव्वीस | ३६ | छत्तीस | ४६ | शेहेचाळीस |
| ७ | सात | १७ | सतरा | २७ | सत्तावीस | ३७ | सदतीस | ४७ | सत्तेचाळीस |
| ८ | आठ | १८ | अठरा | २८ | अठ्ठावीस | ३८ | अडतीस | ४८ | अठ्ठेचाळीस |
| ९ | नऊ | १९ | एकोणीस | २९ | एकोणतीस | ३९ | एकोणचाळीस | ४९ | एकोणपन्नास |
| १० | दहा | २० | वीस | ३० | तीस | ४० | चाळीस | ५० | पन्नास |

# २ रुग्णालय

## २.१ वाचू या.

आमच्या रुग्णालयात एकूण ४० खोल्या आहेत. त्यांपैकी प्रसूति विभागासाठी २७ आणि बालरोग विभागासाठी १३ खोल्या आहेत. इथे आम्ही १४ डॉक्टर्स, १८ परिचारिका, ६ वॉर्डबॉय व १० सफाईकामगार असे एकूण ४८ लोक काम करतो.

## २.२ वरील परिच्छेदातील अंक शब्दात लिहू या.

१. ४० – ................................................ २. २७ – ................................................

३. १३ – ................................................ ४. १४ – ................................................

५. ६ – ................................................ ६. १८ – ................................................

६. १० – ................................................ ७. ४८ – ................................................

## ३ महिने.

| |
|---|
| जानेवारी |
| फेब्रुवारी |
| मार्च |
| एप्रिल |
| मे |
| जून |
| जुलै |
| ऑगस्ट |
| सप्टेंबर |
| ऑक्टोबर |
| नोव्हेंबर |
| डिसेंबर |



### ३.१ सोडवू या.

१. हा सप्टेंबर महिना आहे.

पुढचा महिना कोणता आहे?

उत्तर : ----------------------------

मागचा महिना कोणता होता?

उत्तर : ----------------------------




२. हा महिना कोणता आहे?

उत्तर : ----------------------------

पुढचा महिना जून आहे.

मागचा महिना कोणता होता?

उत्तर : ----------------------------

३. हा महिना कोणता आहे?

उत्तर : ----------------------------

मागचा महिना ऑगस्ट होता. पुढचा महिना कोणता आहे?

उत्तर : ----------------------------

### ३.२ वाचू आणि ऐकू या.

अनिता : नमस्कार, मी अनिता. आपलं नाव?

अरुणा : माझं नाव अरुणा. आपण काय करता?

अनिता : मी परिचारिका आहे. मी बाह्यरुग्ण विभागात काम करते. आपण कोणत्या विभागात काम करता?

अरुणा : मी शल्यचिकित्सा विभागात काम करते. सिस्टर अनिता, आजची तारीख कोणती आहे, ते तुम्ही सांगू शकता का?

अनिता : आज १२ तारीख आहे. मार्च महिना.

अरुणा : धन्यवाद. बरं, तुम्ही कधीपासून मुंबईमध्ये राहता?

अनिता : मी फेब्रुवारीपासून मुंबईमध्ये राहते.

## ४ जोड्या जुळवू या.

| | |
|---|---|
|  | १ |
|  | २ |
|  | ३ |
|  | ४ |
|  | ५ |
|  | ६ |

| | |
|---|---|
| क | खाली |
| ख | वर |
| ग | जवळ |
| घ | सरळ |
| च | उजवीकडे |
| छ | डावीकडे |



उजवीकडे



डावीकडे



सरळ

## ५ शब्द वाचू या व लिहू या.

| तो | ती | ते |
|---|---|---|
| घसा – throat | सुई – needle | कापड – cloth |
| आवाज – noise | खोली – room | चाक – wheel |
| गाल – cheek | चादर – bed sheet | दार – door |
| मोजा – sock | जखम – wound | |
| पलंग – cot | | |



१. दा--------



२. ---------ई



३. गा---------



४. चा---------



५. ---------ली

## ६ वाचू या.

१ : नमस्कार. शल्यचिकित्सा विभाग (Surgery Department) कुठे आहे?

२ : इथून सरळ जा. शल्यचिकित्सा विभाग **डावीकडे** आहे.



१ : हॅलो, जनरल वॉर्ड कुठे आहे?

२ : जनरल वॉर्ड **खाली** आहे.



### ६.१ वरीलप्रमाणे संवाद बनवू या.

१. बाह्यरुग्ण विभाग – उजवीकडे

२. दंतचिकित्सा विभाग – डावीकडे

३. वॉर्ड नंबर ४ – ?

४. डॉक्टर सिन्हांची केबिन – ?

### ६.२ तुम्ही रुग्णाला कोणत्या विभागात जायला सांगाल? योग्य पर्याय निवडू या.

**उदा॰** सिस्टर, माझ्या बायकोची सोनोग्राफी करायचीय.

अ) कान, नाक, घसा विभागात जा.

ब) <u>रेडिऑलॉजी विभागात जा.</u>

क) नेत्रचिकित्सा विभागात जा.



१. सिस्टर, माझे डोळे आले आहेत.

अ) दंतचिकित्सा विभागात जायला सांगा.

ब) फिझिओथेरपी विभागात जायला सांगा.

क) नेत्रचिकित्सा विभागात जायला सांगा.



२. सिस्टर, रक्ताची बाटली हवी आहे.

अ) रक्तपेढीत जायला सांगा.

ब) बालरोग विभागात जायला सांगा.

क) सुविधा विभागात जायला सांगा.




३. सिस्टर, माझ्या भावाला अपघात झाला आहे.

अ) प्रसूति विभागात जायला सांगा.

ब) ट्रॉमा केअर युनिटमध्ये जायला सांगा.

क) नेत्रचिकित्सा विभागात जायला सांगा.

४. सिस्टर, माझा एक्स-रे काढायचा आहे.

अ) मनोविकृती विभागात जायला सांगा.

ब) जळीत विभागात जायला सांगा.

क) क्ष-किरण विभागात जायला सांगा.



### ६.३ रुग्णालयातील विभाग. योग्य जोड्या जुळवू या.

| | |
|---|---|
| क. प्रसूती | १. Intensive Care Unit |
| ख. रक्त तपासणी | २. ENT department |
| ग. नेत्र तपासणी | ३. Rheumatology department |
| घ. अस्थिरोग विभाग | ४. Gynaecology |
| च. कान नाक घसा तपासणी | ५. Neonatal Care |
| छ. नवजातशिशुदक्षता | ६. Opthalmology |
| ज. अतिदक्षता विभाग | ७. Blood tests |

क. ____ ख. ____ ग. ____ घ. ____ च. ____ छ. ___ ज. ____

### ६.४ पेशंटला समस्या आहे. तुम्ही त्यांना कुठे जायला सांगाल?

**(ऑंकॉलॉजी, रक्त व लघवी तपासणी, ओपीडी, शस्त्रक्रिया, रक्तपेढी)**

१. सिस्टर, मला लघवी तपासणीकरता जायचे आहे.
तुम्ही .................................... विभागामध्ये जा.

२. सिस्टर, कॅन्सर तपासणी कुठे होते?
तुम्ही .................................... विभागामध्ये जा.

३. सिस्टर, माझ्या मुलाचं मेंदूचं ऑपरेशन आहे.
तुम्ही .................................... विभागामध्ये जा.

४. सिस्टर, मला डॉक्टरांना पाय दाखवायचा आहे.
तुम्ही .................................... विभागामध्ये जा.

५. सिस्टर, ऑपरेशनसाठी रक्ताची बाटली लागणार आहे.
तुम्ही .................................... मध्ये जा.

## ७ वाचू या.

- हॅलो, सकीना, तू इथे काय करतेस?
  मी इथे नर्सिंगचे शिक्षण घेते.
- नमस्कार, सारिकाताई आणि मालाताई, तुम्ही इथे काय करता?
  आम्ही इथे सफाईचं काम करतो.
- नमस्कार, डॉक्टर खुराना, आपण इथे काय करता?
  मी इथे सर्जन आहे.

### सर्वनाम

| एकवचन | अनेकवचन / आदरार्थी |
|---|---|
| मी | आम्ही / आपण |
| तू | तुम्ही / आपण |
| तो | ते |
| ती | त्या |
| ते | ती |
| ती + ते<br>तो + ती<br>तो + ते | ते |

**मी**



**मी मुंबईमध्ये राहते.**
**मी मुंबईमध्ये आहे.**

**आम्ही**



**आम्ही मुंबईमध्ये राहतो.**
**आम्ही मुंबईमध्ये आहोत.**

**आपण**



**आपण मुंबईमध्ये राहतो.**
**आपण मुंबईमध्ये आहोत.**

**तू**



तू कुठे राहतोस?
मी मुंबईमध्ये राहतो.

**तुम्ही/आपण**



तुम्ही / आपण कुठे राहता?
आम्ही मुंबईमध्ये राहतो.

**तुम्ही/आपण**



तुम्ही / आपण कुठे राहता?
मी मुंबईमध्ये राहतो.

तो



तो मुंबई मध्ये राहतो.
तो मुंबईमध्ये आहे.

ते



ते मुंबईमध्ये राहतात.
ते मुंबईमध्ये आहेत.

ती



ती कुठे राहते?
ती कुठे आहे?

त्या



त्या मुंबईमध्ये राहतात.
त्या मुंबईमध्ये आहेत.

ते



ते कुठे राहतं?
ते कुठे आहे?

ती



ती मुंबईमध्ये राहतात.
ती मुंबईमध्ये आहेत.

## ७.१ योग्य सर्वनामे भरू या.

१. हॅलो, डॉक्टर सरदेसाई,................ किती वाजता सर्जरी करणार आहात?

२. सिस्टर कमला कुठे आहे? ................ आत्ता शल्यचिकित्सा विभागात आहे.

३. तुकाराम आणि सलीम, .............. कुठे आहात? ............. ठाण्यात आहोत.

४. माझे नाव अरुणा. ................ इथे मेट्रन आहे.

५. हॅलो सिस्टर अनिता, ................ कुठे चालली आहेस?

६. वॉर्डबॉय भरत कुठे आहे? ................ आज आला नाहीये.

७. ते लोक कोण आहेत? ................ पेशंटला भेटायला आले आहेत.

## ७.२ सामान्य वर्तमानकाळ 'असणे'.

तुम्ही कोण आहात?
आम्ही परिचारिका आहोत.



On an average, nurses walk four to five miles in every 12–hour shift. That's a lot of walking.
परिचारिका बारा तासांच्या ड्यूटीमध्ये दररोज चार ते पाच मैल चालतात. हे भरपूर चालणे आहे.

आपण कोण आहात?
मी भूलतज्ज्ञ आहे.



तू कोण आहेस?
मी विद्यार्थिनी आहे. मी नर्सिंगचा कोर्स करते.



तो कोण आहे?
तो दंतवैद्य आहे.



ती कोण आहे?
ती शल्यचिकित्सक आहे.



## ७.३ वरील वाक्ये वाचून तक्ता पूर्ण करा.

| एकवचन | अनेकवचन | आदरार्थी |
|---|---|---|
| मी आहे | आम्ही / आपण ............ | आम्ही / आपण ............ |
| तू ............ | तुम्ही / आपण ............ | तुम्ही / आपण ............ |
| तो ............ | ते ............ | ते ............ |
| ती ............ | त्या ............ | त्या ............ |
| ते ............ | ती ............ | ती ............ |

## ७.४ खालील तक्ता पूर्ण करा.

| एकवचन | अनेकवचन |
|---|---|
| मी .................................... | आम्ही / आपण .................................... |
| तू .................................... | तुम्ही / आपण .................................... |
| तुम्ही / आपण .................................... | तुम्ही / आपण .................................... |
| तो / ती / ते .................................... | ते / त्या / ती .................................... |

## ७.५ चला, सराव करू या. (आहेस, आहात, आहेत, आहे)

१. वॉर्ड नंबर दोनमध्ये भरपूर पेशंट ....................................

२. डॉक्टर खान कुठे ....................................?

३. सिस्टर नमिता, तुम्ही कोणत्या वॉर्डमध्ये ....................................?

४. अरे, ब्रदर समीर, कसा ....................................?

५. सिस्टर गीता आज रजेवर ....................................

६. सिस्टर माला, तू कशी ....................................? मी छान ....................................




८ किती वाजले आहेत, ते लिहू या.



एक वाजला



दोन वाजले



चार वाजले

   

१. ............ वाजले    २. ............ वाजले    ३. पाच ............    ४. ............ वाजले

   

५. आठ ............    ६. ........................    ७. ........................    ८. ........................

## ८.१ किती वाजले आहेत ते लिहू या.

| | | |
|---|---|---|
| उदा० |  | सव्वाबारा वाजले आहेत.<br>सव्वाबारा झाले आहेत.<br>बारा वाजून पंधरा मिनिटे झाली आहेत. |
| क) |  | पावणेपाच वाजले आहेत.<br>------------------------------------------------<br>पाच वाजायला पंधरा मिनिटे बाकी आहेत. |
| ख) |  | ------------------------------------------------<br>------------------------------------------------<br>------------------------------------------------ |
| ग) |  | साडेपाच वाजले आहेत.<br>------------------------------------------------<br>------------------------------------------------ |

| | | |
|---|---|---|
| घ) |  | ________________<br>________________<br>________________ |
| च) |  | दीड वाजला आहे.<br>________________<br>एक वाजून तीस मिनिटे झाली आहेत. |
| छ) |  | ________________<br>________________<br>________________ |
| ज) |  | ________________<br>________________<br>________________ |
| झ) |  | ________________<br>________________<br>________________ |
| ञ) |  | ________________<br>________________<br>________________ |

## ८.२ चर्चा करू या.

१. तुमची ड्यूटी किती वाजता सुरू होते?

२. तुमचे काम किती वाजता संपते?

३. तुमची जेवणाची सुट्टी किती वाजता होते?

## ९ रुग्णालयातील विभाग वाचू या.

| | | |
|---|---|---|
| तो बाह्यरुग्ण विभाग, ते-<br>outpatient department (OPD) | ती रुग्णवाहिका, त्या-<br>ambulance | ते शुश्रूषा केंद्र, ती-<br>health care centre |
| तो आंतररुग्ण विभाग, ते-<br>inpatient department (IPD) | ती प्रयोगशाळा, त्या-<br>laboratory, -ies | ते ट्रॉमा केअर युनिट, ती-<br>trauma care unit |
| तो तत्काळ उपचार कक्ष, ते-<br>emergency unit | ती रक्तपेढी,<br>त्या रक्तपेढ्या<br>blood bank, -s | ते शस्त्रक्रियाकक्ष,<br>ती शस्त्रक्रियाकक्षे<br>operation theatre |
| तो शवविच्छेदन विभाग, ते-<br>autopsy section | | |
| तो अतिदक्षता विभाग, ते-<br>intensive care unit (ICU) | | |
| तो शल्यचिकित्सा विभाग, ते-<br>surgery department | | |
| तो नेत्र चिकित्सा विभाग, ते-<br>ophthalmology department | | |
| तो कान, नाक, घसा विभाग, ते-<br>ear, nose and throat department | | |
| तो दंतचिकित्सा विभाग, ते-<br>dentistry department | | |
| तो हृदयरोग विभाग, ते-<br>cardiology department | | |
| तो नेफ्रॉलॉजी विभाग, ते-<br>department of nephrology | | |
| तो रक्त तपासणी विभाग, ते-<br>pathology department | | |

| | | |
|---|---|---|
| तो अस्थिरोग विभाग, ते-<br>orthopaedic department | | |
| तो कुटुंबकल्याण विभाग, ते-<br>family welfare department | | |
| तो प्रसूतिविभाग, ते-<br>department of gynaecology | | |
| तो नवजात शिशू विभाग, ते-<br>neonatal unit | | |
| तो बालरोग विभाग, ते-<br>department of pediatrics | | |
| तो माता व बालसंगोपन विभाग, ते-<br>mother and child care department | | |
| तो राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमांतर्गत आरोग्य सुविधा विभाग, ते-<br>health and safety department | | |
| तो मोठ्या व छोट्या शस्त्रक्रिया विभाग, ते-<br>big and small operation theatre | | |
| तो फिझिओथेरपी विभाग, ते-<br>physiotherapy department | | |
| तो आहार विभाग, ते-<br>nutrition department | | |
| तो मनोविकृती विभाग, ते-<br>psychiatry department | | |
| तो जळीत विभाग, ते-<br>burn centre or burns unit | | |
| तो रेडिओलॉजी विभाग, ते-<br>radiology department | | |
| तो क्ष-किरणविभाग, ते-<br>x-ray department | | |
| तो भूल विभाग, ते –<br>anaesthesiology department | | |
| तो कर्करोग विभाग, ते-<br>oncology department | | |

| दृष्टिक्षेप | | |
|---|---|---|
| तो विभाग, ते-<br>department, -s | ती तारीख, त्या तारखा<br>date, -s | ते कापड, ती कापडं<br>cloth, -s |
| तो शल्यचिकित्सक, ते-<br>surgeon, -s | ती चादर, त्या चादरी<br>bed sheet, -s | ते रुग्णालय, ती-<br>hospital, -s |
| तो महिना, ते महिने<br>month, -s | ती जखम, त्या जखमा<br>wound, -s | ते मनगट, ती-<br>wrist, -s |
| तो आराम<br>rest | ती सुई, त्या सुया<br>needle, -s | ते बोट, ती बोटं<br>finger, -s |
| तो पेशंट, ते-<br>patient, -s | ती खोली, त्या खोल्या<br>room, -s | ते चाक, ती चाकं<br>wheel, -s |
| तो घसा, ते घसे<br>throat, -s | ती केबिन, त्या-<br>cabin, -s | |
| तो पलंग, ते-<br>bed, -s | | |
| तो मोजा, ते मोजे<br>sock, -s | | |
| तो आवाज, ते-<br>noise, -s | | |
| तो वॉर्ड, ते-<br>ward, -s | | |

| सर्वनाम<br>Pronouns | क्रियापद<br>Verbs | प्रश्नशब्द<br>Question words | इतर शब्द<br>Other words |
|---|---|---|---|
| मी | करणे – to do | कसा – how | आत्ता – now |
| तू | राहणे – to stay | कशी – how | भरपूर – many, a lot |
| तो / ती / ते | असणे – to be | कोणता – which | आज – today |
| तुम्ही | शिकणे – to study | किती – how much / how many | रजेवर जाणे – to be on leave of absence |
| आपण | भेटणे – to meet | कुठे – where | |
| आम्ही | पाहणे – to see | कधीपासून – since when | |
| ते | सांगणे – to tell | | |
| त्या | वाचणे – to read | | |
| ती | लिहिणे – to write | | |

३

# तुम्हाला काय होतंय?



## चला, शिकू या :

- दैनंदिन व्यवहारांबद्दल बोलणे
- इच्छा व्यक्त करणे आणि आरोग्याच्या समस्यांबद्दल बोलणे
- दिवसाच्या वेळा
- अपूर्ण (चालू) आणि साधा वर्तमानकाळ (औपचारिक आणि संभाषणात्मक)
- असणे (रीतीवर्तमानकाळ)
- दर्शक सर्वनामे
- आजार
- अंक : ५०-१००
- ऋतू

## १ तुम्हाला काय होतंय? चित्र पाहून योग्य जोड्या जुळवू या.


क.


ख.


ग.


घ.


च.


छ.


ज.

| | | | |
|---|---|---|---|
| १. ताप येणे | २. चक्कर येणे | ३. फ्रॅक्चर होणे | |
| ४. ऑपरेशन होणे | ५. हाड मोडणे | ६. सर्दी होणे | ७. पोट दुखणे |

क. _____ ख. _____ ग. _____ घ. _____ च. _____ छ. _____ ज. _____

### १.१ वाक्ये बनवू या.

उदा॰ तुम्हाला ताप आलाय का? – हो. मला ताप आलाय.

१. तुम्हाला चक्कर ..........................? – हो. मला चक्कर येतेय.

२. तुम्हाला फ्रॅक्चर ..........................? – हो. मला फ्रॅक्चर झालंय.

३. तुमचं ऑपरेशन ..........................? – हो. माझं ऑपरेशन झालंय.

४. तुमचं हाड ..........................? – हो. माझं हाड मोडलंय.

५. तुम्हाला सर्दी ..........................? – हो. मला सर्दी झालीये.

६. तुमचं पोट ..........................? – हो. माझं पोट दुखतंय.

### १.२ लक्षणे आणि आजार. योग्य जोड्या लावू या.

| | |
|---|---|
| १. माझं पोट दुखतंय. | अ. अर्धशिशी असेल. |
| २. माझा घसा दुखतोय. | ब. पाळी जवळ आली असेल. |
| ३. माझ्या छातीत दुखतंय. | क. जंत झाले असतील. |
| ४. माझं ओटीपोट दुखतंय. | ड. हृदयविकार असेल. |
| ५. माझं डोकं दुखतंय. | इ. टॉन्सिल्स वाढले असतील. |

१. .................... २. .................... ३. .................... ४. .................... ५. ....................

| | |
|---|---|
| ओटीपोट – lower abdomen | हृदयविकार – heart trouble |
| अर्धशिशी – migraine | जंत – worms |
| पाळी – menstrual cycle | |

### २ खालील संवाद वाचू या आणि तक्ता भरू या.

**खोली नंबर १**

नर्स : नमस्कार, मिस्टर कदम. कसे आहात? हात दुखतोय का?

कदम : हो, थोडा दुखतोय.

नर्स : आता एक्स-रे काढायचा आहे. त्याआधी ही गोळी घ्या.

**खोली नंबर २**

नर्स : नमस्कार, दातेआजी. तुमचा रक्तदाब पाहायचाय.

दातेआजी : हो, ठीक आहे.

नर्स : रक्तदाब खूप कमी आहे. ९९ / ५९ आहे. गोळी घेतली नाही का?

दाते : हो, घेतली आहे.

नर्स : आज तुमचा सिटी स्कॅन आहे, माहीत आहे ना?

दाते : हो.

**खोली नंबर ३**

नर्स : नमस्कार, काळेकाका.

श्री॰ काळे : नमस्कार, सिस्टर.

नर्स : तुमच्या पायाची जखम पाहू दे.

श्री॰ काळे : जखम आता बरी आहे.

नर्स : आज पुन्हा ड्रेसिंग करायचंय.

| खोली | पेशंटचे नाव | समस्या | काय करायचे आहे? |
|---|---|---|---|
| १ | ........................ | ........................ | ........................ |
| २ | ........................ | ........................ | ........................ |
| ३ | ........................ | ........................ | ........................ |

## ३ वरीलप्रमाणे डॉक्टर आणि नर्समधील संवाद लिहू या.

१. **रूम नंबर १**

समस्या : छातीत दुखतंय.

काय करायचे आहे? : अँन्जियोप्लास्टी

२. **रूम नंबर २**

समस्या : कळा येतायत.

काय करायचे आहे? : सिझेरियन

३. **रूम नंबर ३**

समस्या : सायटिकाचा त्रास होतोय.

काय करायचे आहे? : बाम

## ४ दिवसाच्या वेळा ओळखू या.



१.



२.



३.



४.

अ) सकाळ? ________ ब) दुपार? ________

क) संध्याकाळ? ________ ड) रात्र? ________

## ४.१ खालील प्रश्नांची योग्य उत्तरे निवडू या.

१. तुमची ड्यूटी कधी सुरू होते? सकाळी ☐ दुपारी ☐ संध्याकाळी ☐ रात्री ☐

२. तुमची ड्यूटी कधी संपते? सकाळी ☐ दुपारी ☐ संध्याकाळी ☐ रात्री ☐

## ४.२ वाचू या.

सिस्टर सुनिताचा एक दिवस पाहू या. सिस्टर सुनिता सकाळी ६ वाजता उठते. ती रोज सकाळी १५ मिनिटे योगासने करते. सगळे आवरून ती ७.०० वाजता नाश्ता करते. नाश्ता करताना पेपरही वाचते. ७.३५ला ती हॉस्पिटलला जाणारी बस पकडते. हॉस्पिटलला पोचायला तिला २० मिनिटे लागतात. आठ वाजता तिची ड्यूटी सुरू होते. सिस्टर सुनिता ओ॰पी॰डी॰मध्ये काम करते. पेशंटचे कार्ड भरते, इंजेक्शन देते, ड्रेसिंग करते, औषध देते, रक्त तपासते. १२.३० वाजता तिची जेवणाची सुट्टी होते. ४.०० वाजता दुसरी नर्स येते आणि सिस्टर सुनिताची ड्यूटी संपते. घरी जाताना ती भाजी व किराणा सामान घेते. संध्याकाळी घरी ती थोडा वेळ टी॰व्ही॰ पाहते. रात्री जेवते ८.३०ला आणि ९.००ला झोपते.

### ४.३ वरील परिच्छेदातील क्रियापदे ओळखून खालील तक्त्यात लिहू या.

| क्रियापद | वर्तमानकाळ |
|---|---|
| उठणे | उठते |
| करणे | ........................................ |
| ........................................ | ........................................ |
| ........................................ | ........................................ |
| ........................................ | ........................................ |
| ........................................ | ........................................ |
| ........................................ | ........................................ |

क. सिस्टर सुनिता सकाळी काय करते?

- योगासने करते
- भाजी आणते
- झोपते

ख. सिस्टर सुनिता टीव्ही कधी पाहते?

- संध्याकाळी
- रात्री
- दुपारी

ग. आता याच प्रकारे स्वतःचा दिनक्रम लिहू या.

मी दररोज सकाळी .......... वाजता उठते. ................

## ५ कोण काय करत आहे?

१. अनिता काय करत आहे?

ती पुस्तक वाचत आहे.



२. चिंटू काय करत आहे? तो (खाणे)

................................................................................................ .



३. सिस्टर रीना काय करत आहे? ती रिपोर्ट (लिहिणे)

................................................................................................ .



४. डॉक्टर सोनी काय करत आहेत? ते पेशंट (तपासणे)

................................................................................................ .



५. सिस्टर रमा काय करत आहे? ती इंजेक्शन (देणे)

................................................................................................ .



## ५.१ तक्ता वाचू या.

| वर्तमानकाळ | अपूर्ण (चालू) वर्तमानकाळ |
|---|---|
| मी काम करतो.<br>मी काम करते. | मी काम करत आहे. |
| आम्ही / आपण काम करतो. | आम्ही / आपण काम करत आहोत. |
| तू काम करतोस.<br>तू काम करतेस. | तू काम करत आहेस.<br>तू काम करत आहेस. |
| तुम्ही / आपण काम करता. | तुम्ही / आपण काम करत आहात. |
| तो काम करतो.<br>ती काम करते.<br>ते काम करतं. | तो / ती / ते काम करत आहे. |
| ते / त्या / ती काम करतात. | ते / त्या / ती काम करत आहेत. |

**चालू (अपूर्ण) वर्तमानकाळ**

धातू + त + असणे

उदा॰ खाणे – खा + त = खात आहे / आहोत, आहेस / आहात, आहे / आहोत

वाचणे – वाच + त = वाचत आहे / आहोत, आहेस / आहात, आहे / आहेत

## ५.२ तक्ता पूर्ण करा.

| क्रियापद | धातू | अपूर्ण वर्तमानकाळ |
|---|---|---|
| तू (करणे) | कर | करत आहेस |
| मी (पळणे) | पळ | पळत आहे |
| तू (खाणे) | खा | .................... .................... |
| तुम्ही / आपण (जाणे) | जा | .................... .................... |
| ती (येणे) | ये | .................... .................... |
| ते (होणे) | हो | होत आहे |
| ते (बोलणे) | बोल | .................... .................... |
| आम्ही / आपण (जेवणे) | जेव | .................... .................... |

## ६ संवाद वाचू आणि ऐकू या.

मेट्रन : सिस्टर सीमा काय करतेय?

सिस्टर निशा : ती इंजेक्शन देतेय.

मेट्रन : बाबू आज आला आहे ना?

सिस्टर निशा : हो. तो आत्ता बाथरुम साफ करतोय.

मेट्रन : ब्रदर शेटे आणि ब्रदर गोपाल काय करतायत?

सिस्टर निशा : ते पेशंटला खोलीत आणतायत.

वरील संवादात 'करत आहे' या अपूर्ण वर्तमानकाळाचे रूप 'करतेय' असे वापरले गेले आहे. लिहिताना 'सांगत आहे' असे लिहिले जाते, तर बोलताना 'सांगतेय' असे म्हटले जाते. संभाषणात्मक भाषेत क्रियापद या रीतीने बदलते.

| लिहिताना | बोलताना |
|---|---|
| चालत / चालते आहेस | चालतोयस / चालतेयस |
| चालत / चालली आहे | चालतोय |
| जात / जातो आहे | जातोय |
| करत / करतो आहे | करतोय |
| बोलत / बोलते आहे | बोलतेय |
| बोलत नाही आहे | बोलत नाहीये |

### ६.१ खालील तक्ता वाचू या.

| वर्तमान | अपूर्ण (चालू) वर्तमान | अपूर्ण (चालू) वर्तमान |
|---|---|---|
| **क्रियापद (लिहिणे)** | लिहिताना (औपचारिक) | बोलताना (संभाषणात्मक) |
| **मी लिहितो.** | मी लिहितो / लिहीत आहे. | लिहितो + य = मी लिहितोय |
| **मी लिहिते.** | मी लिहिते / लिहीत आहे. | लिहिते + य = मी लिहितेय |
| **आम्ही / आपण लिहितो.** | आम्ही / आपण लिहितो / लिहीत आहोत. | लिहितो + य = आम्ही / आपण लिहितोय |
| **तू लिहितोस.** | तू लिहितो / लिहीत आहेस. | लिहितो + यस = तू लिहितोयस |
| **तू लिहितेस.** | तू लिहिते / लिहीत आहेस. | लिहिते + यस = तू लिहितेयस |

| | | |
|---|---|---|
| **तुम्ही / आपण लिहिता.** | तुम्ही / आपण लिहिता / लिहीत आहेत. | लिहिता + य = तुम्ही / आपण लिहिताय |
| **तो लिहितो.** | तो लिहितो / लिहीत आहे. | लिहितो + य = तो लिहितोय |
| **ते लिहितात.** | ते लिहीत आहेत. | लिहिता + य = ते लिहितायत |
| **ती लिहिते.** | ती लिहिते / लिहीत आहे. | लिहिते + य = ती लिहितेय |
| **त्या लिहितात.** | त्या लिहीत आहेत. | लिहिता + यत = त्या लिहितायत |
| **ते लिहितं.** | ते लिहिते / लिहीत आहे. | लिहितं + य = लिहितंय |
| **ती लिहितात.** | ती लिहीत आहेत. | लिहितात + य = ती लिहितायत |

## ६.२ वाक्ये बनवू या.

सिस्टर अनिता काय करतेय? - ती आत्ता रिपोर्ट लिहितेय / बेड साफ करतेय / सलाईन लावतेय / औषध देतेय

उदा. : तू (पु.) – बिल बनवणे - तू काय करतोयस? – मी बिल बनवतोय.

१. तुम्ही – वॉशिंग मशीन लावणे

२. तो – पाणी देणे

३. त्या – सफाई करणे

४. ते (अ.व.) – नियम सांगणे

५. ती – मास्क बांधणे

## ६.३ संवाद वाचू आणि ऐकू या.

सिस्टर : काय म्हणताय काळेआजी, कशी आहे तब्येत? काही हवंय का?

काळेआजी : हो. मला बी.पी.ची गोळी हवीय.

सिस्टर : पण तुम्हाला तर रक्तदाब नाहीये.

काळेआजी : बरं, मग शुगर तरी तपासून पहा.

सिस्टर : पण तुमची साखर अगदी बरोबर आहे.

काळेआजी : मग ताप असेल.

सिस्टर : अहो, तापही नाहीये. तुम्हाला बेडपॅन हवंय का?

काळेआजी : नाही. मला बेडपॅन नकोय.

सिस्टर : मग शेकायची पिशवी हवीय का?

काळेआजी : नकोय. पण मला काहीतरी होतंय.

सिस्टर : तुम्हाला काहीही होत नाहीये, आजी. तुम्हाला फक्त आराम हवाय!

### ६.४ संवाद वाचून अपूर्ण वर्तमानकाळाची रूपे लिहू या.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | हवं + आहे = | हवा + आहे = .............. | हवी + आहे = .............. |
| २. | नको + आहे = | .............. + .............. = .............. | .............. + .............. = .............. |

### ६.५

**शिक्षक** **विद्यार्थी**



१. (ती) कात्री / कातरी

मला कात्री / कातरी हवीय.



२. (ती) सुई

..........................................................................................



३. (तो) मास्क

..........................................................................................



४. (ते) थर्मामीटर

..........................................................................................



५. (तो) रिपोर्ट

.............................................................................................

## ६.६ खाली दिलेले नवीन शब्द वापरून वरीलप्रमाणे संवाद साधू या.

| तो | ती | ते |
|---|---|---|
| रुमाल – handkerchief | लघवी – urine | भांडे / भांडं – vessel |
| संसर्ग – infection | उशी – pillow | रक्त – blood |
| कापूस – cotton | | सलाईन – saline |

## ७ ५० ते १०० अंक वाचू या आणि शिकू या.

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ५१ | एकावन्न | ६१ | एकसष्ट | ७१ | एकाहत्तर | ८१ | एक्याऐंशी | ९१ | एक्याण्णव |
| ५२ | बावन्न | ६२ | बासष्ट | ७२ | बाहत्तर | ८२ | ब्याऐंशी | ९२ | ब्याण्णव |
| ५३ | त्रेपन्न | ६३ | त्रेसष्ट | ७३ | त्र्याहत्तर | ८३ | त्र्याऐंशी | ९३ | त्र्याण्णव |
| ५४ | चौपन्न | ६४ | चौसष्ट | ७४ | चौऱ्याहत्तर | ८४ | चौऱ्याऐंशी | ९४ | चौऱ्याण्णव |
| ५५ | पंचावन्न | ६५ | पासष्ट | ७५ | पंचाहत्तर | ८५ | पंच्याऐंशी | ९५ | पंच्याण्णव |
| ५६ | छप्पन्न | ६६ | सहासष्ट | ७६ | शाहत्तर | ८६ | शाऐंशी | ९६ | शहाण्णव |
| ५७ | सत्तावन्न | ६७ | सदुसष्ट | ७७ | सत्त्याहत्तर | ८७ | सत्त्याऐंशी | ९७ | सत्त्याण्णव |
| ५८ | अठ्ठावन्न | ६८ | अडुसष्ट | ७८ | अठ्ठ्याहत्तर | ८८ | अठ्ठ्याऐंशी | ९८ | अठ्ठ्याण्णव |
| ५९ | एकोणसाठ | ६९ | एकोणसत्तर | ७९ | एकोणऐंशी | ८९ | एकोणनव्वद | ९९ | नव्याण्णव |
| ६० | साठ | ७० | सत्तर | ८० | ऐंशी | ९० | नव्वद | १०० | शंभर |

## ७.१ गाळलेल्या जागांमध्ये योग्य आकडा लिहा.

१. खोली क्रमांक ७ मधील पेशंटचे वय काय आहे? – (एकोणसत्तर) ______.

२. खोली क्रमांक १३ मधील मुलाला ताप किती आहे? – (नव्याण्णव) ______.

३. खोली क्रमांक ३ मधील पेशंटचे वजन काय आहे? – (चौसष्ट) ______.

४. खोली क्रमांक १४ मधील पेशंटची साखर मोजली का? – हो. (ब्याण्णव) ______ आहे.

५. खोली क्रमांक ५ मधील पेशंटचे वय किती आहे? – (एकोणनव्वद) _______.

६. खोली क्रमांक १८ मधील पेशंटची पल्स रेट किती आहे? – (शाहत्तर) ________ .

## ८ हे काय आहे?

**हा टी॰व्ही॰ आहे.**



**ही खुर्ची आहे.**



**हे पुस्तक आहे.**



तो टी॰व्ही॰ कसा आहे? तो टी॰व्ही॰ **महाग** आहे.

ती खुर्ची कशी आहे? ती खुर्ची **लाल** आहे.

ते पुस्तक कसे आहे? ते पुस्तक **जाड** आहे.



हे टी॰व्ही॰ आहेत.



ह्या खुर्च्या आहेत.



ही पुस्तकं आहेत.



ते टी॰व्ही॰ कसे आहेत? ते टी॰व्ही॰ **नवीन** आहेत.

त्या खुर्च्या कशा आहेत? त्या खुर्च्या **रंगीबेरंगी** आहेत.

ती पुस्तकं कशी आहेत? ती पुस्तकं **छान** आहेत.

## ८.१ दर्शक सर्वनामे

| पुल्लिंगी एकवचन | स्त्रीलिंगी एकवचन | नपुंसकलिंगी एकवचन |
|---|---|---|
| हा | ही | हे |
| तो | ती | ते |

| पुल्लिंगी अनेकवचन | स्त्रीलिंगी अनेकवचन | नपुंसकलिंगी अनेकवचन |
|---|---|---|
| हे | ह्या | ही |
| ते | त्या | ती |

**लक्षात ठेवा.**
१) हा सुरेश आहे. तो रमेश आहे.
२) ही टॅक्सी आहे. ती रिक्शा आहे.
३) हे आधारकार्ड आहे. ते पॅनकार्ड आहे.

**‘हा, ही, हे’** या सर्वनामांनी जवळची व्यक्ती / वस्तू दाखवली जाते.
**‘तो, ती, ते’** या सर्वनामांनी दूरची व्यक्ती / वस्तू दाखवली जाते.
जवळची किंवा दूरची व्यक्ती / वस्तू दाखवण्यासाठी जे सर्वनाम वापरले जाते, त्याला दर्शक **सर्वनाम** म्हणतात; म्हणून **‘हा, ही, हे, तो, ती, ते’** ही **दर्शक सर्वनामे** आहेत.

## ८.२ वाक्ये बनवू या.

१. ही खोली कशी आहे? – ही खोली हवेशीर आहे.
२. ते औषध – कडू : ..............................
३. ते बाळ – छोटे : ..............................
४. ती खाट – मोडकी : ..............................
५. त्या बाटल्या – खराब : ..............................
६. ह्या गोळ्या – रंगीबेरंगी : ..............................
७. तो एप्रन – मळकट : ..............................
८. ते बूट – पांढरे : ..............................
९. ती मशीन्स – मोडकी : ..............................
१०. हा केसपेपर – जुना : ..............................

# ३ तुम्हाला काय होतंय?

## १ ऋतू



पावसाळा आला, की छत्र्या बाहेर येतात.



हू हू हू! यावर्षी थंडी जरा जास्तच पडली आहे! हिवाळा मस्तच असतो.



अरे, किती गरम होतंय! उन्हाळा खूप आहे.

**लक्षात ठेवा.**

| महिने | ऋतू |
|---|---|
| फेब्रुवारी, मार्च, एप्रिल आणि मे | उन्हाळा |
| जून, जुलै, ऑगस्ट, सप्टेंबर | पावसाळा |
| ऑक्टोबर, नोव्हेंबर, डिसेंबर, जानेवारी | हिवाळा |

### ९.१ रिकाम्या जागेत शब्द भरू या.

डेंगी, उष्माघात, न्युमोनिया,
फ्लू, सर्दी, विषमज्वर

१. उन्हाळ्यात उष्माघात आणि ................................ पासून बचाव करावा.

२. हिवाळ्यात ................................ आणि ................................ होऊ शकतात.

३. पावसाळ्यात ................................ आणि ................................ पासून काळजी घ्यावी.

## १० असणे

| सर्वनाम | साधा वर्तमानकाळ 'होणे' |
|---|---|
| मी (पु.) | असतो |
| मी (स्त्री.) | असते |
| आम्ही / आपण | असतो |
| तू (पु.) | असतोस |
| तू (स्त्री.) | असतेस |
| तुम्ही / आपण (आदरार्थी + अ.व.) | असता |
| तो | असतो |
| ती | असते |
| ते | असते / असतं |
| ते (अ.व.) | असतात |
| त्या (अ.व.) | असतात |
| ती (अ.व.) | असतात |

**वाचू या.**

माझे नाव रमा. मी परिचारिका आहे. मी संजीवन रुग्णालयात काम करते. माझी शिफ्ट सकाळी ९ ते संध्याकाळी ५ पर्यंत असते. आमच्या हॉस्पिटलमध्ये भरपूर काम असते. दुपारी १ ते २ आमची जेवणाची सुट्टी असते.

### १०.१ क्रियापदाचे योग्य रूप लिहू या.

१. कधीकधी हॉस्पिटलमध्ये जास्त पेशंट्स ..................................... .

२. एखाद्या दिवशी दोन-तीन नर्स सुट्टी घेतात. मग आम्हाला खूप कामं ..................................... .

३. नर्स : अगं कल्पना, तुला कधी वेळ (तो) ...................................... की नाही? सतत काय कामात ......................................?

४. डॉ. राजे कुठे ......................................? दुसऱ्या मजल्यावर त्यांच्या केबिनमध्ये.

### १०.२ खालील संवाद वाचू या.

प्रतिमा : हॅलो, सारा, आजकाल कुठे असतेस तू? भेटतच नाहीस!

सारा : अगं, मी मुंबईला गेले होते.

प्रतिमा : अच्छा! तुझा भाऊ असतो ना मुंबईत? त्याला भेटायला का?

सारा : नाही, माझा दादा मुंबईत नसतो, पण माझे आईबाबा तिथे असतात.

प्रतिमा : अच्छा! मग तुझा दादा कुठे असतो?

सारा : तो आता अमेरिकेत असतो. तो तिथे नोकरी करतो.



प्रतिमा : आणि तुझी वहिनी? तीपण अमेरिकेत असते का?

सारा : हो, वहिनीपण दादाबरोबर अमेरिकेत असते.

प्रतिमा : ए, तुझी वहिनीपण नर्स आहे ना? आपल्यासारखी?

सारा : हो. ती तिथे नोकरी करते.

प्रतिमा : फारच छान. चल, चार वाजले. मी निघते. उद्या बोलू.

सारा : हो, नक्की. बाय!

## ११ आपले शरीर (आतले भाग)

| | | |
|---|---|---|
|  १. (तो) मेंदू |  २. (ते) हृदय |  ३. (ते) जठर |
|  ४. (ते) फुफ्फुस |  ५. (ते) यकृत |  ६. (ते) मूत्रपिंड |
|  ७. (ती) अन्ननलिका |  ८. (ते) छोटे आतडे |  ९. (ते) मोठे आतडे |
|  १०. (ते) स्वादुपिंड |  ११. (ते) गुदद्वार | |

शरीरातील आतल्या भागांची नावे ओळखा.




## १२ होणे – साधा वर्तमानकाळ

| सर्वनाम | साधा वर्तमानकाळ 'होणे' |
|---|---|
| मी (पु.) | होतो |
| मी (स्त्री.) | होते |
| आम्ही / आपण | होतो |
| तू (पु.) | होतोस |
| तू (स्त्री.) | होतेस |
| तुम्ही / आपण (आदरार्थी + अ.व.) | होता |
| तो | होतो |
| ती | होते |
| ते | होते / होतं |
| ते (अ.व.) | होतात |
| त्या (अ.व.) | होतात |
| ती (अ.व.) | होतात |

## १२.१ खालील उतारा वाचू या.

अनिता परिचारिका म्हणून काम करते. तिची शिफ्ट सकाळी बरोबर साडेसातला सुरू होते. तिचा नाश्ता घरीच होतो. सगळ्यात आधी ती प्रत्येक रुग्णाचे कार्ड तपासते आणि मगच तिचे काम चालू होते. त्यानंतर ती रुग्णाचे व्हायटल्स (तापमान, रक्तदाब, नाडी) तपासते. मग ती त्यांचे स्पंजिंग करते, औषध देते, 'नाश्ता झाला का?' असा प्रश्न विचारते. कधी कधी ती रुग्णांना इंजेक्शनही देते, सलाईन लावते, त्यांना ऑपरेशनसाठी तयार करते, त्यांचे डिस्चार्ज कार्ड बनवते. दुपारी एक वाजता तिची जेवणाची सुट्टी होते. तिचं जेवण इतर परिचारिकांबरोबर हॉस्पिटलमध्येच होतं. जेवण झाल्यावर ती परत वॉर्डमध्ये एक चक्कर मारते. रुग्णांना 'काही त्रास होतो आहे का?' असं विचारते. चार वाजता तिचे काम संपते.

## १२.२ चूक की बरोबर ते ओळखा.

| | | बरोबर | चूक |
|---|---|---|---|
| १. | अनिताची शिफ्ट सकाळी पावणे सातला सुरू होते. | | |
| २. | तिचा नाश्ता हॉस्पिटलमध्ये होतो. | | |
| ३. | रुग्णाचे कार्ड तपासल्यानंतरच तिचे काम सुरू होते. | | |
| ४. | रुग्णाला त्रास होत असेल तर अनिता त्यांना मदत करते. | | |
| ५. | अनिताचे जेवण हॉस्पिटलमध्येच होते. | | |

## १२.३ खालील वाक्यांत 'होणे' क्रियापदाचे योग्य रूप लिहू या.

१. लोक पावसात भिजतात आणि सर्दी खोकला ..................................

२. पावसाळ्यात अनेक रोग ..................................

३. औषध वेळेवर घेत नाही. मग त्रास ..................................

४. रोज एखादी इमर्जन्सी केस येते आणि हॉस्पिटल मध्ये खूप धावाधाव ..................................

५. इंजेक्शन घेताना मुंगी चावल्यासारखं ..................................

## १३ आजार

| किरकोळ आजार | गंभीर आजार | रोग |
|---|---|---|
| तो ताप – fever | तो मुडदूस – rickets | तो कर्करोग – cancer |
| तो खोकला – cough | तो मूतखडा – kidney stone | तो हृदयविकाराचा झटका – heart attack |
| तो दमा – asthma | तो हिवताप / मलेरिया – malaria | तो हत्तीरोग – elephantitis filaria |
| ती सर्दी – cold | तो डेंगी – dengue | तो धनुर्वात – tetanus |
| ती डोकेदुखी – headache | तो मोतिबिंदू – cataract | तो अर्धांगवायू – paralysis |
| ती पोटदुखी – stomach ache | तो काचबिंदू – glaucoma | तो उच्च रक्तदाब – high blood pressure |
| ती कंबरदुखी – lumbar pain | तो निद्रानाश – insomnia | तो जुलाब – diarrhoea |
| ती दातदुखी – toothache | तो फ्लू – flu | तो क्षय – tuberculosis |
| ती गुडघेदुखी – knee pain | तो विषमज्वर – typhoid | तो मेंदूज्वर – मेनिन्गोकोकल मेनीनजायटीस – meningococal meningitis |
| ती पाठदुखी – backache | तो उष्माघात – heat stroke | तो एड्स – aids |
| ती सांधेदुखी – joint pain | तो टॉन्सिल्स – tonsils | तो हिपेटायटीस – hepatitis |
| ती चक्कर – dizziness | तो ॲपेंडिसायटीस – appendicitis | तो देवीरोग – small pox |
| ती उलटी – vomit | तो रेबीज – rabies | तो कुष्ठरोग/ ते लेप्रसी – leprosy |
| ते पित्त – acidity / bile | तो बद्धकोष्ठ – constipation | त्या कांजिण्या – chicken pox |
| | तो अशक्तपणा – weakness | तो फुफ्फुसाचा क्षय – pulmonary tuberculosis |
| | तो ब्रॉन्कायटीस – bronchitis | तो गनोरिया – gonorrhea |
| | तो नायटा – ringworm | तो नारुरोग – guinea-worm |
| | तो पोलियो – polio | तो ट्रॅकोमा – trachoma |









| | |
|---|---|
| तो डांग्या खोकला – whooping cough | तो परमा – syphilis |
| तो पटकी – cholera | ती अस्थिविरलता – osteoporosis |
| तो अमांश – dysentery | ती नागीण – herpes |
| तो स्कार्लेट फिव्हर – scarlet fever | ती कावीळ – jaundice |

| |
|---|
| तो एन्सेफलायटिस – encephalitis |
| तो धनुर्वात – tetanus |
| तो घटसर्प – diphtheria |
| तो पोटशूळ – colic |
| ती ॲलर्जी – allergy |
| ती चाई – bald spot |
| ती मूळव्याध – piles |
| त्या आकडी कृमी / अँकिलोस्टोमियासिस – hookworms / ancylostomiasis |
| त्या सूत्रकृमी – threadworms |
| ते गळू – abscess |
| ते गालगुंड – mumps |
| ते पित्ताचे खडे – gallstones |
| ते फ्रॅक्चर – fracture |
| ते जर्मन मिझल्स – German measles |
| ते गोलजंत – roundworms / ascariasis |
| ते सालमोनेलोसिस / अन्नातून विषबाधा – salmonellosis |





औषधांच्या प्रयोगशाळेतील एक संशोधक दुसऱ्या संशोधक मित्राला उत्साहाने पण दबक्या आवाजात म्हणाला, “कुणाला सांगू नकोस, पण मी एका क्रांतिकारी औषधाचा शोध लावलाय. हे बघ!”

“अरे वा! तुझे अगदी गुपचूप उद्योग चालू असतात”, मित्र कौतुकाने म्हणाला, “पण कोणत्या रोगावरचं आहे हे औषध?”

संशोधक गंभीर चेहरा करून म्हणाला, “तेच तेवढं शोधायचं राहिलंय.....”

## दृष्टिक्षेप

| | | |
|---|---|---|
| तो मेंदू, ते-<br>brain, -s | ती चक्कर, त्या चकरा<br>fainting | ते ऑपरेशन, ती ऑपरेशने / ऑपरेशनं<br>operation, -s |
| तो उन्हाळा, ते उन्हाळे<br>summer, -s | ती खुर्ची, त्या खुर्च्या<br>chair, chairs | ते फुप्फुस, ती फुप्फुसे / फुप्फुसं<br>lung, -s |
| तो हिवाळा, ते हिवाळे<br>winter, -s | ती लघवी<br>urine | ते यकृत, ती यकृते / यकृतं<br>liver, -s |
| तो पावसाळा, ते पावसाळे<br>rainy season | ती उशी, त्या उश्या<br>pillow, -s | ते स्वादुपिंड, ती स्वादुपिंडे<br>pancreas |
| तो केसपेपर, ते-<br>case paper, -s | ती अँजियोप्लास्टी, त्या-<br>angioplasty | ते हृदय, ती हृदये / हृदयं<br>heart, -s |
| तो टीव्ही, ते-<br>television, -s | ती साखर<br>sugar | ते मूत्रपिंड, ती मूत्रपिंडे / मूत्रपिंडं<br>kidney, -s |
| तो रिपोर्ट, ते-<br>report, -s | ती जखम, त्या जखमा<br>injury, -ies | ते गुदद्वार, ती गुदद्वारे / गुदद्वारं<br>anus |
| तो रुमाल, ते-<br>handkerchief, -s | ती गोळी, त्या गोळ्या<br>tablet, -s | ते पुस्तक, ती पुस्तके / पुस्तकं<br>book, -s |
| तो रक्तदाब, ते-<br>blood pressure | ती सकाळ, त्या सकाळी<br>morning, -s | ते इंजेक्शन, ती इंजेक्शने / इंजेक्शनं<br>injection, -s |
| तो सायटिका, ते-<br>sciatica | ती दुपार, त्या दुपारी<br>afternoon, -s | ते रक्त, ती रक्ते / रक्तं<br>blood |
| तो सी टी स्कॅन, ते-<br>C.T. scan, -s | ती संध्याकाळ, त्या संध्याकाळी<br>evening, -s | ते बिल, ती बिले / बिलं<br>bill, -s |

| | | |
|---|---|---|
| तो कापूस<br>cotton | ती रात्र, त्या रात्री<br>night, -s | ते सीझरियन<br>caesarean |
| तो ब्रदर, ते-<br>brother, -s | ती भाजी, त्या भाज्या<br>vegetable, -s | ते ड्रेसिंग, ती ड्रेसिंगे / ड्रेसिंगं<br>dressing |
| तो दिवस, ते-<br>day, -s | ती बस, त्या बसगाड्या<br>bus,-es | ते वजन, ती वजनं<br>weight, -s |
| | ती छत्री, त्या छत्र्या<br>umbrella, -s | ते सलाईन<br>saline |
| | | ते फ्रॅक्चर, ती फ्रॅक्चरे / फ्रॅक्चरं<br>fracture, -s |

| दर्शक सर्वनाम | क्रियापद | विशेषण | प्रश्नशब्द | इतर शब्द |
|---|---|---|---|---|
| हा (पु॰) – this | येणे – to come | छोटं – small | कधी – when | काळजी घेणे – to take care |
| ही (स्त्री॰) – this | पकडणे – to catch | कडू – bitter | | बचाव करणे – to protect |
| हे (नपुं॰) – this | मोडणे – to break | नवीन – new | | |
| तो (पु॰) – that | होणे – to become | रंगीबेरंगी – colourful | | |
| ती (स्त्री॰) – that | दुखणे – to pain | पांढरा – white | | |
| ते (नपु॰) – that | उठणे – to wake up, get up | मळकट – dirty | | |
| | झोपणे – to sleep | हवेशीर – airy | | |
| | बोलणे – to speak | मोडकी – broken | | |
| | पळणे – to run | | | |
| | तपासणे – to check | | | |
| | जेवणे – to eat | | | |
| | घालणे – to wear / to put on /to insert | | | |

# ४ एक दिवस सूचनांचा










## चला, शिकू या :

- पेशंटना, पेशंटच्या नातेवाईकांना, सफाईकामगारांना, सहकाऱ्यांना सूचना देणे
- आज्ञार्थी क्रियापदे व त्यांची नकारार्थीरूपे
- विशेषणे
- क्रियाविशेषणे : कृपया, लवकर, सावकाश, हळू, भरभर, जपून
- अंक : १०० च्या पुढील
- रंग

**१** **सिस्टर ललिता जनरल वॉर्डमध्ये काम करते. तिची ड्यूटी संध्याकाळी सात वाजता सुरू होते. सर्वप्रथम ती आधीच्या सिस्टरने लिहिलेले रिपोर्ट वाचते. त्यातल्या नोंदी पाहते. त्यानंतर ती राउंडला जाते.**

### १.१ पेशंट नंबर १

**इथे एक लहान मुलगा पेशंट आहे. त्याचा हात फ्रॅक्चर झाला आहे.**

नर्स ललिता : काय सोहम, कसा आहेस?

सोहम : हात दुखतोय.

नर्स ललिता : थोडा दुखणारच. आडवा झोप, मला हात दाखव. हात फार हलवू नकोस.

सोहमची आई : किती दिवस लागतील अजून हात बरा व्हायला?

नर्स ललिता : ते डॉक्टर सांगतील. सोहम, हे औषध घे. आ कर. आणि आता काही दिवस हाताची हालचाल करू नकोस.

**वरील संवाद वाचून क्रियापदांची रूपे लिहू या.**

| अनौपचारिक | वाच | वाच + ऊ = वाचू नकोस |
|---|---|---|
| १. झोपणे | झोप | झोपू नकोस |
| २. दाखवणे | दाखव | ................................... |
| ३. घेणे | ................................... | ................................... |
| ४. करणे | ................................... | ................................... |
| ५. हलवणे | ................................... | ................................... |

### १.२ पेशंट नंबर २

**इथे एक आजी पेशंट आहेत. त्यांचे डोळ्यांचे ऑपरेशन झाले आहे.**

नर्स ललिता : नमस्कार, आजी. आता तब्येत कशी आहे?

आजी : चांगली आहे. धन्यवाद.

नर्स : ड्रॉप्स घालायचे आहेत. झोपा आणि सावकाश डोळे उघडा.

आजी : हो, सिस्टर.

नर्स : डोळे बंद करा आणि दहा मिनिटं अशाच पडून रहा. डोळे उघडू नका. घरी गेल्यावर हे ड्रॉप्स रोज दोन वेळा डोळ्यांत घाला. सारखा डोळ्यांना हात लावू नका.

वरील संवाद वाचून क्रियापदांची रूपे लिहू या.

| **औपचारिक** | **वाचा** | **वाच + ऊ = वाचू नका** |
|---|---|---|
| १. झोपणे | झोपा | झोपू नका |
| २. उघडणे | ................................. | ................................. |
| ३. राहणे | ................................. | ................................. |
| ४. घालणे | ................................. | ................................. |
| ५. लावणे | ................................. | ................................. |

वरील सर्व सूचना ह्या आज्ञार्थी आहेत. 'तुम्ही' हे औपचारिक आणि आदरार्थी आहे, तर 'तू' हे अनौपचारिक आहे.

## १.३ खालील तक्ता भरू या.

| | तू | | तुम्ही | |
|---|---|---|---|---|
| करणे | कर | करू नकोस | .................. | करू नका |
| उघडणे | .................. | .................. | उघडा | .................. |
| सांगणे | सांग | .................. | .................. | .................. |
| लावणे | .................. | .................. | लावा | .................. |
| काढणे | .................. | .................. | .................. | .................. |
| ठेवणे | .................. | .................. | .................. | .................. |
| उचलणे | .................. | .................. | .................. | .................. |
| येणे | ये | | या | .................. |

## १.४ जोड्या जुळवून वाक्ये बनवू या.

| | |
|---|---|
| तू | बस / बसा / बसू नकोस / बसू नका<br>ठेव / ठेवा / ठेवू नकोस / ठेवू नका<br>घाल / घाला / घालू नकोस / घालू नका<br>चल / चला / चलू नकोस / चलू नका |
| तुम्ही | काढ / काढा / काढू नकोस / काढू नका<br>बघ / बघा / बघू नकोस / बघू नका<br>पूस / पुसा / पुसू नकोस / पुसू नका<br>लाव / लावा / लावू नकोस / लावू नका |

## १.५ संवाद वाचू या आणि आज्ञार्थी क्रियापदे ओळखून अधोरेखित करू या.



सिस्टर लता : अरे राजन, ३ नंबरची खोली साफ केलीस का?

राजन : नाही, मी विसरलो.

सिस्टर लता : आणि वॉर्ड नंबर ४ मधील पाण्याचं पिंप भरलंस का?

राजन : नाही. ते पण विसरलो.

सिस्टर लता : अरे, असं कसं विसरतोस? आधी खोली नंबर ३ साफ कर, मग पाण्याचं पिंप भरून ठेव.

राजन : हो.

सिस्टर लता : मग डॉक्टर शर्मांची खोली पूस आणि इथला कचरा टाक. झोपा काढू नकोस.

राजन : करतो, सिस्टर.

सिस्टर लता : आणि त्यानंतर ही गोळी घ्यायला विसरू नकोस.

राजन : ही कसली गोळी?

सिस्टर लता : न विसरण्याची!

## १.६ तुम्ही तुमच्या रुग्णालयातील सफाई कामगारांना कोणत्या सूचना द्याल? तू आणि तुम्ही या दोन्ही सर्वनामांसाठी वाक्ये बनवू या.

१. वॉर्डची सफाई करणे

२. फरशी पुसणे

३. संडास आणि बाथरुम स्वच्छ करणे

४. कचरा टाकणे

५. सामान आवरणे

६. साफ करणे

७. डेटॉलने धुणे

८. फर्निचर पुसणे

### १.७ काही क्रियापदांची आज्ञार्थी आणि आज्ञार्थी नकारात्मक रूपे थोडी वेगळी असतात. कोणती ते पाहू या.

| क्रियापद | तू | तुम्ही | तू (नकारार्थी) | तुम्ही (नकारार्थी) |
|---|---|---|---|---|
| राहणे | राहा / रहा | राहा / रहा | राहू नकोस | राहू नका |
| पाहणे | पाहा / पहा | पाहा / पहा | पाहू नकोस | पाहू नका |
| वाहणे | वाहा / वहा | वाहा / वहा | वाहू नकोस | वाहू नका |
| जाणे | जा | जा + ऊ | जाऊ नकोस | जाऊ नका |
| खाणे | खा | खा + ऊ | खाऊ नकोस | खाऊ नका |
| घेणे | घे | घ्या | घेऊ नकोस | घेऊ नका |
| देणे | दे | द्या | देऊ नकोस | देऊ नका |
| होणे | हो | व्हा | होऊ नकोस | होऊ नका |

कधी कधी – 'नको करूस, नको जाऊस, नको लिहूस...' असेही म्हणतात.

## २ खालील संवाद वाचू या.

**१) सिस्टर कुसुमला उद्या रजा हवी आहे. ती मेट्रन मॅडमकडे येते.**

कुसुम : नमस्कार मॅडम, हा माझा रिपोर्ट एकदा जरा पाहा नं.

मेट्रन : हो पाहते. इथे ठेव.

कुसुम : मॅडम, मला उद्या रजा हवी आहे. या रजेच्या अर्जावर सही करा नं.

मेट्रन : कशासाठी हवी आहे रजा?

कुसुम : मला उद्या जरा बाहेर जायचं आहे.

मेट्रन : ठीक आहे. देते.

**२) सिस्टर कुसुम, सिस्टर ललिता आणि ब्रदर रमेश यांच्यातील संवाद वाचू या.**

सिस्टर कुसुम : सिस्टर ललिता, आज मला घरी लवकर जायचं आहे. मला मदत कर नं.

सिस्टर ललिता : कसली मदत?

सिस्टर कुसुम : रूम नंबर ६ मधल्या बाळाला संध्याकाळी सहा वाजता हे इंजेक्शन दे.

सिस्टर ललिता : हो, देते.

सिस्टर कुसुम : ब्रदर रमेश, तूपण एक मदत कर नं. रूम नंबर ३ मधील पेशंटला रूम नंबर १ मध्ये आण नं.

ब्रदर रमेश : हो, आणीन. पण तुला इतक्या घाईनं कुठे जायचं आहे?
सिस्टर कुसुम : मला आज सिनेमाला जायचं आहे.
सिस्टर ललिता : ओ हो! मग उद्या आम्हाला सिनेमा कसा होता ते सांग.
सिस्टर कुसुम : नक्की.

## २.१ विनंतीरूपे अशी तयार होतात.

| क्रियापद | तुम्ही | तू | |
|---|---|---|---|
| | | पु. | स्त्री. |
| करणे | करता का? | करतोस का? | करतेस का? |
| देणे | देता का? | देतोस का? | देतेस का? |

## २.२ वरील संवादातील क्रियापदे शोधू या आणि त्यांची विनंतीरूपे लिहू या.

| क्रियापद | | विनंतिरूपे | |
|---|---|---|---|
| | तुम्ही | तू | |
| | | पु. | स्त्री. |
| पाहणे | पाहता का? | .......................... | .......................... |
| देणे | .......................... | .......................... | .......................... |
| करणे | .......................... | .......................... | .......................... |
| आणणे | .......................... | .......................... | आणशील का? |
| सांगणे | .......................... | .......................... | .......................... |

## २.३ दिलेल्या क्रियापदाचे योग्य रूप लिहून गाळलेल्या जागा भरू या.

१. अगं अनिता, माझे कागद इथे .......................... का? (ठेवणे)
२. अरे अरुण, मला एक गोष्ट .......................... का? (सांगणे)
३. मिस्टर काळे, जरा वेळ इथे .......................... का? (बसणे)
४. सिस्टर रजनी, तुम्ही पेशंटचे वजन .......................... का? (बघणे)
५. ब्रदर संदीप, जरा डॉक्टरांना .......................... का? (बोलावणे)

## ३ चला, अंक कसे बनतात ते पाहू या.

१०१ – एकशे एक → १ × शे (१००) + १

१०२ – एकशे दोन → १ × शे (१००) + २

१०३ – एकशे तीन → १ × शे (१००) + ३

२०० – दोनशे → २ × शे (२००)

२०१ – दोनशे एक → २ × शे (२००) + १

३०० – तीनशे → ३ × शे (३००)

४०० – चारशे → ४ × शे (४००)

५०० – पाचशे → ५ × शे (५००)

१००० – एक हजार / हजार → १ × हजार

२००० – दोन हजार → २ × हजार



### ३.१ ऐकू या आणि योग्य क्रमांकाला अधोरेखित करू या.

१. २०६ – १०५ – ७०४

२. २२२ – ५८४ – १११

३. १०२३ – ९२१ – ५३३

४. १६७ – ६७१ – ७६१

५. १००१– २१०२ – १०१

६. ४३६ – ३४६ – ६४३

७. ९९६ – ७७६ – ८३२

### ३.२ खालील क्रमांक अंकांत लिहू या.

१. एकशे दहा ..............................

२. तीनशे सतरा ..............................

३. सातशे सत्तर ७७०

४. आठशे अठ्ठ्याहत्तर ..............................

५. एक हजार नऊ ..............................

६. नऊशे नव्व्याण्णव ..............................

७. सहाशे एकावन्न ..............................

८. दोनशे वीस ..............................

९. चारशे पंचवीस ..............................

### ३.३ जोड्या जुळवू या.

| | |
|---|---|
| क | ९ : १५ : ५९ |
| ख | ११ : ४५ : ५० |
| ग | ५ : ४० : २० |
| घ | ७ : ०३ : ३४ |
| च | ६ : ५६ : ३२ |

| | |
|---|---|
| १. | अकरा वाजून पंचेचाळीस मिनिटे आणि पन्नास सेकंद. |
| २. | पाच वाजून चाळीस मिनिटे आणि वीस सेकंद. |
| ३. | सात वाजून तीन मिनिटे आणि चौतीस सेकंद. |
| ४. | सहा वाजून छपन्न मिनिटे आणि बत्तीस सेकंद. |
| ५. | नऊ वाजून पंधरा मिनिटे आणि एकोणसाठ सेकंद. |

### ४ योग्य जोड्या लावू या.

१. बाळ **हळूहळू** रांगते.

२. डॉ॰ शर्मा फार **मोठ्याने** बोलतात.

३. आजोबा **सावकाश** चालतात.

४. गाडी **भरभर** जाते.

५. इथे **ओलं** आहे. जपून चाला.

अ


ब


क


ड


ई


१. ...................... २. ...................... ३. ...................... ४. ...................... ५. ......................

### ४.१ खालील प्रश्नांची उत्तरे द्या.

१. ट्रेन कशी जाते?
२. हत्ती कसा चालतो?
३. बैलगाडी कशी जाते?
४. गोगलगाय कशी चालते?
५. घोडा कसा पळतो?

हळूहळू जोरात वेगात
सावकाश भरभर

## ४.२ खालील सूचना वाचून रुग्णालयात 'हे करा' व 'हे करू नका' च्या तत्त्वामध्ये लिहू या.

- फोनवर मोठ्याने बोलू नका.
- इथे कचरा टाकू नका.
- पेशंटची खोली स्वच्छ ठेवा.
- रुग्णाला भेटायची वेळ पाळा.
- रुग्णाच्या खोलीत जास्त वेळ थांबू नका.
- रुग्णालयात स्वच्छता राखा.
- रुग्णालयातील कर्मचाऱ्यांशी वाद घालू नका.
- शांतता राखा.
- रुग्णालयाचे बिल वेळेवर भरा.
- रुग्णाला बाहेरील जेवण देऊ नका.
- डॉक्टरांच्या सूचनांचे पालन करा.
- रांगेत उभे राहा.
- अपॉईंटमेंट शिवाय डॉक्टरांना भेटू नका.
- रुग्णालयात धूम्रपान करू नका.

| हे करा | हे करू नका |
|---|---|
| .................................................................. | .................................................................. |
| .................................................................. | .................................................................. |
| .................................................................. | .................................................................. |
| .................................................................. | .................................................................. |
| .................................................................. | .................................................................. |
| .................................................................. | .................................................................. |
| .................................................................. | .................................................................. |

## ४.३ तुम्ही काय सांगाल?

१. एका पेशंटचे नातेवाईक जोरजोरात बोलत आहेत.
- ☐ कृपया, जोरात बोलू नका.
- ☐ सावकाश चाला.

२. एका पेशंटला इंजेक्शन द्यायचे आहे.
- ☐ जोरात श्वास घ्या.
- ☐ हळूहळू एका कुशीवर वळा.

३. पेशंटला भेटायची वेळ संपली आहे, तरीही त्याचे नातेवाईक खोलीत आहेत.
- ☐ भेटायची वेळ संपली आहे. आता निघा.
- ☐ झोपायची वेळ झाली आहे.

४. एका पेशंटचे रक्त घ्यायचे आहे. त्याला सुई टोचायची आहे.
- ☐ मूठ घट्ट बंद करा.
- ☐ पाय खाली ठेवा.

५. एका पेशंटला बेडपॅन द्यायचे आहे.
- ☐ मूठ घट्ट बंद करा.
- ☐ सावकाश कंबर वर उचला.

## ४.४ तुमच्या रुग्णालयात या पाट्या कुठे दिसतात का ते पाहा व वाचायचा प्रयत्न करा. याच प्रमाणे आणखी दोन पाट्या लिहायचा प्रयत्न करा.
















१



.........................................................

.........................................................

.........................................................

.........................................................

२



.........................................................

.........................................................

.........................................................

.........................................................

## ५ रंग ओळखू या.

तुम्हाला कोणता रंग आवडतो?




### ५.१ वाचू या.

**हा बॉल आहे.**

बॉलचा रंग कोणता आहे?

हा बॉल निळा आहे.

निळा बॉल अनिताला खूप आवडतो.

अनिताकडे खूप निळे बॉल आहेत.



**ही छत्री आहे.**

छत्रीचा रंग कोणता आहे?

ही छत्री निळी आहे.

निळी छत्री जिमची आहे.

जिमकडे भरपूर निळ्या छत्र्या आहेत.



**हे पुस्तक आहे.**

पुस्तकाचा रंग कोणता आहे?

पुस्तक निळे आहे.

निळे पुस्तक अमितचे आहे.

निळी पुस्तके अमितकडे फार नाहीत.



## ५.२ खालील तक्ता भरू या.

| विशेषण | पु.ए.व. | पु.अ.व. | स्त्री.ए.व. | स्त्री.अ.व. | नपु.ए.व. | नपु.अ.व. |
|---|---|---|---|---|---|---|
| निळा | निळा बॉल | निळे बॉल | निळी छत्री | निळ्या छत्र्या | निळे पुस्तक | निळी पुस्तके |
| पिवळा | ................ | ................ | ................ | ................ | ................ | ................ |
| पांढरा | ................ | ................ | ................ | ................ | ................ | ................ |
| काळा | ................ | ................ | ................ | ................ | ................ | ................ |
| हिरवा | ................ | ................ | ................ | ................ | ................ | ................ |

## ५.३ गाळलेल्या जागा भरू या.



१. पांढरी गोळी

................ गोळ्या





२. लाल-पिवळी गोळी

................ गोळ्या



पण....




रंगांची ही नावे लिंगवचनानुसार बदलत नाहीत.
उदा. लाल गाल, लाल छत्री, लाल पुस्तक आणि लाल पेन्सिली.


लाल गोळी


लाल गोळ्या

## ५.४ संवाद वाचू आणि ऐकू या.

सिस्टर प्रेमा : नमस्कार, कदमआजी, आता तब्येत कशी आहे?

कदमआजी : तब्येत ठीक आहे.

सिस्टर प्रेमा : आता ऐका. डॉक्टरांनी तुम्हाला या गोळ्या घ्यायला सांगितलं आहे. यातली निळी गोळी फक्त सकाळी एकदा, गुलाबी आणि पांढरी दुपारी जेवण झाल्यावर आणि रात्री ही पांढरी गोळी. समजलं का?

कदमआजी : हो. गुलाबी गोळी सकाळी आणि निळी रात्री.

सिस्टर प्रेमा : नाही हो आजी. निळी सकाळी आणि गुलाबी दुपारी जेवण झाल्यावर.

कदमआजी : बरं, गुलाबी सकाळी.

सिस्टर प्रेमा : नाही, नीट ऐका, निळी गोळी सकाळी एकदा.

कदमआजी : निळी गोळी सकाळी एकदा.

सिस्टर प्रेमा : एक गुलाबी आणि एक पांढरी दुपारी जेवण झाल्यावर आणि रात्री फक्त पांढरी. आता समजलं का?

कदमआजी : हो समजलं, धन्यवाद सिस्टर.

**संवाद वाचून उत्तरे लिहू या. कदमआजींना सिस्टर प्रेमा काय सांगते?**

१. निळी गोळी केव्हा घ्यायची आहे?

.......................................................................................................................................................

२. जेवण झाल्यावर कोणत्या गोळ्या घ्यायच्या आहेत?

.......................................................................................................................................................

३. रात्री कोणती गोळी घ्यायची आहे?

.......................................................................................................................................................

## ६ आपले शरीर



१. (ती) मान



२. (तो) खांदा



३. (ती) छाती



४. (तो) स्तन



५. (ते) पोट



६. (तो) पाय

| दृष्टिक्षेप | | |
|---|---|---|
| तो मुलगा, ते मुलगे<br>boy, -s | ती आजी, त्या आज्या<br>grandmother, -s | ते बाळ, ती बाळे / बाळं<br>baby, -ies |
| तो नातेवाईक, ते-<br>relative, -s | ती गोष्ट, त्या गोष्टी<br>story, -ies | |
| तो वॉर्ड, ते-<br>ward, -s | ती फरशी, त्या फरश्या<br>floor, -s | |
| तो चेंडू, ते-<br>ball, -s | ती पेन्सिल, त्या पेन्सिली<br>pencil, -s | |
| तो कचरा<br>garbage | ती बाथरूम, त्या-<br>bathroom, -s | |
| तो संडास, ते-<br>toilet, -s | | |

| क्रियापद<br>Verb | सर्वनाम<br>Pronouns | प्रश्नशब्द<br>Question words |
|---|---|---|
| काढणे – to remove / to draw | तू | कुठे – where |
| घालणे – to wear | तुम्ही | कसा – how |
| उघडणे – to open | मी | कोणता – which |
| लावणे – to apply, to close | ते | कशी – how |
| करणे – to do | | का – why |
| उचलणे – to pick up | | केव्हा – when |
| आणणे – to bring | | |
| ठेवणे – to keep | | |
| हलवणे – to shake, to move | | |
| घेणे – to take | | |
| होणे – to happen | | |
| खाणे – to eat | | |
| जाणे – to go | | |
| देणे – to give | | |

| शिष्टाचारशब्द<br>Courtesy Words |
|---|
| धन्यवाद – thanks |

# ५ आता तब्येत कशी आहे?



## चला, शिकू या :

- महत्त्वाची लक्षणे तपासणे व नोंद करणे
- आढावा घेणे
- कोणाचा, कोणाची, कोणाचे, कोणाच्या
- षष्ठी विभक्ती – सर्वनाम, माझा, माझी
- अप्रत्ययीकर्म
- रीतिवाचक क्रियाविशेषण अव्यय – आपोआप, उगीच

## १ रुग्णालयात एक नवीन परिचारिका रुजू झाली आहे. तिच्याबरोबरचा संवाद वाचू या.

मेट्रन : नमस्कार, सिस्टर सविता. या रुग्णालयात तुमचं स्वागत आहे.
सिस्टर सविता : धन्यवाद, मेट्रन कामिनी.
मेट्रन : आज तुमचा पहिला दिवस आहे. तुमची कामं समजावते.
सिस्टर सविता : ठीक आहे.
मेट्रन : माझ्याबरोबर वॉर्ड नंबर पाचमध्ये चला. तिथे एक अपघात झालेला पेशंट आहे. त्याच्या बेडवरची चादर बदला.
सिस्टर सविता : ठीक आहे, मॅम.
मेट्रन : नंतर त्याचं टेम्परेचर (तापमान) पाहा.
सिस्टर सविता : ९८° आहे.
मेट्रन : म्हणजे नॉर्मल आहे. त्याची या कागदावर नोंद करा.
सिस्टर सविता : ओके, मॅडम.
मेट्रन : आता त्याची नाडी पाहा. त्याची नोंद करा. रक्तदाब किती आहे तेही पाहा.
सिस्टर सविता : रक्तदाब थोडा जास्त आहे.
मेट्रन : इथे लिहा आणि डॉक्टर आले की त्यांना सांगा.
सिस्टर सविता : ठीक आहे. यांचं स्पंजिंग उद्या सकाळी करायचं ना?
मेट्रन : हो, सकाळी सहा वाजता. आणि जखमेचं ड्रेसिंगही उद्याच बदलायचं.
सिस्टर सविता : ओके.
मेट्रन : आता दुसऱ्या पेशंटकडे जाऊ या. या पेशंटला किडनीचा त्रास आहे.
सिस्टर सविता : यांना आत्ता औषध द्यायचं का?
मेट्रन : हो. या दोन गोळ्या द्या. आज ४ वाजता त्यांची लघवी तपासायला पाठवायची आहे.
सिस्टर सविता : करते, मॅडम.

### १.१ संवाद वाचून खालील प्रश्नांची एका शब्दात उत्तरे लिहू या.

१. वॉर्ड नंबर ५ मधील पेशंटला काय झाले आहे?

..................................................................................................................................

२. पेशंटचा ताप किती आहे?

..................................................................................................................................

३. पेशंटचे स्पंजिंग किती वाजता करायचे आहे?

..................................................................................................................................

### १.२ संवाद वाचून सिस्टर सविताच्या कामांची यादी लिहू या.

१. टेम्परेचर पाहणे

२. ..............................

३. ..............................

४. ..............................

५. ..............................

६. ..............................

### १.३ हे करायला कोणती वस्तू लागते?

१. टेम्परेचर पाहणे

२. छातीचे ठोके तपासणे

३. लघवी मापणे

४. रक्तदाब तपासणे

५. इंजेक्शन देणे

अ. सुई / सिरींज

ब. थर्मामीटर

क. बी॰पी॰ तपासण्याचे मशीन

ड. स्टेथोस्कोप

ई. युरीन पॉट

### १.४ परिचारिकांना लागणाऱ्या साहित्यापैकी ९ वस्तू इथे आहेत. त्या शोधू या आणि लिहू या.

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| का | पू | स | ळ | सु | ई | से | ब | का |
| झा | द | ला | क | न | न | ण | बा | त्री |
| प | अ | आ | यु | री | न | पॉ | ट | ब |
| बँ | मा | ज | क | य | ळा | ह | र | ज |
| डे | स | ग | क | रा | प | यु | थ | जा |
| ज | ला | बे | ड | पॅ | न | ख | र्मा | ओ |
| प | ई | ला | पा | बे | ज | का | मी | नी |
| ट्टी | न | झे | हा | पी | ण | ने | ट | बे |
| नी | ळ | सॅ | नि | टा | य | झ | र | जे |

१. .................. ४. .................. ७. ..................

२. .................. ५. .................. ८. ..................

३. .................. ६. .................. ९. ..................

## १.५ अधोरेखित शब्द चुकले आहेत. योग्य शब्द वापरू या.

**उदा.** पेशंटला संडासला लागली आहे. त्याला सलाईन हवंय.

पेशंटला संडासला लागली आहे. त्याला **बेडपॅन** हवंय.

१. पेशंटची इंजेक्शनची वेळ झाली आहे. थर्मामीटर कुठे आहे?

..........................................................................................

२. पेशंटला हाताला लागलं आहे. मी त्याला हात बांधते.

..........................................................................................

३. तुमचे हात बँडेजपट्टीने स्वच्छ धुवा.

..........................................................................................

४. लघवीला जायचं आहे का? सिरिंज हवाय का?

..........................................................................................

५. पेशंटचा ताप मोजायचा आहे. बेडपॅन शोधते आहे.

..........................................................................................

६. डॉक्टर जाधव दंतवैद्य आहेत. ते आता अस्थिरोग विभागात आहेत.

..........................................................................................

७. तुमचा रक्तदाब तपासायचा आहे. डेटॉल दाखवा.

..........................................................................................

८. त्याचा पाय फ्रॅक्चर झाला आहे. दंतचिकित्सा विभागात पाठवा.

..........................................................................................

## २ खालील चित्रे पाहून गाळलेल्या जागा भरू या.

| | | |
|---|---|---|
|  |  |  |
|  |  |  |

(रमाची छत्री, सिस्टर अंजलीचा चष्मा, डॉक्टर सुराणांचा मुलगा, मामाची गाडी, रोहनचे घर, साहिलचे सामान)

१. ........................................................................................ नवीन आहे.

२. ........................................................................................ लाल रंगाची आहे.

३. ........................................................................................ दहा वर्षांचा आहे.

४. ........................................................................................ कुठे आहे?

५. ........................................................................................ मोठे आहे.

६. ........................................................................................ जोरात धावते.

विभक्ती म्हणजे नाम किंवा सर्वनाम यांचे वाक्यातील क्रियापदाशी किंवा इतर शब्दांशी येणारे संबंध.
हे संबंध दाखवण्यासाठी शब्दांना जी अक्षरे जोडली जातात, त्यांना विभक्तीचे प्रत्यय म्हणतात.
उदा. सिस्टर अंजलीचा चष्मा, मामाची गाडी, रोहनचे घर
वरील वाक्यांमध्ये चा, ची आणि चे ही अक्षरे विभक्तीचे प्रत्यय आहेत.



ते घर / ती घरं



तो चष्मा / ते चष्मे



ती गाडी / त्या गाड्या

| एकवचन | | अनेकवचन |
|---|---|---|
| अंजलीचा चष्मा | त्याचप्रमाणे... | अंजलीचे चष्मे |
| मामाची गाडी | | मामाच्या गाड्या |
| रोहनचे घड्याळ | | रोहनची घड्याळे |

## २.१ चूक की बरोबर ते ओळखा आणि खूण करा. चूक असल्यास बरोबर लिहू या.

| | बरोबर | चूक | बरोबर वाक्य |
|---|---|---|---|
| उदा. अंजलीची चष्मा नवीन आहे. | | ✘ | अंजलीचा चष्मा नवीन आहे. |
| १. प्रदीपचा वॉर्ड डावीकडे आहे. | | | ........................................... |
| २. सकीनाचा थर्मामीटर मिळत नाहीये. | | | ........................................... |
| ३. भूषणच्या गाडीच्या चाव्या हिरव्या रंगाच्या आहेत. | | | ........................................... |
| ४. रामचे पुस्तक टेबलाच्या खाली आहे. | | | ........................................... |
| ५. सुनिताची फाईल इथे नाहीये. | | | ........................................... |

## २.२ योग्य जोड्या जुळवून संवाद लिहू या.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | ती पिशवी | | रंजना |
| २. | तो मोबाईल | | सुरेश |
| ३. | ते घड्याळ | | सकीना |
| ४. | ते घर | कोणाचा? | अमित आणि सुनिता |
| ५. | ती साडी | कोणाची? | जॉर्ज |
| ६. | ते पेन | कोणाचं? | ललिता |
| ७. | तो स्टेथोस्कोप | | अदिती |
| ८. | तो कॉम्प्युटर | | अक्षय आणि राज |
| ९. | ते पुस्तक | | सई आणि मोहित |
| १०. | ती खोली | | लेलेकाका |

उदा॰ :

अ : ती पिशवी कोणाची आहे?

ब : ती पिशवी रंजनाची / सुरेशची / अमित आणि सुनीताची आहे.



.............................................. ..............................................

.............................................. ..............................................

.............................................. ..............................................

.............................................. ..............................................

.............................................. ..............................................

.............................................. ..............................................

.............................................. ..............................................

.............................................. ..............................................

.............................................. ..............................................

.............................................. ..............................................

## २.३ वाचू या.

| तो | ती | ते |
| --- | --- | --- |
| <br>रोहन + (तो) चष्मा =<br>रोहनचा चष्मा =<br>त्याचा चष्मा | <br>राधिका + (तो) चष्मा =<br>राधिकाचा चष्मा =<br>तिचा चष्मा | <br>बाळ + (ते) खेळणे / खेळणं<br>= बाळाचं खेळणे / खेळणं<br>= त्याचं खेळणे / खेळणं |
| <br>गणेश + (ती) बहीण =<br>गणेशची बहीण =<br>त्याची बहीण | <br>सारा + (ती) बहीण =<br>साराची बहीण =<br>तिची बहीण | – |
| <br>अनिल + (ते) पुस्तक =<br>अनिलचे / अनिलचं पुस्तक<br>= त्याचे / त्याचं पुस्तक | <br>सीता + (ते) पुस्तक =<br>सीताचे / सीताचं पुस्तक<br>= तिचे / तिचं पुस्तक | – |
| अनेकवचन : त्याचे<br>चष्मे, त्याच्या बहिणी,<br>त्याची पुस्तके / पुस्तकं | अनेकवचन : तिचे<br>चष्मे, तिच्या बहिणी,<br>तिची पुस्तके / पुस्तकं | अनेकवचन : त्याचे<br>चष्मे, त्याच्या बहिणी,<br>त्याची पुस्तके / पुस्तकं |

**लक्षात ठेवा :**

| | |
|---|---|
| प्रश्न (पुल्लिंगी) - कोणाचा? | उत्तर (पुल्लिंगी) - रोहनचा / त्याचा / तिचा |
| प्रश्न (स्त्रीलिंगी) - कोणाची? | उत्तर (स्त्रीलिंगी) - रोहनची / त्याची / तिची |
| प्रश्न (नपुंसकलिंग) - कोणाचे? | उत्तर (नपुंसकलिंग) - रोहनचे / त्याचे / तिचे |

### २.४ गाळलेल्या जागा भरू या. (त्याचा, त्याची, त्याच्या, त्याचे, तिचा, तिची, तिचे)

१. ते बाळ (बाटली) – ............................................. बाटली

२. प्रदीप (खुर्ची ) – ............................................. खुर्ची

३. रझिया (मोजे) – ............................................. मोजे

४. पेशंट (गोळ्या) – ............................................. गोळ्या

५. सिस्टर रोझी (फाईल) – ............................................. फाईल

### २.५ माझा, माझी, माझे / माझं



## २.६ खालील तक्ता वाचू या.

| | पु. ए. / अ. (चष्मा / चष्मे) | स्त्री. ए. / अ. (वही / वह्या) | नपुं. ए. / अ. (पुस्तक / पुस्तके / पुस्तकं) |
|---|---|---|---|
| मी | माझा / माझे | माझी / माझ्या | माझे / माझं / माझी |
| तू | तुझा / तुझे | तुझी / तुझ्या | तुझे / तुझं / तुझी |
| तो / ते | त्याचा / त्याचे | त्याची / त्याच्या | त्याचे / त्याचं / त्याची |
| ती | तिचा / तिचे | तिची / तिच्या | तिचे / तिचं / तिची |
| आम्ही | आमचा / आमचे | आमची / आमच्या | आमचे / आमचं / आमची |
| आपण | आपला / आपले | आपली / आपल्या | आपले / आपलं / आपली |
| तुम्ही | तुमचा / तुमचे | तुमची / तुमच्या | तुमचे / तुमचं / तुमची |
| ते / त्या / ती | त्यांचा / त्यांचे | त्यांची / त्यांच्या | त्यांचे / त्यांचं / त्यांची |

## २.७ वाचू आणि ऐकू या. वाचताना उताऱ्यातील षष्ठीची रूपे अधोरेखित करू या.

नमस्कार! माझे नाव सुनिता. मी केरळची आहे. माझे गाव छोटे आहे. माझे आई-बाबा सरकारी नोकरीत आहेत. माझा छोटा भाऊ शाळेत शिकतो. मी सध्या नागपूरमध्ये राहते. माझ्या रुग्णालयाचे नाव सूर्या रुग्णालय आहे. माझं काम रुग्णांना मदत करणे आहे. त्यांची माहिती लिहून घेणे, विचारपूस करणे, औषध देणे, स्वच्छता करणे, ही सुद्धा माझी कामे आहेत. या रुग्णालयात माझ्या अनेक मैत्रिणी आहेत. माझे साहाय्यकही अतिशय चांगले आहेत. माझे काम मला खूप आवडते.

## २.८ वरील उताऱ्याप्रमाणे आता स्वतःबद्दल अशीच माहिती लिहू या.

नमस्कार ! माझे नाव .......

## ३ रिकाम्या जागी कंसातील सर्वनामाचे योग्य रूप लिहू या.

१. ही गाडी (तो) त्याची आहे.
२. हा कुत्रा (ते) .................................... आहे.
३. .................................... (मी) खुर्ची नवीन आहे.
४. .................................... (तुम्ही) मुलगी विद्यापीठात शिकवते का?
५. .................................... (तू) मोबाईल कुठे आहे?
६. .................................... (आपण) खोली वातानुकूलित आहे.
७. (तो) .................................... पुस्तक माझ्याकडे आहे.
८. (ती) .................................... नाव कांचन आहे.

### ३.१ योग्य पर्याय निवडू या.

१. .................................... ऑफिस लांब / दूर आहे. (त्याचा – तिचा – त्याचं)

२. .................................... मैत्रीण मुंबईत असते. (माझी – त्यांचा – माझं)

३. .................................... मुलगा डॉक्टर आहे. (माझी – त्यांचा – त्याच्या)

४. अरे सुरेश, .................................... ड्यूटी कधी सुरू होते? (तिच्या – त्याचा – तुझी)

५. .................................... कुटुंब केरळमध्ये राहते. (आमचे – आमच्या – त्यांच्या)

### ३.२ कोणाचा, कोणाची, कोणाचं, कोणाचे? वर्गातल्या काही वस्तू घेऊन खेळू या व खालीलप्रमाणे संवाद करू या.

उदा. ती छत्री – कोणाची

शिक्षिका : ही छत्री कोणाची आहे?

विद्यार्थिनी १ : ही छत्री माझी आहे.

विद्यार्थिनी २ : नाही, ही छत्री तुझी नाहीये, ही छत्री माझी आहे.

सर्व विद्यार्थी : नाही, ही छत्री आमची आहे.

तो फळा, ती बाटली, ते पुस्तक, त्या वह्या, तो फोन, ती फळं.

## ४ संवाद वाचू आणि ऐकू या.

बॉस : काय झालं, सिस्टर कमला? आज तुम्हाला परत उशीर झाला आहे!

कर्मचारी : हो, आज अचानक माझी मावशी आली.

बॉस : अरेच्चा! कालपण तुमची मावशी आली होती ना?

कर्मचारी : नाही, काल मावशीची बहीण आली होती. आज मावशी आली.

बॉस : काल मावशीची बहीण, आज मावशी ... अशी कारणं तुम्ही अनेकदा सांगता.

कर्मचारी : सॉरी, सर, यापुढे असं होणार नाही.

बॉस : आता पटापट कामाला लागा बघू! उगीच वेळ घालवू नका.

### ४.१ वरील संवादात आलेल्या या क्रियाविशेषणांचा अर्थ काय असेल?

| | |
|---|---|
| १. अचानक | अ. भरभर |
| २. अनेकदा | ब. काहीही कारण नसताना |
| ३. पटापट | क. एकदम |
| ४. उगीच | ड. खूप वेळा |

१. ............................... २. ............................... ३. ............................... ४. ...............................

### ४.२ खालील वाक्यांमध्ये योग्य क्रियाविशेषणे लिहू या.

| अनेकदा, अचानक, उगाच, पटापट, भरभर |
|---|

१. मी रस्त्याने जात होते, .................................. पाऊस आला.

२. .................................. चाला. आपल्याकडे वेळ कमी आहे.

३. तुम्हाला .................................. सांगितलं आहे, हे हॉस्पिटल आहे, इथे आवाज करू नका.

४. तू पण पार्टीला ये. .................................. काही तरी कारण देऊ नकोस.

५. दिल्लीला मी .................................. कामासाठी जाते.

६. आज आमच्याकडे .................................. पाहुणे आले.

७. .................................. काम आवरू या. आपली शिफ्ट संपत आली आहे.

८. सात नंबर खोलीमधला पेशंट .................................. हाका मारत असतो.

## ५ अप्रत्यय द्वितीया

पुढील वाक्यांतील क्रियापदे अधोरेखित करा आणि तक्ता भरा.

| | कोण? | काय? |
|---|---|---|
| १. रचना रोज एक सफरचंद <u>खाते</u>. | रचना | सफरचंद |
| २. माझी आजी रोज रात्री गोष्ट सांगते. | .......................... | .......................... |
| ३. पेशंट पाणी मागतोय. | .......................... | .......................... |
| ४. सिस्टर आयव्ही ड्रिप लावतेय. | .......................... | .......................... |
| ५. सकाळी नऊ वाजता आम्ही नाश्ता करतो. | .......................... | .......................... |
| ६. माझ्यासाठी एक सलाईनची बाटली आण. | .......................... | .......................... |

### ५.१ चित्रे पाहून योग्य शब्द लिहू या. (कपडे, शेत, औषध, सफाई, वस्तू, चित्र)



१. शेतकरी .......................... नांगरतो.

२. शिंपी .......................... शिवतो.

३. डॉक्टर .......................... देतो.

४. चित्रकार .......................... काढतो.

५. सफाईकामगार .......................... करतो.

६. दुकानदार .......................... विकतो.

### ५.२ योग्य उत्तर शोधू या.

| | |
|---|---|
| १. सकाळी मुलं काय पितात? | अ. गाणी |
| २. तुला काय हवे आहे? | ब. स्टेथोस्कोप |
| ३. ती काय वाचते? | क. दूध |
| ४. डॉक्टरांना काय हवंय? | ड. घड्याळ |
| ५. सलमा काय ऐकतेय? | ई. औषधांची यादी |

### ५.३ मी कोणता अवयव? ओळखा.

१. माझा रंग पांढरा तर कधी कधी पिवळा पण असतो बरं का. माझ्याशिवाय तुम्ही अन्न चावू शकत नाही. ..............................

२. घड्याळ बांधायचे आहे? माझ्यावर बांधा. ..............................

३. धक-धक धक-धक! माझे ठोके ऐकू आले का? ..............................

४. काय? जरा मोठ्याने बोला. मला ऐकू येत नाही. ..............................

५. वाह! काय मस्त वास आला! ..............................

## ६ परिचारिकांना लागणारे साहित्य वाचू या.

| | | |
|---|---|---|
| तो कापूस<br>cotton | ती औषधाची गोळी, त्या औषधाच्या गोळ्या<br>tablet, -s | ते थर्मामीटर, ती-<br>thermometer, -s |
| स्टेथोस्कोप, ते-<br>stethoscope, -s | ती प्रथमोपचार पेटी, त्या प्रथमोपचार पेट्या<br>first aid box, -es | ते बी.पी.चे मशीन, ती बी.पी.ची मशीने / मशीनं<br>B.P. machine |
| तो ग्लोव, ते ग्लोव्ज<br>glove, -s | ती सिरिंज, त्या-<br>syringe, -s | ते सॅनिटायझर, ती-<br>sanitizer, -s |
| | | ते सेकंदकाटे असलेले घड्याळ<br>a watch with a second hand |
| | | ते इंजेक्शन, ती इंजेक्शने / इंजेक्शनं<br>injection, -s |

| दृष्टिक्षेप | | |
|---|---|---|
| तो अपघात, ते-<br>accident, -s | ती नस, त्या नसा<br>vein, -s | ते सफरचंद, ती सफरचंदे / सफरचंदं<br>apple, -s |
| तो फळा, ते फळे<br>blackboard, -s | ती किडनी, त्या किडन्या<br>kidney, -s | ते फळ, ती फळे / फळं<br>fruit, -s |
| तो रस्ता, ते रस्ते<br>road, -s | ती चावी, त्या चाव्या<br>key, -s | ते कुटुंब, ती कुटुंबे / कुटुंबं<br>family, -ies |
| तो पाऊस<br>rain | ती सुई, त्या सुया<br>needle, -s | ते ऑफिस, ती ऑफिसे / ऑफिसं<br>office, -s |
| तो भाऊ, ते-<br>brother, -s | ती बॅग, त्या बॅगा<br>bag, -s | ते गाव, ती गावे / गावं<br>village, -s |
| तो चष्मा, ते चष्मे<br>spectacle, -s | ती साडी, त्या साड्या<br>sari, -s | ते पेन, ती पेने / पेनं<br>pen, -s |
| तो मुलगा, ते मुलगे<br>boy, -s | ती फाईल, त्या फायली<br>file, -s | ते घर, ती घरे / घरं<br>house, -s |
| तो मोबाईल, ते-<br>mobile, -s | ती गाडी, त्या गाड्या<br>car, -s | ते घड्याळ, ती घड्याळे / घड्याळं<br>watch, -es |
| तो कुत्रा, ते कुत्रे<br>dog, -s | ती आई, त्या आया<br>mother, -s | ते टेबल, ती टेबले / टेबलं<br>table, -s |
| तो रक्तदाब<br>blood pressure | ती बहीण, त्या बहिणी<br>sister, -s | |
| तो बाबा, ते-<br>father, -s | ती वही, त्या वह्या<br>notebook, -s | |
| | ती मैत्रीण, त्या मैत्रिणी<br>friend, -s | |
| | ती मावशी, त्या मावश्या<br>aunt, -s | |

| क्रियापद<br>Verb | सर्वनाम<br>Pronouns | प्रश्नशब्द<br>Question words |
|---|---|---|
| नोंदणे – to register | मी – I | काय – what |
| आवडणे – to like | तू – you | कोणाचा – whose |
| धावणे – to run | तो – he | किती – how much / how many |
| | ती – she | कोणता – which |
| | ते – it | कोण – who |
| | आम्ही – we | |
| | आपण – you / we | |
| | तुम्ही – you | |
| | ते / त्या / ती – they | |

# लक्षणे ६



## चला, शिकू या :

- भूतकाळातली गोष्ट किंवा समस्या सांगणे
- सामान्य भूतकाळ
- कालवाचक क्रियाविशेषण – नेहमी, हल्ली, पूर्वी, नंतर, दररोज, काल, सध्या, लगेच
- वेदना आणि उपाय

## १ खालील चित्रे पाहून वाक्याच्या पुढे योग्य चित्राचा क्रमांक लिहू या.


१


२


३


४


५


६

क. माझ्या छातीत कळ येते आहे.

ख. माझी दाढ ठणकते आहे.

ग. माझ्या पोटात गडबड आहे.

घ. मला गुडघेदुखी आहे.

च. माझी कंबर लचकली आहे.

छ. माझे डोकं भणभणतंय.

क. ............... ख. ............... ग. ............... घ. ............... च. ............... छ. ...............

| | | |
|---|---|---|
| कळ येणे (छाती, पोट) | दुखणे (हात, पाय, पोट, दात) | लचकणे (मान) |
| गडबड असणे (पोटात) | ठणकणे (दात, डोकं) | भणभणणे (डोकं) |

### १.१ चर्चा करू या.

पेशंटला वेदना होतायत. नर्स कोणते उपाय करते?

- मलम लावते
- डॉक्टरांना बोलावते
- औषध देते / लावते

## १.२ संवाद वाचू या.

परिचारिका : तुम्हाला काय होतंय?

पेशंट : माझा घसा फार दुखतोय. खूप त्रास होतोय.

परिचारिका : हे औषध घ्या. बरं वाटेल.

## १.३ वरील प्रकारे आणखी संवाद बनवू या.

अ. कंबर लचकली – औषध घेणे.

ब. गुडघा दुखणे – एक्स रे काढणे.

क. दात ठणकणे – गोळी घेणे.

## १.४ शब्द बनवू या. अवयव + दुखी

१. पोट + दुखी = पोटदुखी

२. कंबर + .............................. = ..............................

३. दाढ + .............................. = ..............................

४. डोके + .............................. = ..............................

५. गुडघे + .............................. = ..............................

## १.५ खालील लक्षणे कोणत्या आजारांमध्ये दिसून येतात? त्यावर काय उपचार करता येतात? तक्ता भरू या.

**(ऑपरेशन, डोळे जळजळणे, दातदुखी, जंत)**

| लक्षण | आजार | उपचार |
|---|---|---|
| १. अशक्तपणा | कुपोषण | योग्य आहार |
| २. दाताला ठणका लागणे | | पेनकिलर / वेदनाशामक गोळ्या |
| ३. घशात टोचल्यासारखे होणे | टॉन्सिल्स | |
| ४. | डोळे येणे | डोळ्यात औषध |
| ५. पोटात कळ येणे | | गोळी घेणे |

## २ आता कसं आहे आणि पूर्वी कसं होते?

| आता | पूर्वी |
|---|---|
| <br>आता तिकीट महाग आहे. | <br>पूर्वी बस तिकीट स्वस्त होते. |
| <br>आता माझे केस पांढरे आहेत | <br>पूर्वी माझे केस काळे होते. |
| <br>आता माझी गाडी आधुनिक आहे. | <br>पूर्वी माझी गाडी जुनी होती. |
| <br>आता मी जाड आहे. | <br>पूर्वी मी बारीक होतो |

## २.१ साधा वर्तमानकाळ व साधा भूतकाळ

| सर्वनाम | साधा वर्तमानकाळ 'असणे' | साधा भूतकाळ 'असणे' |
|---|---|---|
| मी (पु.) | आहे | होतो |
| मी (स्त्री.) | आहे | होते |
| आम्ही / आपण | आहोत | होतो |
| तू (पु.) | आहेस | होतास |
| तू (स्त्री.) | आहेस | होतीस |
| तुम्ही / आपण (आदरार्थी / अनेकवचन) | आहात | होता / होतात |
| तो | आहे | होता |
| ती | आहे | होती |
| ते | आहे | होते / होतं |
| ते (अ.व.) | आहेत | होते |
| त्या (अ.व.) | आहेत | होत्या |
| ती (अ.व.) | आहेत | होती |

## २.२ खालील वाक्ये भूतकाळात लिहू या.

१. पेशंटची तब्येत चांगली आहे.

उत्तर – पेशंटची तब्येत चांगली होती.

२. समीर अविवाहित आहे.

उत्तर – ..........................................................................................................................................

३. माझं तुझ्याकडे एक काम आहे.

उत्तर – ..........................................................................................................................................

४. डॉक्टर शीतल ऑपरेशन थिएटरमध्ये आहेत.

उत्तर – ..........................................................................................................................................

५. मी शाहरूखची फॅन आहे.

उत्तर – ..........................................................................................................................................

६. मुलं पिकनिकला गेली आहेत.

उत्तर – ................................................................................................................

७. हॅलो, अनिश, तू आहेस तरी कुठे?

उत्तर – ................................................................................................................

८. आम्ही कामात आहोत.

उत्तर – ................................................................................................................



## ३ 'होतं' की 'नव्हतं'?



१. माझं पेन टेबलावर होतं ना?

छे ! तुझं पेन टेबलावर नव्हतं. ते रुमालावर होतं.

२. माझा रुमाल कपाटावर होता ना?

छे ! तुझा रुमाल कपाटावर नव्हता. तो पिशवीत होता.

३. माझी पिशवी खोलीत होती ना?

छे ! तुझी पिशवी खोलीत नव्हती, ऑफिसमध्ये होती.

४. माझं ऑफिस इथेच होतं ना?

छे ! तुझं ऑफिस इथे नव्हतं, दुसऱ्या बिल्डिंगमध्ये होतं!

### ३.१ वरील संवादाच्या आधारे तक्ता भरू या.

| सर्वनाम | साधा भूतकाळ | साधा (भूतकाळ) नकारात्मक रूप |
|---|---|---|
| मी (पु.) | होतो | नव्हतो |
| मी (स्त्री.) | होते | |
| आंम्ही / आपण | होतो | नव्हतो |
| तू (पु.) | होतास | |
| तू (स्त्री.) | होतीस | नव्हतीस |
| तुम्ही + आपण (आदरार्थी अ.व.) | होतात / होता | नव्हतात / नव्हत्या |

| | | |
|---|---|---|
| तो (पु॰) | होता | |
| ती (स्त्री॰) | होती | |
| ते (नपु॰) | होते / होतं | |
| ते (अ॰व॰) | होते | |
| त्या (अ॰व॰) | होत्या | नव्हत्या |
| ती (अ॰व॰) | होती | |

### ३.२ वाक्यात नकारात्मक रूप लिहून बदल करा.

१. मी काल पुण्यात होतो.

मी काल पुण्यात नव्हतो.

२. आम्ही पावभाजी खात होतो.

..................................................................................................... .

३. त्या वॉर्डमध्ये राउंडसाठी गेल्या होत्या.

..................................................................................................... .

४. डॉक्टर ऑपरेशनसाठी गेले होते.

..................................................................................................... .

५. तू काल मीटिंगला होतास का?

..................................................................................................... .

६. सकाळी थंडी होती.

..................................................................................................... .

७. कालच्या सेमिनारला रिटा आणि प्रीती आल्या होत्या का?

..................................................................................................... .

८. काल मला सुट्टी होती.

..................................................................................................... .

## ३.३ क्रियापदाचे भूतकाळातील रूप ऐकून लिहू या.

हेड नर्स : काल वॉर्ड नंबर चारमध्ये ड्यूटीला तू होतीस का?
सिस्टर सुनिता : नाही. मी (१) .......................................................
हेड नर्स : मग सिस्टर अनिता आणि सिस्टर रेखा होत्या का?
सिस्टर सुनिता : नाही. त्या (२) .......................................................
हेड नर्स : मग होतं कोण?
सिस्टर सुनिता : सिस्टर कामिनीची ड्यूटी होती तिथे.
हेड नर्स : अच्छा. आणि ब्रदर रमेश काल आला होता का?
सिस्टर सुनिता : नाही. तो काल आला (३) ..................................................... त्याची सुट्टी होती.

## ३.४ योग्य उत्तर निवडा.

१. काल शनिवार होता का?
(अ) काल शनिवार नव्हते. ☐
(ब) काल शनिवार नव्हता. ☐
(क) काल शनिवार नव्हतास. ☐

२. पेशंट दातेंची हार्ट सर्जरी होती का?
(अ) नाही, हार्ट सर्जरी नव्हती, किडनी ट्रान्सप्लांट होतं. ☐
(ब) नाही, हार्ट सर्जरी नव्हतं, किडनी ट्रान्सप्लांट होतं. ☐
(क) नाही, हार्ट सर्जरी नव्हते, किडनी ट्रान्सप्लांट होतं. ☐

३. काल तुम्ही रात्रपाळीवर होतात का?
(अ) नाही, आम्ही काल रात्रपाळीवर नव्हते. ☐
(ब) नाही, आम्ही काल रात्रपाळीवर नव्हतास. ☐
(क) नाही, आम्ही काल रात्रपाळीवर नव्हतो. ☐

४. सरिता, काल फिझिओथेरपीला का नाही आलीस?
(अ) काल माझी तब्येत बरी नव्हती. ☐
(ब) काल माझी तब्येत बरी नव्हतं. ☐
(क) काल माझी तब्येत बरी नव्हतो. ☐

| क्रियापद | साधा वर्तमानकाळ | साधा वर्तमानकाळ – नकारात्मक रूप | साधा भूतकाळ | साधा भूतकाळ – नकारात्मक रूप |
|---|---|---|---|---|
| होणे | होतो | होत नाही | झाला | झाला नाही |

## ४ वाचू या. (नेहमी, कधीच नाही, सध्या, दररोज, कधीतरी)




### ४.१ खालील क्रियाविशेषणांचा कोणता क्रम अर्थानुसार तुम्हाला योग्य वाटतो?

१.

दररोज
कधीच नाही
सध्या
नेहमी
कधीतरी

२.

कधीच नाही
कधीतरी
सध्या
दररोज
नेहमी

### ४.२ तुम्ही कधी काय वाचता?

| | नेहमी | सध्या | कधीतरी | दररोज | कधीच नाही |
|---|---|---|---|---|---|
| वर्तमानपत्र | | | | | |
| एस॰एम॰एस॰ | | | | | |
| ई-मेल | | | | | |
| पत्र | | | | | |
| कविता | | | | | |
| पुस्तक | | | | | |
| जाहिराती | | | | | |

## ४.३ वर्गात सांगू या. तुम्ही कोणते काम कधी करता?

| | नेहमी | सध्या | कधीतरी | कधीच नाही |
|---|---|---|---|---|
| सलाईन लावणे | | | | |
| डॉक्टरांशी बोलणे | | | | |
| इंजेक्शन देणे | | | | |
| स्पंजिंग करणे | | | | |
| प्लास्टर काढणे | | | | |
| पेपरवर नातेवाइकांची सही घेणे | | | | |
| ऑपरेशनची तयारी करणे | | | | |
| टाके घालणे | | | | |

## ४.४ रिकाम्या जागेत योग्य क्रियाविशेषण लिहू या.

१. मी ...................................... न चुकता योग करते, पण आज वेळ नव्हता. (दररोज / कधीतरी)
२. हॉस्पिटलमध्ये ...................................... पेशंट कमी आहेत. (नेहमी / सध्या)
३. परिचारिकांनी ...................................... पांढरा गणवेष घालावा. (कधीच / नेहमी)
४. रोझीला ...................................... वेळ नसतो. ती कायम कामात असते. (कधीच / कधीतरी)
५. हॉस्पिटलमध्ये ...................................... शांतता राखावी. (नेहमी / कधीतरी)

## ५ बोलू या. तुम्हाला आता काय करायचंय?

मला आता अभ्यास करायचाय. परवा माझी परीक्षा आहे.

मला भूक लागली आहे. स्वयंपाक करायचाय.

काहीही नाही!

एक ऑपरेशन आहे, त्याची तयारी करायचीय.

मला बँकेत जायचंय. पैसे भरायचेयत.

## ५.१ वाचणे – वाच + आयचे + आहे = वाचायचे आहे किंवा वाचायचंय

१. खाणे – ..................................................

२. करणे – ..................................................

३. झोपणे – ..................................................

पण

येणे – यायचे आहे / यायचंय

देणे – द्यायचे आहे / द्यायचंय

घेणे – घ्यायचे आहे / घ्यायचंय

पिणे – प्यायचे आहे / प्यायचंय

लिहिणे – लिहायचे आहे किंवा लिहायचंय / लिहायचाय / लिहायचीय

उदा॰ तो रिपोर्ट लिहायचाय, ती यादी लिहायचीय, ते ई-मेल लिहायचंय.

## ५.२ तुमच्या मैत्रिणीला तुमच्याबरोबर एक चित्रपट पाहायला जायचं आहे. तुम्हाला तो चित्रपट अजिबात पाहायचा नाहीये. तिला कारण काय द्याल?

१. मला जेवायला जायचंय.

२. मला ..................................................

३. ..................................................

४. ..................................................

५. ..................................................

## ६ विशेष माहिती : पेशंटचे बेड कसे तयार करावे.

### ६.१ जोड्या जुळवू या.

| | |
|---|---|
|  १ | क ब्लँकेट |
|  २ | ख अभ्रा |
|  ३ | ग उशी |
|  ४ | घ प्लॅस्टिक शीट |
|  ५ | ङ गादी |
|  ६ | च पलंग |

१. ............... २. ............... ३. ............... ४. ............... ५. ............... ६. ...............

बिछाना तयार करणे ही एक कला आहे. सरावाने ती जमते. व्यवस्थित तयार केलेल्या बिछान्यावर रुग्णाला चांगला आराम मिळतो आणि बिछाना छान दिसतो. बिछाना व्यवस्थितपणे तयार केलेला नसल्यास रुग्णाला शय्याव्रण (bed sores) होतात. दिवसातून एकदा तरी बिछाना तयार करावा.

## ६.२ ऐकू या आणि गाळलेल्या जागी योग्य शब्द लिहू या.

१. खाटेच्या दोन्ही बाजू .................................. असाव्यात. (मोकळ्या / रिकाम्या)

२. बिछाना .................................. परिचारिकांनी मिळून तयार करावा. (चार / दोन)

३. बिछाना तयार करण्यापूर्वीच त्यासाठी आवश्यक त्या वस्तूंची जमवाजमव ..........................  (करावी / करावा)

४. आपण काय करणार आहोत ते .......................... समजावून सांगावे. (रुग्णाला / नर्सला)

५. जंतुसंसर्ग होऊ नये म्हणून बिछान्याचे ................. जमिनीला लागू देऊ नये. (पाय / कापड)

६. खाटेच्या पायाकडील बाजूपासून सुमारे एक फूट दूरवर ............................ खुर्च्या पाठीला पाठ लावून ठेवाव्यात. बिछान्यावरून काढलेले जुने कपडे ठेवण्यासाठी स्टँडप्रमाणे या खुर्च्यांचा वापर होतो. (चार / दोन)

७. .............................. प्रसार होऊ नये यासाठी बिछान्यावरील कपडे काढताना गुंडाळी करत काढावे. (जंतूंचा / रोगाचा)

८. डॉक्टरांनी परवानगी दिली असेल तर रुग्णाला बिछान्यावरून उठवून आरामखुर्चीत बसायला सांगावे. त्याला थंडी वाजत असेल तर .................................. द्यावे. त्याला आरामखुर्चीत बसणे सुखावह वाटले पाहिजे. (कापड / पांघरूण)

९. बिछान्यावरील सर्व कपडे काढल्यावर .................................. सुरकुत्या नाहीत याची खात्री करावी. आवश्यकता वाटल्यास गादी उलटवून घ्यावी व गादी खाटेच्या वरच्या बाजूस सरकवून घ्यावी. (गादीला / चादरीला)

१०. उश्यांचे अभ्रे बदलू नयेत. मळलेले असल्यास. उश्या .................................. जागेवर ठेवाव्यात. (पूर्वीच्या / नवीन)

११. पांघरूण व ब्लँकेट काढावे. .................................. मळलेले असल्यास बदलावे. पांघरुणाची घडी करून ती गादीच्या पायाकडील बाजूवर पसरावी, त्यावर ब्लँकेटची घडी पसरावी. ब्लँकेट गादीच्या पायाकडील बाजूस खोचून घ्यावे. गादीच्या कोपऱ्याजवळ दोन्ही बाजूंची काटकोनात घडी करावी. (पांघरूण / चादर)

१२. खुर्च्या व इतर फर्निचर जागच्याजागी ठेवावे. खिडक्या उघडाव्यात. दोन्ही परिचारिकांनी आपले .................................. धुऊन घ्यावेत. (पाय / हात)

## ७ कुपोषण

**कुपोषण म्हणजे काय?**

पुरेसा व योग्य आहार न घेतल्यामुळे जी अशक्तपणाची व आजारपणाची परिस्थिती निर्माण होते, तिला कुपोषण म्हणतात. कुपोषण म्हणजे आजार नव्हे; परंतु अयोग्य आहार, उपासमार व जीवनसत्त्वांचा अभाव यांचा परिणाम मुलांच्या शरीरावर होतो. असे मूल लहानशा आजारानेसुद्धा अशक्त दिसू लागते. उदाहरणार्थ, अंगावर सूज येणे, मूल रडके होणे, बाळाची वाढ खुंटणे, वजन व उंची वयाच्या प्रमाणात न वाढणे यालाच कुपोषण म्हणतात.

**कुपोषणाची कारणे :**

१. बाळाला अंगावरचे दूध न पाजणे
२. पुरेसा व पोषक आहार न मिळणे
३. आहारात 'अ' जीवनसत्त्वाचा अभाव
४. सतत आजारी पडणे
५. दोन मुलांमध्ये कमी अंतर



**कुपोषणाची लक्षणे :**

१. वजनात फार हळूहळू वाढ
२. पोटाचा नगारा होणे
३. भूक मंदावणे
४. पाय व कधी कधी तोंड ही सुजणे
५. नेहमी सर्दी किंवा इतर जंतुजन्य आजार होणे

**कुपोषणावर उपाय :**

१. बाळाला सहा महिने आईचे दूध पाजायला सांगावे.
२. दोन मुलांमध्ये कमीत कमी तीन वर्षांचे अंतर असावे.
३. मुलाचे सर्व लसीकरण वेळेत करावे.
४. मुलांना नियमितपणे पोषक व योग्य आहार द्यावा.

### ७.१ तुमच्या रुग्णालयात कुपोषित बालक दाखल झाले आहे. त्याच्या आई-वडिलांना तुम्ही काय सांगाल? खालील वाक्यातील बरोबर वाक्याच्या पुढे ✓ खूण करा.

| | |
|---|---|
| १. बाळाला सतत झोपवून ठेवा. | |
| २. बाळांनां पोषक आहार द्यावा. | |
| ३. बाळाला फक्त दुधाचे पदार्थ द्या. | |
| ४. बाळ फक्त औषध देऊन बरे होईल. | |

८

| | | |
|---|---|---|
| छातीत (त) | काय दुखतंय? | पोट |
| घसा | | डोकं |
| पाय | | हात |
| ................ | | ................ |

## ८.१ कसं दुखतंय?

ठणका लागणे
to have throbbing pain

टोचल्यासारखे दुखणे
to have stinging pain

कळ येणे
to have a sharp shooting pain
सणक भरणे
to have shooting pain

मुंग्या येणे
to have a tingling sensation



| | | | |
|---|---|---|---|
| भणभणणे<br>to ache | ठणकणे<br>to pain | आखडणे<br>to stiffen | सूज येणे<br>to swell |

## ८.२ वेगवेगळ्या प्रकारच्या वेदना

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
|  | उसण भरणे<br>to get a catch in the back / waist / neck | लचक भरणे / चमक भरणे<br>to get a catch | पेटका / गोळा येणे<br>to get cramps | लचकणे<br>to get muscular pain | मुरगळणे<br>to twist |
| खरचटणे<br>to bruise | जखम होणे<br>to be injured | काळं-निळं होणे<br>to turn black and blue | | जखम भरणे<br>to heal | |
| खाज / कंड सुटणे<br>to itch | चट्टे येणे<br>to get rash | लाल होणे<br>to redden | खाजवणे<br>to scratch |  | |
| जळजळ होणे<br>to have burning sensation internally | झोंबणे<br>to have burning sensation externally | आग होणे<br>to have burning sensation | भाजणे<br>to get burnt |  | |
| कळकळणे<br>to feel queasy | मळमळणे<br>to feel nauseous | कसे तरी होणे<br>to feel uneasy | उलटी येणे<br>to vomit |  | |
| अशक्तपणा येणे<br>to have weakness | चक्कर येणे<br>to feel dizzy | बधिर होणे<br>to get numb | | रग लागणे<br>to get numb | |
|  | धाप लागणे<br>to pant | श्वास लागणे<br>to gasp | थंडी भरणे<br>to feel cold | हुडहुडी भरणे<br>to shiver | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ठसका लागणे<br>to cough whilst eating / drinking | उबळ येणे<br>to have a bout of cough | खवखवणे<br>to itch in the throat | उचकी येणे<br>to have hiccups |  |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| पित्त होणे<br>to have acidity | अल्सर होणे<br>to suffer from ulcers | फोड येणे<br>to get blisters | उबाळ येणे<br>to get boils | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| फुटणे<br>to burst | पिकणे<br>to ripen | | |  |

## वाचू या. चिंटू.



| दृष्टिक्षेप | | |
|---|---|---|
| तो नाश्ता<br>breakfast | ती उपासमार<br>starvation | ते पांघरूण, ती पांघरुणे / पांघरुणं<br>covering |
| तो एस. एम. एस, ते-<br>SMS, -s | ती दाढ, त्या दाढा<br>tooth | ते मूल, ती मुलं<br>child, children |
| तो ई-मेल, ते-<br>e-mail, -s | ती भूक, त्या भुका<br>hunger | ते जेवण, ती जेवणे / जेवणं<br>meal, -s |
| तो बिछाना, ते बिछाने<br>bedding, -s | ती कंबर, त्या कंबरा<br>waist, -s | ते वर्तमानपत्र, ती वर्तमानपत्रे / वर्तमानपत्रं<br>newspaper, -s |
| तो अभ्रा, ते अभ्रे<br>pillow cover, -s | ती खिडकी, त्या खिडक्या<br>window, -s | ते पत्र, ती पत्रे / पत्रं<br>letter, -s |
| तो आहार, ते-<br>diet, -s | ती शिफ्ट<br>shift, -s | ते वय, ती वये / वयं<br>age |
| तो जंतू, ते-<br>germ, -s | ती नाडी<br>pulse, -s | ते प्लास्टर<br>plaster, -s |
| | ती सुट्टी, त्या सुट्ट्या<br>holiday, -s | ते कुपोषण<br>malnourishment |
| | ती कविता, त्या कविता<br>poem, -s | ते शरीर, ती शरीरे<br>body, -ies |
| | ती जाहिरात, त्या जाहिराती<br>advertisement, -s | ते जीवनसत्त्व, ती जीवनसत्त्वे / जीवनसत्त्वं<br>vitamin, -s |
| | ती सही, त्या सह्या<br>sign, -s | ते वजन, ती वजने, वजनं<br>weight, -s |
| | ती परीक्षा, त्या परीक्षा<br>exam, -s | ते ब्लँकेट, ती ब्लँकेटे / ब्लँकेटं<br>blanket, -s |
| | ती बँक, त्या बँका<br>bank, -s | ते दूध<br>milk |
| | ती आरामखुर्ची, त्या आरामखुर्च्या<br>rocking chair, -s | ते प्रमाण, ती प्रमाणे / प्रमाणं<br>proportion, -s |

| | | |
|---|---|---|
| | ती गादी, त्या गाद्या<br>mattress, -es | |
| | ती उंची, त्या उंच्या<br>height, -s | |

| क्रियापद<br>Verb | सर्वनाम<br>Pronouns |
|---|---|
| ठणकणे; दुखणे; भणभणणे – to pain | मी (पु.) |
| लचकणे – to sprain | मी (स्त्री.) |
| बोलणे – to speak | आम्ही |
| लावणे – to apply | आपण |
| विचारणे – to ask | तू (पु.) |
| तपासणे – to check | तू (स्त्री.) |
| वाटणे – to think, to feel | तुम्ही |
| बनवणे – to make | तो |
| संपणे – to get over | ती |
| जेवणे – to eat lunch / dinner | ते |
| मिळणे – to get | ते (अ.व.) |
| करणे – to make | त्या (अ.व.) |
| बसणे – to sit | ती (अ.व.) |
| निर्माण करणे – to create | |
| काढणे – to remove / to draw | |
| येणे – to come | |

# ७ औषधे व उपचार पद्धती



## चला, शिकू या :

- औषधांची माहिती समजणे, कुठली औषधे कधी द्यावीत याची नोंद करणे, औषधांचे प्रकार व ते कसे घ्यायचे आहेत हे समजावणे
- आहाराबद्दलच्या सूचना, आहाराबद्दलची आवड-नावड
- असणे : वर्तमानकाळ, भूतकाळ आणि नकारार्थी (आहे, होता, नव्हता)
- परिमाणवाचक क्रियाविशेषण (कमी, जास्त, भरपूर, थोडा, जरा, अत्यंत)

## १ प्रश्नांची योग्य उत्तरे शोधू या.

| कशी घ्यावीत? | कधी घ्यावीत? | किती घ्यावीत? | कोणती घ्यावीत? |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |

**औषधे**

दिवसातून एक / दोन / तीन / चार वेळा

सकाळी / दुपारी / संध्याकाळी / रात्री

पाण्याबरोबर / कोमट पाण्याबरोबर / दुधाबरोबर / जेवल्यानंतर /

मधातून / जेवणाआधी / अनशनपोटी (काहीही न खाता)

गोळ्या / कॅप्सूल / पावडर / बाटलीत द्यायचे औषध / पुडी / इंजेक्शन

एक गोळी / अर्धी गोळी / एक चमचा / पाच मिलिग्रॅम / दहा मिलिग्रॅम

ऑपरेशनच्या आधी / ऑपरेशनच्या नंतर

## १.१ संवाद वाचू आणि ऐकू या.

**पेशंटचे नाव** : देशमुख

**काय झाले आहे?** : गुडघ्याचे ऑपरेशन

**औषध?** स / दु / सं / रा – (दोन गोळ्या)

– रोज १५ मि॰ चालणे

– फिझिओथेरपी

सिस्टर रोझी : नमस्कार, मिस्टर देशमुख? कशी आहे तब्येत आता?

देशमुख : चांगली आहे. ऑपरेशन चांगलं झालं.

सिस्टर रोझी : छान. तुमची औषधं सांगते. या दोन प्रकारच्या गोळ्या आहेत. रोज सकाळ, दुपार, संध्याकाळ आणि रात्री एकेक, आठ दिवस घ्या. लक्षात राहील ना?

देशमुख : ठीक आहे, सिस्टर.

सिस्टर रोझी : आणि रोज थोडं चालायचं. मी मदत करेन तुम्हाला.

देशमुख : फिझिओथेरपीचं काय, सिस्टर?

सिस्टर रोझी : ते फिझिओथेरपिस्ट येऊन तुम्हाला सांगतील.

देशमुख : बरं.

सिस्टर रोझी : काळजी घ्या. काही लागलं तर मला हाक मारा.

देशमुख : धन्यवाद, सिस्टर.

## १.१ आता अशाच प्रकारचा आणखी एक संवाद लिहू या.

**पेशंटचे नाव :** सरिताबेन

**काय झाले आहे?** – किडनी ट्रान्सप्लांट / पुनर्रोपण

**औषध?** – स / सं बाटलीत द्यायचं औषध एक चमचा, – जेवणापूर्वी एक गोळी

– भरपूर पाणी पिणे

– मऊ अन्न

## १.२ वाचू या.

**संवाद १**

सिस्टर लक्ष्मी : नमस्कार, काळेआजी. बरं वाटतंय का?

काळेआजी : हो. आज जरा बरं आहे.

सिस्टर लक्ष्मी : चला, आता औषध घेऊ या. 'आ' करा. बाटलीतलं गुलाबी औषध तुम्हाला देते आहे. रोज फक्त एक चमचा घ्यायचं. जास्त घ्यायचं नाही.

काळेआजी : हे औषध फार कडू आहे.

सिस्टर लक्ष्मी : हो, पण त्यानं तुम्हाला बरं वाटेल.

**संवाद २**

सिस्टर सलमा : चला, मिस्टर प्रकाश, तुम्हाला फिझिओथेरपीला जायचे आहे.

प्रकाश : सिस्टर, थेरपीने फार दुखेल का?

सिस्टर सलमा : फार नाही दुखणार. उलट तुम्हाला आराम वाटेल.

**संवाद ३**

सिस्टर सारा : हॅलो, प्रतिमा, तुझी औषधं घेतलीस का?

प्रतिमा : हो, सिस्टर. सकाळची गोळी घेतली आहे.

सिस्टर सारा : आणि दुपारची?

प्रतिमा : ती नाही घेतली.

सिस्टर सारा : एक वाजून गेला. औषध वेळेवर घेणं अत्यंत महत्त्वाचं आहे. हे घे पाणी आणि ही गोळी घे.

**संवाद ४**

सिस्टर कला : नमस्कार, मिसेस जाधव. रात्री झोप झाली का?

मिसेस जाधव : हो, छान झोप झाली. पण सिस्टर, माझं अंग दुखतंय.

सिस्टर कला : केमोथेरपीनंतर अंग थोडंसं दुखतंच. भरपूर आराम करा. म्हणजे तुम्हाला लवकर बरं वाटेल.

### १.२.१ खालील तक्ता भरू या.

| पेशंटचे नाव | औषध? | निदान पद्धती? |
|---|---|---|
| काळे आजी | .............................................. | .............................................. |
| मिस्टर प्रकाश | .............................................. | .............................................. |
| प्रतिमा | .............................................. | .............................................. |
| मिसेस जाधव | .............................................. | .............................................. |

### १.३ वाक्ये वाचून क्रियाविशेषणांचा अर्थ समजून घेऊ या.

| | |
|---|---|
| आज बरं आहे. | आज **जरा** बरं आहे. |
| औषध कडू आहे. | औषध **फार** कडू आहे. |
| एक चमचा औषध घ्यायचं. | एक चमच्यापेक्षा **जास्त** औषध घ्यायचं नाही. |
| औषध वेळेवर घेणे महत्त्वाचे आहे. | औषध वेळेवर घेणे **अत्यंत** महत्त्वाचे आहे. |
| आराम करा. | **भरपूर** आराम करा. |
| तुम्हाला ऐकू येतं का? | तुम्हाला **कमी** ऐकू येतं का? |

### १.४ गाळलेल्या जागेत योग्य क्रियाविशेषण लिहू या.

१. रुग्णाने पौष्टिक जेवण घेणे ...................... महत्त्वाचे आहे. (अत्यंत की भरपूर?)

२. कालपेक्षा आज हवा ...................... गरम आहे. (जरा की अत्यंत?)

३. ...................... फळं खा ! (फार की भरपूर?)

४. मुंबईमध्ये ...................... थंडी पडत नाही. (फार की अत्यंत?)

५. ही पेनकिलर घ्या. ...................... त्रास झाला तर अजून एका तासाने ही गोळी घ्या. (जरा की जास्त?)

६. तुमचं वजन ...................... झालं आहे. रोज चांगला आहार घेऊन ते वाढवा. (जरा की कमी?)

### १.५ बरोबर वाक्य कोणते आहे? ✓ खूण करा.

१. चला, जरा फिरून येऊ या.
चला, कमी फिरून येऊ या.

२. मला थोडीच भाजी पुरे, कमी नको.
मला थोडीच भाजी पुरे, जास्त नको.

३. भरपूर चाललं तर कमी भूक लागते.
भरपूर चाललं तर जास्त भूक लागते.

४. तुम्ही लवकर बरे व्हाल, अत्यंत काळजी करू नका.
तुम्ही लवकर बरे व्हाल, फार काळजी करू नका.

५. इथे फार गर्दी करू नका. पेशंटला शांत झोपू द्या.
इथे अत्यंत गर्दी करू नका. पेशंटला शांत झोपू द्या.

### २ खालील कोष्टक पूर्ण करू या. (होणे + नाही)

| ए.व. | अ.व. |
|---|---|
| मी होत ...................... | आम्ही / आपण होत ...................................... |
| तू होत नाहीस | तुम्ही / आपण होत ...................................... |
| तुम्ही / आपण होत ...................................... | |
| तो / ती / ते होत ...................................... | ते / त्या / ती / होत नाहीत |

### २.१ खालील वाक्ये वाचू या आणि क्रियापद अधोरेखित करू या.

१. संसर्गजन्य आजार लवकर बरे होत नाहीत.

२. मी काही या परीक्षेत पास होत नाही.

३. पंधरा तारीख आली, अजून आमचा पगार झाला नाही.

४. सतत पंख्याखाली बसून तुम्हाला त्रास होत नाही का?

५. औषध देऊनही त्याचा ताप कमी झाला नाही.

## ३ खालील उतारा वाचून त्यातील क्रियाविशेषणे व क्रियापदे अधोरेखित करा.

काल हॉस्पिटलमध्ये खूप गडबड होती. भरपूर पेशंट्स येत होते. मिसेस जाधवही काल ॲडमिट झाल्या होत्या. त्या गरोदर होत्या. त्यांना फार त्रास होत होता. त्यांचे सिझेरियन करायचे होते. ऑपरेशन अत्यंत कठीण होते. पण आमच्या हॉस्पिटलचे डॉ॰ शहा फार निष्णात डॉक्टर आहेत. त्यांनी फार कमी वेळात हे ऑपरेशन केले. मिसेस जाधव यांना जुळी मुले झाली. दोन्ही मुले कमी वजनाची आहेत, पण अगदी सुदृढ आहेत.

### ३.१ जोड्या जुळवू या.

| | |
|---|---|
| १. आज हवा कशी आहे? | अ. अत्यंत कठीण. |
| २. परीक्षा कशी होती तुझी? | ब. कमी आहे. ९८.५ डिग्री. |
| ३. जेवण झालं का? | क. भरपूर. पाचशे तरी असतील. |
| ४. ताप किती आहे आता? | ड. हो. जरा जास्तच जेवलो आज. |
| ५. कार्यक्रमाला किती लोक आले होते? | इ. आज फार उकडतंय. |

१. .................... २. .................... ३. .................... ४. .................... ५. ....................

## ४ साधा भूतकाळ 'होणे'

|  |  |
|---|---|
| वर्तमानकाळ – माझी अंघोळ सकाळी आठ वाजता होते. | भूतकाळ – माझी अंघोळ सकाळी आठ वाजता झाली. |

## ४.१ वाचू या आणि उताऱ्यातील क्रियापदे अधोरेखित करू या.

दोन वर्षांपूर्वी माझं शिक्षण पूर्ण झालं. मग मी परिचारिका झाले.
माझ्या आई बाबांचं स्वप्न पूर्ण झालं.
मी एका मोठ्या रुग्णालयात रुजू झाले.
माझ्या सर्व इच्छा पूर्ण झाल्या. आज मी खूप आनंदी आहे.



| ए.व. | अ.व. |
|---|---|
| मी डॉक्टर झालो. / मी डॉक्टर झाले. | आम्ही / आपण इंजिनीयर झालो. |
| तू शिक्षक झालास. / तू शिक्षिका झालीस. | तुम्ही / आपण सेल्समन झालात. |
| तुम्ही / आपण सर्जन झालात. | |
| तो सुपरव्हायझर झाला. | ते सुपरव्हायझर झाले. |
| ती मॅनेजर झाली. | त्या मॅनेजर झाल्या. |
| ते वेडे झाले. | ती वेडी झाली. |

## ४.२ कंसातील दिलेले शब्द वापरून वाक्ये बनवू या.

१. जरा – (उशीर होणे) – माफ करा. मला जरा उशीर झाला.
२. जास्त – (गरम होणे) – ..............................................................................................
३. अत्यंत – (आनंद होणे) – ..............................................................................................
४. फार – (त्रास होणे) – ..............................................................................................
५. भरपूर – (पाऊस होणे) – ..............................................................................................
६. कमी – (उकाडा होणे) – ..............................................................................................

## ४.३ खालील वाक्यांमध्ये 'होणे' क्रियापदाचे भूतकाळातील योग्य रूप लिहून वाक्य पुन्हा लिहू या.

१. मागच्या महिन्यात माझी सरकारी रुग्णालयात बदली ........................................
२. त्याचा अलार्म सकाळी पाच वाजता ........................................
३. तू हेड नर्स ........................................ का?
४. मागच्या शनिवारी आमची पार्टी ........................................
५. पावसामुळे आमचे कपडे ओले ........................................

### ४.४ वर्तमानकाळ की भूतकाळ? योग्य पर्याय निवडू या.

१. काल रुग्णालयात किती पेशंट्स ॲडमिट ....................................? (होतात / झाले / झालोत)

२. संध्याकाळी दिवे गेले आणि सगळीकडे अंधार ....................................... (झाला / होतो / होतं)

३. माझी रात्रपाळी बरोबर नऊ वाजता सुरू ....................................... (झालीस / होते / होतो)

४. ऐकलंस का, डॉ. शर्मांचा मुलगा सर्जन ....................................! (झाली / झाला / झालं)

५. खिडकीतून पाऊस आत आला आणि सगळ्या चादरी ओल्या ..........................................
(झाल्या / झालोत / झाली)

टीप – एखादी क्रिया घडून गेली असेल, तर त्या क्रियेचा काळ भूतकाळ असतो.

| टीप : वर्तमानकाळ | | भूतकाळ |
|---|---|---|
| आहे (असणे) | ⟶ | होते |
| होते (होणे) | ⟶ | झाले |

## ५ पौष्टिक आहार. वाचू या.

| | | | | |
|---|---|---|---|---|
|  |  |  |  |  |
| ते सूप | तो बर्गर | ती फळं | तो पिझ्झा | ती पोळी |
|  |  |  |  |  |
| ती भाजी | तो वरणभात | तो ज्यूस | ते सॅलड | ती बिस्कीटे / बिस्कीटं |
|  |  |  |  |  |
| तो ब्रेड | ते दूध | ते आईस्क्रीम | तो उपमा | ते पोहे |
|  |  |  |  |  |
| तो शिरा | ते सरबत | ती मिसळ | तो इडलीसांबार | तो चहा |
|  |  |  |  |  |
| ते थालीपीठ | ते बटाटेवडे | ती कॉफी | ते वेफर्स | ते चॉकलेट |
| |  |  |  | |
| | ती बिर्याणी | तो लाडू | तो चिवडा | |

## ५.१ वर दिलेले पदार्थ त्यांच्या लिंगांनुसार वेगवेगळे लिहू या.

| तो (पु.) | ती (स्त्री.) | ते (नपुं.) | तो, त्या, ती (अ.व.) |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |

## ५.२ मधील चित्रात दिलेले कोणते पदार्थ पौष्टिक आहेत व कोणते पौष्टिक नाहीत याचे वर्गीकरण करू या.

|  |  |
|---|---|
| | |
| | |
| | |
| | |
| | |
| | |
| | |

## ५.३ वरील पदार्थांपैकी तुम्हाला काय आवडतं आणि आवडत नाही ते सांगा.

१. मला ………………………………, ………………………………

आणि ……………………………… खूप आवडतात.

२. मला ………………………………, ………………………………

आणि ……………………………… अजिबात आवडत नाहींत.





### ५.४ योग्य वाक्ये तयार करू या.

| खाणे | | |
|---|---|---|
| | (ते) पोहे | हवंय |
| | (तो) उपमा | हवेत |
| मला | (तो) बटाटावडा | हवाय |
| | (ते) थालीपीठ | हवीय |
| | (ती) पुरणपोळी | |

| पिणे | | |
|---|---|---|
| | (तो) चहा | हवंय |
| मला | (ती) कॉफी | हवाय |
| | (ते) लिंबू-सरबत | हवीय |
| | (ते) ताक | |

**उदा॰** : मला पोहे (ते पोहे – अनेकवचन) हवेत. मला कॉफी हवीय.

| ए॰व॰ | | | अ॰व॰ | | |
|---|---|---|---|---|---|
| तो | ती | ते | ते | त्या | ती |
| हवाय | हवीय | हवंय | हवेत | हव्यात | हवीयत |

### ५.५ अनिता आणि रमेश रुग्णालयातील कॅन्टीनमध्ये आले आहेत. त्यांच्यातील संवाद ऐकू या.

अनिता : रमेश, तू काय घेणारायस?

रमेश : मला चहा चालेल. तुझं काय?

अनिता : मला सामोसा आणि सरबत हवंय.

रमेश : कसा आहे सामोसा?

अनिता : तिखट आहे, पण छान आहे.

## ५.५ अ) छोटे छोटे गट करून संभाषणांचा सराव करू या.

| | | |
|---|---|---|
| तू काय घेणारायस?<br>तुला काय हवंय?<br>तुझं काय? | सामोसा<br>मिसळ<br>चहा<br>कटलेट<br>सरबत | मी ... घेणारंय.<br>मला ... हवंय.<br>मला ... चालेल. |

| | |
|---|---|
| कसा आहे...?<br>कशी आहे...?<br>कसं आहे...?<br>कसे आहेत...? | छान आहे.<br>तिखट आहे.<br>गोड आहे. |

**उदा॰** अ : तुला काय हवंय? मी वडा घेणाराय.
ब : कसा आहे वडा? छान आहे.

## ५.५ ब) खालील वाक्ये वाचू या आणि त्यातील सर्वनामे अधोरेखित करू या.

**उदा॰** : डॉक्टर मला बोलावतायत.

१. अंजली आणि मीना, तुम्हाला आज सुट्टी आहे का? – हो. आज आम्हाला सुट्टी आहे.

२. सुरेश कुठे आहे? – मी त्याला बोलावते आहे.

३. ती कामिनी आहे. – ओळखतेस का तू तिला?

४. तुला किती वेळा सांगितलंय, फाईल इथेच ठेवत जा.

५. मिस्टर काणे, तुम्हाला हे औषध बाहेरून आणावे लागेल.

६. आज आपल्याला मीटिंग आहे का? – हो, तीन वाजता.

**वाचू या.**

| | |
|---|---|
| मी | मला |
| आम्ही | आम्हाला |
| तू | तुला |
| तुम्ही | तुम्हाला |
| आपण | आपल्याला |

| | |
|---|---|
| तो | त्याला |
| ती | तिला |
| ते | त्याला |
| ते | त्यांना |
| त्या | |
| ती | |

### ५.६ वाचू या. पौष्टिक आहार म्हणजे काय? गाळलेल्या जागेत योग्य शब्द लिहा.

**फळे, व्हिटामिन्स, डाएटीशियन, आठ, पालेभाजी**



पौष्टिक आहार म्हणजे प्रोटीन्स, ………………………, कॅल्शियम, आयर्न या सगळ्यांचा समतोल राखणारा आहार. वयानुसार योग्य प्रमाणात आहार घ्या. आपल्या आहारात ………………………, डाळी, चिकन, पनीर यांचा आलटूनपालटून समावेश करा. रोज किमान ……………………… ग्लास पाणी प्या. दररोज दूध, सुकामेवा, मोड आलेली कडधान्ये, कच्च्या कोशिंबिरी खा. ऋतूनुसार ……………………… खा. आपली तब्येत लक्षात घेऊन मग आपला आहार ठरवा. डॉक्टर व ……………………… काय सांगतात त्याकडे लक्ष द्या. आहार व औषधे वेळेवर घ्या. बाहेरचे अन्न टाळा.

### ५.७ संवाद वाचू या.

सिस्टर लता : नमस्कार, पाटीलकाका. कशी आहे तब्येत आता?

पाटीलकाका : चांगली आहे.

सिस्टर लता : आज तुमचा डिस्चार्ज आहे. घरी गेल्यावर रोज व्यवस्थित जेवण घ्या. पालेभाज्या, कडधान्यं खा. दूध प्या, म्हणजे लवकर बरे व्हाल.

पाटीलकाका : पण सिस्टर, मला पालेभाजी आवडत नाही.

सिस्टर : आवडत नसेल तरी खा. पौष्टिक आहार महत्त्वाचा आहे. तुमचं ऑपरेशन झालं आहे. भरपूर कॅल्शियमचे पदार्थ खा.

पाटीलकाका : ठीक, आहे सिस्टर.

सिस्टर : काळजी घ्या आणि औषधं वेळेवर घ्या.

पाटीलकाका : धन्यवाद, सिस्टर.

**संवाद बनवू या. तुम्ही काय सल्ला द्याल?**

१. रुग्णाचे पाठीचे हाड मोडले आहे.

२. रुग्णाचे डोळ्याचे ऑपरेशन झाले आहे.

३. बाळंत झालेली स्त्री आज घरी जाणार आहे.

## ५.८ कोणत्या पेशंटला तुम्ही 'रोज काय खा' आणि 'काय खाऊ नका' असं सांगाल? बरोबर किंवा चूक अशी खूण करा.

| | |
|---|---|
| १. गर्भवती स्त्री | १. दूध<br>२. उष्ण पदार्थ<br>३. सॅलड |
| २. डायबेटीसचा पेशंट | १. गोड शिरा<br>२. कारले<br>३. पालक |
| ३. हाड मोडलेला पेशंट | १. बर्गर<br>२. दुधाचे पदार्थ<br>३. फळं |
| ४. २ वर्षांचे मूल | १. मिसळ<br>२. पराठा<br>३. वरणभात |
| ५. अंगावर पाजणारी आई | १. थंड पदार्थ<br>२. दुधाचे पदार्थ<br>३. कोशिंबीर |
| ६. उच्च रक्तदाब | १. अळणी पदार्थ<br>२. कमी तेलकट पदार्थ<br>३. साखरेचे पदार्थ |

## वाचू या. चिंटू



| दृष्टिक्षेप | | |
|---|---|---|
| तो दिवस, ते-<br>day, -s | ती कॅप्सूल, त्या-<br>capsule,-s | ते कॅन्टीन, ती-<br>canteen, -s |
| तो चमचा, ते चमचे<br>spoon, -s | ती केमोथेरपी<br>chemotherapy | ते अंग, ती अंगे / अंगं<br>body, -ies |
| तो कार्यक्रम, ते-<br>programme, -s | ती परीक्षा, त्या-<br>exam, -s | ते सूप, ती सूपे / सुपं<br>soup, -s |
| तो मजला, ते मजले<br>floor, -s | ती भाजी, त्या भाज्या<br>vegetable, -s | ते ऑफिस, ती-<br>office, -s |
| तो बर्गर, ते-<br>burger, -s | ती नोकरी, त्या नोकऱ्या<br>job, -s | |
| तो पिझ्झा<br>pizza, -s | ती पिशवी, त्या पिशव्या<br>bag, -s | |
| तो वरणभात,<br>daal rice | ती खोली, त्या खोल्या<br>room, -s | |
| तो ज्यूस, ते-<br>juice, -s | ती बिल्डिंग, त्या-<br>बिल्डिंगी / बिल्डिंग्ज<br>building, -s | |
| तो ब्रेड, –<br>bread | ती ड्यूटी, त्या ड्यूट्या<br>duty, -ies | |
| तो उपमा, –<br>upma | ती पोळी, त्या पोळ्या<br>chapati, -s | |
| तो शिरा<br>sheera | ती इडली, त्या इडल्या<br>idli, -s | |
| तो चहा, –<br>tea | ती केबिन, त्या-<br>cabin, -s | |
| तो बटाटावडा, ते बटाटेवडे<br>batatawada, -s | | |
| तो चिवडा, ते चिवडे<br>chivda | | |
| तो लाडू, ते-<br>ladoo | | |
| तो मध<br>honey | | |

| सर्वनाम<br>Pronouns | क्रियापद<br>Verbs | प्रश्नशब्द<br>Question words |
|---|---|---|
| मी – मला | खाणे – to eat | कोणती – which |
| आंम्ही – आम्हाला | चालणे – to walk | |
| तू – तुला | फेकणे – to throw | |
| तुम्ही – तुम्हाला | उकडणे – to heat | |
| आपण – आपल्याला / आपणाला | फिरणे – to roam | |
| तो - त्याला | थांबणे – to wait | |
| ती – तिला | आवडणे – to like | |
| ते – त्याला | | |
| ते / त्या / ती – त्यांना | | |

# ८ चाचण्या आणि तपासण्या




## चला, शिकू या :

- विविध तपासण्यांसाठी, ऑपरेशनपूर्व सूचना देणे
- रिपोर्ट वाचणे व समजावणे
- साधा भविष्यकाळ
- गुणविशेषण, संख्याविशेषण
- संसर्गजन्य रोग

## १ चित्र पाहून या प्रश्नांची उत्तरे देऊ या.

१. चित्रातील तिन्ही व्यक्ती कोण आहेत?

२. कोण आनंदी आहे? का?

३. सोनोग्राफी कोण करत आहे?

४. सोनोग्राफी कुठे करतात?



.................................................................................................................................

.................................................................................................................................

.................................................................................................................................

.................................................................................................................................

### १.१ चित्रे पाहू या.







### १.२ वरील चित्रांमधील कोणत्या चाचण्या व तपासण्या तुमच्या रुग्णालयात किती वेळा होतात?

| रोज | कधीतरी | खूप कमी वेळा | अजिबात नाही |
|---|---|---|---|
| ................................ | इ. सी. जी. | ................................ | ................................ |
| सोनोग्राफी | ................................ | ................................ | ................................ |
| ................................ | ................................ | ................................ | एम. आर. आय. |

### १.३ वाचू या.



१. मी स्कूटरवरून पडलो. माझा हात खूप दुखतोय. हाडाला मार बसला आहे. डॉक्टर म्हणाले, एक्स-रे काढा. प्लास्टर लागेल की काय?

२. माझ्या छातीत कालपासून दुखतंय. बारीक कळ येते आहे. डॉक्टर म्हणाले, इ. सी. जी. काढा. मला खूप भीती वाटते आहे. हृदयविकार तर नसेल?

३. तीन दिवसांनी माझे ऑपरेशन आहे. डॉक्टर म्हणाले, रक्त आणि लघवीच्या तपासण्या करून घ्या. रिपोर्ट नॉर्मल येतील ना?

**माहिती लिहू या.**

| | रुग्ण १. | रुग्ण २. | रुग्ण ३. |
|---|---|---|---|
| १. रुग्ण डॉक्टरकडे का गेला? | ................................ | ................................ | ................................ |
| २. कोणत्या चाचण्या व तपासण्या? | ................................ | ................................ | ................................ |
| ३. रुग्णाला काय वाटत आहे? | ................................ | ................................ | ................................ |

## १.४ योग्य जोड्या जुळवू या.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | चला, तुमची सोनोग्राफी करायची आहे. | अ. | हात पुढे करा. मूठ घट्ट वळा. काही त्रास होणार नाही. फक्त टोचल्यासारखे होईल. तुमची लघवी या बाटलीत धरा. बाटली या टेबलावर ठेवा. |
| २. | चला, तुमचा ई॰सी॰जी॰ काढायचा आहे. | ब. | एका मशीनवर उभे राहून धावायचे आहे, बस! बाकी काही नाही. |
| ३. | आज तुमची स्ट्रेस टेस्ट आहे. | क. | अंगावरचे दागिने काढून तुमच्या नातेवाइकाजवळ ठेवा. टेस्टला तासभर तरी लागेल. टेस्टच्यामध्ये हलू नका. |
| ४. | तुमचा एम॰आर॰आय॰ करायचा आहे. | ड. | डॉ. शहा रेडिओलॉजिस्ट आहेत. त्यांचा विभाग इथे बाजूलाच आहे. |
| ५. | तुमचे रक्त आणि लघवी तपासायची आहे. | ई. | घाबरू नका. कोणतेही इंजेक्शन देणार नाही. या व्हीलचेअरवर बसा. फार लांब नाहीये ई॰सी॰जी॰ चा विभाग. इथे जवळच, पहिल्या मजल्यावर आहे. |

१. ...................... २. ...................... ३. ...................... ४. ...................... ५. ......................

वर, मागे, बाजूला, लांब, जवळ, मध्ये यांना स्थलवाचक क्रियाविशेषण असे म्हणतात.

## १.५ गाळलेल्या जागा भरू या.

१. पवन, तुझं ऑफिस इथून ...................... आहे का? (मध्ये, जवळ, वर)

- हो ! इथून अगदी दोन मिनिटांवर आहे माझं ऑफिस.

२. सिस्टर, माझं डोकं खूप दुखतंय.

- असं करा. तुमचं डोकं या उशी ...................... ठेवा, म्हणजे बरं वाटेल. (वर, बाजूला, मध्ये)

३. बाह्यरुग्ण विभाग कुठे आहे?

- बालरोग आणि हृदयरोग विभागाच्या ............. बाह्यरुग्ण विभाग आहे. (मागे, लांब, मध्ये)

४. तुम्हाला सर्दी झाली आहे. कृपया, बाळापासून ...................... राहा. (मध्ये, वर, लांब)

५. तुमचे एक्सरेचे रिपोर्ट आले आहेत. या फाईल ............. ठेवले आहेत. (जवळ, बाजूला, मध्ये)

६. गणपतीचे मंदिर आपल्या रुग्णालयाच्या पुढे आहे का?

- नाही. मंदिर रुग्णालयाच्या ...................................... आहे. (पुढे, मागे, वर)

### १.५.१ चित्र पाहून क्रियाविशेषण ओळखा.





१. ..................................... २. ..................................... ३. .....................................




४. ..................................... ५. .....................................

### १.६ संवाद वाचून व ऐकून खालील प्रश्नांची उत्तरे देऊ या.

सिस्टर सौम्या : सुप्रभात, मिसेस पाटील! झोप झाली का? आत्ता नऊ वाजता तुमची हार्ट सर्जरी आहे.

मिसेस पाटील : नमस्कार, सिस्टर. झोप चांगली झाली नाही.

सिस्टर सौम्या : का बरं? सर्जरीची भीती वाटते आहे का?

मिसेस पाटील : हो, थोडीशी.

सिस्टर सौम्या : घाबरू नका. डॉक्टर भूल देतील. तुम्हाला कळणारसुद्धा नाही काही.

मिसेस पाटील : सिस्टर, काही खाऊ का?

सिस्टर सौम्या : नाही, आत्ता काही खायचं नाही. हा हॉस्पिटलचा गाऊन घाला आणि तयार व्हा.

मिसेस पाटील : आता कुठली टेस्ट करायची आहे का?

सिस्टर सौम्या : नाही, टेस्ट झाल्या सगळ्या. मी तुमचं बी.पी. तपासते आणि मग आपण ओ.टी.मध्ये जाऊ या.

मिसेस पाटील : ओ.टी. म्हणजे?

सिस्टर सौम्या : अहो, ऑपरेशन थिएटर. मला सांगा, तुमच्याबरोबर कोण नातेवाईक आले आहेत?

मिसेस पाटील : माझा मुलगा आणि माझी बहीण.

सिस्टर सौम्या : त्यांना काही कागदांवर सह्या कराव्या लागतील. मी सांगते कोणते कागद ते.

मिसेस पाटील : ठीक आहे, सिस्टर.

सिस्टर सौम्या : तुम्ही ऑपरेशनला अजिबात घाबरू नका. तुम्ही लवकर बऱ्या व्हाल. ऑल द बेस्ट!

मिसेस पाटील : धन्यवाद, सिस्टर.

**प्रश्न : एका शब्दात उत्तरे देऊ या.**

१. ऑपरेशन कोणाचे आहे? ....................................

२. कसले ऑपरेशन आहे? ....................................

३. कोणती तपासणी करायची आहे? ....................................

४. कोणती टेस्ट करायची आहे? ....................................

५. ऑपरेशनसाठी कुठे जायचे आहे? ....................................

६. सह्या कोणाच्या हव्या आहेत? ....................................

## १.७ वर्गात विद्यार्थ्यांच्या जोड्या लावून वरीलप्रमाणे संवाद बनवू या.

- सौ. नंदा कामत आणि परिचारिका.
- सिझेरियन ऑपरेशन असणे.
- ओ.टी.मध्ये जाणे.
- 'सगळं ठीक होईल' असे सांगणे.

- मि. काझी आणि परिचारिका.
- गुडघ्याचे ऑपरेशन असणे.
- ओ.टी.मध्ये जाणे.
- काळजी करू नका सांगणे.

## २ तू काय करणार आहेस?

सर्व क्रियापदे (अकर्मक + सकर्मक) : धातू + णार
All Verbs (Transitive + Intransitive) : Root + णार
**उदा.** बसणे : बस + णार = बसणार आहे
गाणे : गा + णार = गाणार आहे

| आज | उद्या / नंतर |
|---|---|
|  मी पुस्तक वाचतो. |  मी पुस्तक वाचणार आहे. |
|  तो गावाला जातो. |  तो गावाला जाणार आहे. |
|  आम्ही फुटबॉल खेळतो. |  आम्ही फुटबॉल खेळणार आहोत. |
|  तू भाजी विकतोस का? |  तू भाजी विकणार आहेस का? |

## २.१ धातू + णार रचना – होकारार्थी

| एकवचन | | | अनेकवचन | | |
|---|---|---|---|---|---|
| मी | वाचणार | आहे | आम्ही / आपण | वाचणार | आहोत |
| तू | वाचणार | आहेस | तुम्ही / आपण | वाचणार | आहात |
| तुम्ही / आपण | वाचणार | आहात | तुम्ही / आपण | वाचणार | आहात |
| तो | वाचणार | आहे | ते | वाचणार | आहेत |
| ती | वाचणार | आहे | त्या | वाचणार | आहेत |
| ते | वाचणार | आहे | ती | वाचणार | आहेत |

## २.२ धातू + णार रचना – नकारार्थी

| एकवचन | | | अनेकवचन | | |
|---|---|---|---|---|---|
| मी | वाचणार | नाही | आम्ही / आपण | वाचणार | नाही |
| तू | वाचणार | नाहीस | तुम्ही / आपण | वाचणार | नाही |
| तुम्ही / आपण | वाचणार | नाही | तुम्ही / आपण | वाचणार | नाही |
| तो | वाचणार | नाही | ते | वाचणार | नाहीत |
| ती | वाचणार | नाही | त्या | वाचणार | नाहीत |
| ते | वाचणार | नाही | ती | वाचणार | नाहीत |

टीप : एखाद्या वाक्यात “मी वाचणार आहे” च्या ऐवजी “मी वाचणार” असे आले, तर त्याचा अर्थ ‘मी नक्की वाचणार’ असा होतो.

## २.३ याचप्रमाणे खालील क्रियापदांची रूपे लिहू या.

देणे, पिणे, उठणे, बसणे, तपासणे

### २.४ याचप्रमाणे खालील क्रियापदांची रूपे लिहू या.

| | |
|---|---|
| १. राहणे | |
| २. खाणे | |
| ३. जाणे | |
| ४. येणे | |
| ५. धावणे | |
| ६. करणे | |
| ७. असणे | |
| ८. लिहिणे | |
| ९. चालणे | |
| १०. काढणे | |

### २.५ रिकाम्या जागा भरू या.

**उदा॰** मी रोज वर्तमानपत्र वाचते.
मी रोज वर्तमानपत्र वाचणार आहे.

१. मी रोज सकाळी योगासने करते.
मी रोज सकाळी योगासने ................................... आहे.

२. तो बिल भरतो.
तो बिल ................................... आहे.

३. आम्ही सकाळी खोली स्वच्छ करतो.
आम्ही सकाळी खोली स्वच्छ ................................... आहोत.

४. सफाईकामगार केर काढतात.
सफाईकामगार केर ................................... आहेत.

५. त्या वडापाव खात आहेत.
त्या वडापाव ................................... आहेत.

६. तो नागपूरला येत आहे.
तो नागपूरला .................................... आहे.

७. तो चित्रपट पाहतो आहे.
तो चित्रपट .................................... आहे.

## २.६ रिकाम्या जागा भरू या.

१. दिवाळीमध्ये आम्ही माझ्या गावी (जाणे) .................................... व खूप मजा .................................... (करणे).

२. तू उद्या रात्रपाळी (करणे) .................................... आहेस का?

३. मी उद्या डॉ॰ सरपोतदारांना (भेटणे) .................................... आहे.

४. सिस्टर अनिता, तुम्ही रिपोर्ट आत्ता (लिहिणे) .................................... आहात की उद्या?

५. डॉ॰ वाघ उद्या एक मिटिंग (घेणे) .................................... आहेत. सगळे .................................... (येणे) ना?

## २.७ जोडीदाराबरोबर संवाद साधा. एक जण परिचारिका आणि एक जण रुग्ण असेल. एक जण प्रश्न विचारेल, दुसरा उत्तर देईल.

| प्रश्न | उत्तर |
|---|---|
| १. रोज औषध घेणार? | हो, घेणार. |
| २. रोज २ कि॰मि॰ चालणार? | हो, चालणार. |
| ३. योगासने करणे? | .................................... |
| ४. विश्रांती घेणे? | .................................... |
| ५. वेळेवर जेवणे? | .................................... |
| ६. डोळ्यात ड्रॉप्स घालणे? | .................................... |
| ७. फिझिओथेरपी घेणे? | .................................... |
| ८. व्यायाम करणे? | .................................... |

### २.८ अदिती काय विचार करत आहे? वाचू या आणि खालील क्रियापदांची रूपे लिहू या.




उदा॰ करेन – करणार

१. खाईन – ....................................

२. पिईन – ....................................

३. फिरेन – ....................................

४. झोपेन – ....................................

५. सांगेन – ....................................

### २.९ साधा भविष्यकाळ 'खाणे'
### Simple Future Tense

| एकवचन | | अनेकवचन | |
|---|---|---|---|
| मी | खाईन | आम्ही / आपण | खाऊ |
| तू | खाशील | तुम्ही / आपण | खाल |
| तुम्ही / आपण | खाल | तुम्ही / आपण | खाल |
| तो | खाईल | ते | खातील |
| ती | खाईल | त्या | खातील |
| ते | खाईल | ती | खातील |

(याचप्रमाणे – जाणे, येणे, राहणे, होणे)

## २.१० खालील तक्ता भरू या...

| | पिणे | जाणे | देणे | घेणे | येणे | होणे |
|---|---|---|---|---|---|---|
| मी | पिईन | ................ | ................ | ................ | ................ | ................ |
| आम्ही / आपण | पिऊ | ................ | ................ | ................ | ................ | ................ |
| तू | पिशील | ................ | ................ | ................ | ................ | ................ |
| तुम्ही / आपण | प्याल | जाल | द्याल | घ्याल | याल | व्हाल |
| तो / ती / ते<br>ते / त्या / ती | पिईल<br>................ | ................<br>................ | ................<br>................ | ................<br>................ | ................<br>................ | ................<br>................ |

## २.११ पुढील वाक्यांमध्ये क्रियापदांची भविष्यकाळातील रूपे वापरून वाक्ये पूर्ण करा.

१. मी आज पिक्चरला जाणार आहे. तू पण .......................... ना? (येणे)

२. मला आत्ता आंबा नको आहे. मी उद्या ..........................(खाणे)

३. मि. मेहता, तुम्ही आत्ता चहा .......................... का? (घेणे)

४. आम्ही पुण्यात दोन दिवस ..........................(राहणे)

५. जुलैमध्ये माझा भाऊ इंजिनियर ..........................(होणे)

## २.१२ उत्तरे द्या.

१. तू सोमवारी येशील ना? – नाही, मी मंगळवारी येईन.

२. तुम्ही मिसळ खाल ना? – नाही, आम्ही ...........................

३. आपण माझे काम कराल ना? – हो, ...........................

४. तुम्ही सप्टेंबरमध्ये पुण्यात याल ना? – नाही, ...........................

५. तू एकटा राहशील ना? – हो, ...........................

६. ते औषध नीट घेतील ना? – हो, ...........................

७. माझे ऑपरेशन नीट होईल ना? – हो, ...........................

८. डॉक्टर मला सुट्टी देतील ना? – हो, नक्की ...........................

### २.१३ वाचू या.

आई : चिंटू, होमवर्क केलंस का?

चिंटू : उद्या करेन !

आई : औषध घेतलंस का?

चिंटू : नाही. उद्या घेईन !

आई : पाणी?

चिंटू : नाही. मी उद्या पिईन !

आई : तुला बरं व्हायचं नाहीये का?

चिंटू : अगं, उद्या होईन !



## ३ पत्र वाचू या.

१३.०८.२०१८

प्रिय अपर्णाताई,

तुझं पत्र मिळालं. फार छान वाटलं. माझी तब्येत आता बरी आहे.

मुंबईतले आमचं रुग्णालय मोठं आहे. इथे एकूण ४५० कर्मचारी काम करतात. इथे दिवसभर भरपूर गडबड असते. पण इथलं वातावरण कायम छान असतं. सगळे डॉक्टर हुशार आहेत आणि असिस्टंट डॉक्टर्स आमच्याशी चांगलं वागतात. मी प्रसूतिविभागात काम करते. माझा विभाग तिसऱ्या मजल्यावर आहे. माझी मैत्रीण अर्चना बाह्यरुग्ण विभागात काम करते. तिचा विभाग पहिल्या मजल्यावर आहे. आम्ही दोघी दर शनिवारी दुसऱ्या मजल्यावरच्या कॅन्टीनमध्ये भेटतो. तिथे साबुदाणा वडा फार छान मिळतो.

उद्या आमच्या रुग्णालयाचा बारावा वाढदिवस आहे. आम्ही सगळे मिळून तो साजरा करतोय.

तुझं काम कसं चाललय? तू मुंबईला कधी येतेयस? आलीस की मला नक्की फोन कर. अच्छा!

तुझी बहीण,
नेत्रा

## ३.१ पत्रामध्ये निळ्या अक्षरातील शब्द म्हणजे दोन प्रकारची विशेषणे आहेत. त्यांना प्रश्नांच्या आधारे वेगळी करू या.

| कसा? कशी? कसे? | कितवा / कितव्या? |
|---|---|
| छान | तिसऱ्या |
| ........................................ | ........................................ |
| ........................................ | ........................................ |
| ........................................ | ........................................ |

नामाबद्दल विशेष माहिती देते = गुणविशेषण (चांगला, मोठा, छान, सुंदर, घाण इ.) Adjective of quality संख्येसाठी वापरले जाते = संख्याविशेषण (एक, तीस, शंभर इ.) Adjective of quantity. पहिला, तिसावा, शंभरावा इ. क्रमवाचक विशेषणे होते.

## ३.२ क्रमवाचकविशेषणे लिहू या.

१. एक – पहिला (पु.) / पहिली (स्त्री.) / पहिलं (नपुं.)

२. दोन – दुसरा / .......................... / ..........................

३. तीन – तिसरा / .......................... / ..........................

४. चार – .......................... / चौथी / ..........................

५. पाच - .......................... / .......................... / पाचवं

६. सहा – .......................... / .......................... / ..........................

७. सात – .......................... / .......................... / ..........................

८. आठ – .......................... / .......................... / ..........................

९. नऊ – नववा / .......................... / ..........................

१०. दहा – .......................... / .......................... / ..........................

११ पासून पुढे अकरावा, तेरावा, तिसावा, बत्तीसावा, अशी संख्याविशेषणे तयार होतात.

## ३.३ गाळलेल्या जागा भरू या.

१. आज तुझा कितवा वाढदिवस आहे? .............................. (३३)

२. ओपीडी कुठे आहे? .............................. (१) मजल्यावर.

३. पेशंट काळे यांना .............................. (५) मजल्यावर न्यायचे आहे.

४. ही माझी .............................. (३) रात्रपाळी आहे.

५. माझे घर .............................. (१४) मजल्यावर आहे.

## ३.४ अर्थपूर्ण वाक्ये बनवू या.

१. असणे / मोठे / रुग्णालयाचे / आवार

..............................................................................................................................

२. रुम न॰ ६ / पेशंट / मधील / असणे / हसतमुख

..............................................................................................................................

३. फारच / मिसळ / असणे / तिखट

..............................................................................................................................

४. दुसऱ्या / टॉयलेट / मजल्यावरचे / नसणे / स्वच्छ

..............................................................................................................................

५. प्रचंड / पाऊस / काल / पडणे

..............................................................................................................................

## ४ वाचू या.

**संसर्गजन्य रोग (Contagious diseases)**

माणसे एकमेकांच्या संपर्कात आल्यामुळे पसरणाऱ्या रोगांना 'संसर्गजन्य' रोग असे म्हणतात. हे रोग दूषित अन्न, हवा, आणि पाणी यांतून पसरतात. पावसाळ्यात साथीचे रोग वाढायला लागतात. जिथे साचलेले पाणी, अस्वच्छता आणि गर्दीची ठिकाणे असतात, तिथे हे आजार वाढलेले दिसतात. मुख्यतः तापमान हे विषाणूंच्या (virus) वाढीला कारणीभूत असते. गर्दीच्या ठिकाणी एका आजारी व्यक्तीकडून दुसऱ्या व्यक्तीला आजार होण्याचा धोका जास्त असतो. त्याला संसर्गजन्य आजार असं म्हटलं जातं. आपल्या आसपास सगळ्यात जास्त आढळणारे आजार म्हणजे डेंगी, मलेरिया आणि चिकुनगुनिया. हे आजार घरात किंवा घराजवळच्या साठलेल्या पाण्यात वाढणाऱ्या डासांद्वारे होतात.

## ४.१ खाली दिलेल्या आजारांपैकी संसर्गजन्य आजारापुढे दोन रेघा (॥) आणि असंसर्गजन्य (।) रोगापुढे एक रेघ काढू या.

१. (ते) कुष्ठरोग

२. (तो) मधुमेह

३. (तो) काचबिंदू

४. (तो) डांग्या खोकला

५. (तो) क्षयरोग

६. (तो) हिवताप

७. (तो) हत्तीरोग

८. (तो) अस्थमा / दमा

९. (तो) कर्करोग

१०. (तो) घटसर्प

११. (तो) स्वाइन फ्लू (H१N१)

१२. (ते) गोवर

## ४.२ संसर्गजन्य रोग झालेल्या रुग्णाला तुम्ही काय सल्ला द्याल? योग्य सल्ल्यापुढे ✓ अशी खूण करा.

| | |
|---|---|
| १. मोकळ्या हवेत फिरा आणि भरपूर लोकांमध्ये मिसळा. | |
| २. वेळेवर झोपा आणि सकस आहार घ्या. | |
| ३. गर्दीच्या ठिकाणी फिरायला जा. | |
| ४. पाणी उकळून प्या. | |
| ५. प्लेटलेट्स कमी होणार नाहीत याची काळजी घ्या. | |
| ६. घरात भरपूर पाणी साठवून ठेवा. | |
| ७. वेळोवेळी रक्ताच्या तपासण्या करून घ्या. | |
| ८. ताप सारखा / वारंवार येत असल्यास लगेच डॉक्टरांना भेटा. | |
| ९. घरात स्वच्छता राखा. | |
| १०. धूम्रपान बाहेर करा. | |

## ४.३ रुग्णालयातील तज्ज्ञांबद्दल वाचू या.

| रुग्णालयातील तज्ज्ञ | Specialists in a hospital |
|---|---|
| त्वचारोग तज्ज्ञ | Dermatologist |
| कॅन्सरतज्ज्ञ | Oncologist |
| भूलतज्ज्ञ | Anaesthetist |
| नेत्रतज्ज्ञ | Ophthalmologist |
| बालरोगतज्ज्ञ | Pediatrician / Child Specialist |
| स्त्रीरोगतज्ज्ञ | Obstetrician / Gynaecologist |
| कान, नाक, घसा तज्ज्ञ | ENT Specialist |
| मानसोपचार तज्ज्ञ | Psychiatrist |
| आहारतज्ज्ञ | Dietician |

## ४.४ जोड्या जुळवू या.

| | |
|---|---|
| १. एक्स रे | क. Psychiatrist |
| २. स्तनाचा कर्करोग | ख. Nephrologist |
| ३. मनोविकार | ग. Dental Surgeon |
| ४. दातदुखी | घ. Radiologist |
| ५. किडनी स्टोन / मूतखडा | च. Cancer Specialist |

१. ........................ २. ........................ ३. ........................ ४. ........................ ५. ........................



फ्लोरेन्स नाईटींगेल यांना आधुनिक नर्सिंगची जननी मानले जाते. रूग्णांची सेवा करणे हे त्यांच्या आयुष्याचे ध्येय होते. दुसऱ्या महायुद्धाच्या काळात जखमी झालेल्या सैनिकांवर त्यांनी प्रथमोपचार केले होते. त्यांना "Lady with the lamp" असेही म्हणले जात असे. भारतामध्ये नर्सिंग या व्यवसायाची सुरुवात त्यांच्यामुळे झाली. नर्सिंगच्या क्षेत्रात त्यांचे योगदान खूप मोठे आहे. म्हणूनच १२ मे हा त्यांचा जन्मदिवस जागतिक परिचारिका दिन म्हणून साजरा केला जातो.

| दृष्टिक्षेप | | |
|---|---|---|
| तो एक्सरे, ते-<br>x-ray, -s | ती सोनोग्राफी<br>sonography, -s | ते नारळपाणी<br>coconut water |
| तो दागिना, ते दागिने<br>jewellery, -ies | ती चाचणी, त्या चाचण्या<br>test, -s | ते उपाहारगृह, ती उपाहारगृहे<br>canteen, -s |
| तो विद्यार्थी, ते-<br>student, -s | ती व्हीलचेअर, त्या-<br>wheelchair, -s | ते शौचालय, ती शौचालये<br>toilet, -s |
| तो एम॰आर॰आय॰, ते-<br>MRI, -s | ती सर्दी<br>cold | ते होमवर्क<br>homework |
| तो रेडिओलॉजिस्ट, ते-<br>radiologist, -s | ती सर्जरी, त्या-<br>surgery, -ies | ते पुस्तक, ती-<br>पुस्तके / पुस्तकं<br>book, -s |
| तो विभाग, ते-<br>department, -s | ती रात्रपाळी, त्या रात्रपाळ्या<br>night shift, -s | ते मंदिर, ती मंदिरे / मंदिरं<br>temple, -s |
| तो गाऊन, ते-<br>gown, -s | | ते हाड, ती हाडे / हाडं<br>bone, -s |
| तो बाबा, ते-<br>father, -s | | |
| तो इंजिनियर, ते-<br>engineer, -s | | |
| तो विषाणू<br>virus, -es | | |
| तो वाढदिवस, ते-<br>birthday, -s | | |
| तो रोग, ते-<br>disease, -s | | |
| तो डास, ते-<br>mosquito, -es | | |
| तो कुष्ठरोग<br>leprosy, | | |
| तो आंबा, ते आंबे<br>mango, -es | | |
| तो कर्मचारी, ते-<br>employee, -s | | |

| क्रियापद<br>Verbs |
|---|
| पडणे – to fall |
| पिणे – to drink |
| म्हणणे – to say |
| नसणे – not to be |
| ठेवणे – to keep |
| हलणे – to move |
| घाबरणे – to get scared |
| फिरणे – to take a walk |
| कळणे – to understand |
| घालणे – to wear, to insert |
| असणे – to exist |
| चलणे – to go, to set out |
| खेळणे – to play |
| विकणे – to sell |

९

# अपघात व तातडीची सेवा










## चला, शिकू या :

- पेशंटचा रिपोर्ट लिहिणे, नातेवाईकांशी बोलणे
- कुटुंब
- इतर परिचारिकांशी संवाद साधणे
- दुसऱ्या नर्सवर काम सोपवणे
- सामान्य रूपे
- कालदर्शक क्रियाविशेषण (काल, आज, परवा, पूर्वी, आजकाल, हल्ली)




## १ वरील चित्र पाहून त्या अवयवाचे योग्य नाव शोधू या.

१. डोक्याची कवटी – ..............................  २. मणका – ..............................

३. खुब्याचे हाड – ..............................  ४. कंबरेचे हाड – ..............................

५. गुडघ्याची वाटी – ..............................

## १.१ तुम्हाला आपल्या शरीरातील अजून कोणत्या हाडांची नावे माहीत आहेत?

१. ..................................................................................................................

२. ..................................................................................................................

३. ..................................................................................................................

४. ..................................................................................................................

५. ..................................................................................................................

## २ योग्य जोड्या जुळवू या.


अ.


ब.


क.


ड.


इ.


ई.


उ.

१. रुग्णवाहिका : ..............................

२. घसरणे : ..............................

३. पडणे : ..............................

४. जखम होणे : ..............................

५. इमर्जन्सी फोन नंबर : ..............................

६. फ्रॅक्चर : ..............................

७. ड्रेसिंग : ..............................

**२.१ वरील सर्व चित्रे दोन मिनिटे पाहा. पुस्तक बंद करा. आता आठवून पाहा तुम्ही काय काय पाहिलेत ते आठवून पहा आणि ते शब्द लिहून काढा. वर्गात कोणाला सर्वात जास्त शब्द आठवतात ते पाहा.**

## ३ एका अपघाताचे वर्णन वाचू या.

एका बांधकामादरम्यान दोन मजूर तिसऱ्या मजल्यावरून खाली पडले. एक जण बेशुद्ध पडला, एक जण थोडासा शुद्धीत होता. त्यांना अँब्यूलन्समधून तातडीने रुग्णालयात आणले गेले. दोघांनाही मोठे फ्रॅक्चर होते. खूप रक्त गेले. त्यांना दोन बाटल्या रक्त लागले. एक्स रे, सी॰टी॰ स्कॅन केले गेले. डॉ॰ शहांनी आणि डॉ॰ दाणींनी त्यांच्यावर शस्त्रक्रिया केली. आता दोघेही बरे आहेत.

### ३.१ वरील उताऱ्यातील अपघाताशी निगडित असलेले शब्द अधोरेखित करा. अपघाताशी संबंधित आणखी काही शब्द तुम्हाला आठवत असले तर ते लिहा.




### ३.२ संवाद वाचू या.

अनिता : सुप्रभात, सिस्टर करुणा.

करूणा : सुप्रभात, सिस्टर अनिता. बरं झालं तू आलीस. माझी ड्यूटी संपायची वेळ झाली.

अनिता : हो, आठ वाजले. आता माझी ड्यूटी सुरू. मला सांग, कोणी नवीन पेशंट आले आहेत का?

करुणा : हो, काल रात्री उशिरा एक पेशंट दाखल झालाय. त्याला मोठा अपघात झालाय. डॉ॰ इनामदार आहेत इन्चार्ज.

अनिता : नाव काय आहे पेशंटचं? आणि काय झालंय त्यांना?

करुणा : पेशंटचं नाव आहे आशिष शर्मा, वय ३९. काल रात्री त्यांचा हायवेवर अपघात झाला. एका ट्रकनं धडक दिली.

अनिता : किती वाजता भरती झाले ते?

करुणा : पहाटे २ वाजता. ॲम्ब्यूलंसमधून त्यांना इथे आणलं. खूप रक्त वाहत होतं. डोक्याला मार लागला आहे. आधी प्रथमोपचार केले.

अनिता : त्यांना खूप वेदना होत असतील ना?

करुणा : हो. त्यांना वेदनाशामक इंजेक्शन दिलंय. त्यांचा सी॰ टी॰ स्कॅन आणि पाठीचा एक्स रे काढायचाय. कदाचित ऑपरेशन करावं लागेल.

अनिता : त्यांच्याबरोबर कोण आहे?

करुणा : त्यांची पत्नी आणि त्यांचा भाऊ आहे.

करुणा : ठीक आहे. आज कोणाचा डिस्चार्ज आहे का?

अनिता : हो. रुम नंबर ४ मधील काझींचा आहे.

करुणा : ठीक आहे. मी फाईल पाहते. धन्यवाद. अच्छा!

अनिता : अच्छा! उद्या भेटू.

## ३.३ वरील संवाद वाचून ही माहिती लिहू या.

१. पेशंटचे नाव : ..........

२. वय : ..........

३. डॉक्टरचे नाव : ..........

४. पेशंटला काय झाले आहे? : ..........

५. अपघात कसा झाला? : ..........

६. कुठे लागले आहे? : ..........

७. अपघात गंभीर आहे की किरकोळ? : ..........

८. कोणते इंजेक्शन दिले आहे? : ..........

९. कोणत्या चाचण्या केलेल्या आहेत? : ..........

१०. कोणत्या चाचण्या करायच्या आहेत? : ..........

११. पेशंटबरोबर कोण नातेवाईक आहेत? : ..........

१२. तारीख : ..........

१३. रिपोर्ट लिहिणाऱ्याचे नाव : .......... १४. सही : ..........

## ३.४ तुमच्या माहितीत, तुमच्या मित्रांपैकी किंवा तुमच्या रुग्णालयातील पेशंटला अपघात झालेला आहे का? असल्यास त्याबद्दल माहिती लिहू या.

| | |
|---|---|
| पेशंटचे नाव | .......... |
| वय | .......... |
| डॉक्टरचे नाव | .......... |
| सर्जनचे नाव | .......... |
| पेशंटला काय झाले आहे? | .......... |
| अपघात कसा झाला? | .......... |
| कुठे लागले आहे? | .......... |
| अपघात गंभीर आहे की किरकोळ? | .......... |
| कोणते औषध दिले आहे? | .......... |
| कोणत्या चाचण्या केलेल्या आहेत? | .......... |
| कोणत्या चाचण्या करायच्या आहेत? | .......... |
| पेशंट बरोबर कोण नातेवाईक आहेत? | .......... |
| इन्शुरन्स आहे का? | .......... |
| तारीख | .......... |
| सही | .......... |

## ४ उदाहरणा प्रमाणे संवाद साधू या.

| परिचारिका १ | परिचारिका २ | परिचारिका ३ |
| --- | --- | --- |
| १. पेशंटचा रक्तदाब तपासला का? | हो, तपासला. | नाही तपासला. |
| २. एक्स-रे रिपोर्ट आणणे | ........................................ | ........................................ |
| ३. बिछाना साफ करणे | ........................................ | ........................................ |
| ४. औषध देणे | ........................................ | ........................................ |
| ५. फेरी मारून आणणे | ........................................ | ........................................ |
| ६. पाणी देणे | ........................................ | ........................................ |
| ७. बेडपॅन देणे | ........................................ | ........................................ |
| ८. रिपोर्ट देणे | ........................................ | ........................................ |
| ९. सही घेणे | ........................................ | ........................................ |
| १०. सलाईन लावणे | ........................................ | ........................................ |

### ४.१ सिस्टर करुणा पेशंट शर्मा यांच्या पत्नीशी बोलत आहेत. संवाद वाचू या.

सिस्टर करुणा : हे तुमचे सी॰ टी॰ स्कॅन आणि एक्स-रे चे रिपोर्ट आहेत. डॉक्टर इनामदार येतील आता.

मिसेस शर्मा : सिस्टर, ऑपरेशन कसं झालं?

सिस्टर करुणा : चांगलं झालं. डॉक्टर येऊन सांगतीलच. तुम्ही घाबरू नका.

मिसेस शर्मा : मला खूप भीती वाटते आहे. मि॰ शर्मा चालू शकतील ना? अपघात खूप मोठा होता.

सिस्टर करुणा : काळजी करू नका. ऑपरेशननंतर फिझिओथेरपी नीट केली, औषध वेळेवर घेतलं की त्रास होत नाही.

मिसेस शर्मा : डॉक्टर कधी येतील?

सिस्टर करुणा : आत्ता येतील ते. तुम्ही त्यांच्याशी बोला, म्हणजे तुम्हाला बरे वाटेल. डॉ॰ इनामदार अतिशय चांगले डॉक्टर आहेत.

मिसेस शर्मा : धन्यवाद, सिस्टर.

### ४.२ पेशंटच्या नातेवाइकांशी बोलताना प्रेमाने, आपुलकीने बोलावे, त्यांना धीर द्यावा. नातेवाइकांशी बोलताना काय बोलाल? ✓ खूण करा.

१. काळजी करू नका. तुम्हाला लवकर बरे वाटेल.
२. तुम्हाला अजिबात बरे वाटणार नाही.
३. औषध तुम्हीच घ्या.
४. मला कधीही हाक मारा.
५. औषध कसे घ्यायचे आहे, ते मी तुम्हाला सांगते.
६. फक्त औषध द्यायला मी येईन.
७. काही त्रास होत नाहीये ना?
८. मला अजिबात त्रास देऊ नका.
९. मी तुम्हाला मदत करेन.
१०. तुम्हाला कसलीही गरज लागली तर मला बोलवा.
११. रात्री काही लागलं तर ही बेल दाबा. मी येईन.

### ४.३ खालीलपैकी रुग्णांच्या प्रश्नांना तुम्ही वरीलपैकी काय उत्तर द्याल?

१. सिस्टर, मला रात्री बाथरूमला जायला लागतं.
.........................................................................................................................

२. हे औषध कसं घ्यायचे?
.........................................................................................................................

३. मला एका कुशीवर वळायचं आहे.
.........................................................................................................................

४. मला अजून चालता येत नाहीये. पाय दुखतो.
.........................................................................................................................

५. रात्री मला नीट दिसत नाही.
.........................................................................................................................

## ५ रुग्णाची स्मरणशक्ती तपासण्यासाठी नर्सने त्याच्याशी केलेला संवाद वाचू या.

नर्स : काल कोणता वार होता?
रुग्ण : काल शुक्रवार होता.
नर्स : आज कोणता वार आहे?
रुग्ण : आज शनिवार आहे.
नर्स : उद्या कोणता वार आहे?
रुग्ण : उद्या रविवार आहे. उद्या मला सुट्टी आहे.
नर्स : परवा कोणता वार आहे?

### ५.१ तक्ता भरू या आणि वरीलप्रमाणे संवाद साधू या.

| काल | आज | उद्या | परवा |
|---|---|---|---|
| .............................. | मंगळवार | .............................. | .............................. |
| रविवार | .............................. | .............................. | .............................. |
| .............................. | .............................. | शनिवार | .............................. |
| .............................. | .............................. | .............................. | सोमवार |

### ५.२ गाळलेल्या जागा भरू या. (काल, आज की उद्या?)

१. पेशंट शर्मांची सर्जरी .............................. झाली का? – नाही, आज आहे.

२. तू प्रसूती विभागात गेली होतीस का? – नाही, .............................. जाणार आहे.

३. तुझा वाढदिवस .............................. आहे की ..............................?

४. डॉ॰ साठे .............................. हॉस्पिटलमध्ये येणार आहेत ना? – हो. .............................. गुरुवार. त्यांची ओपीडी असते.

५. सुमनताई, .............................. बाथरूम साफ केले नाही का? आज करून घ्या.

### ५.३ जरा हसू या.



काही लोक मजेशीर असतात.
काल प्रेम, आज साखरपुडा, उद्या लग्न,
परवा डिव्होर्स!!!

काही लोक लकी असतात.
काल परीक्षा, आज निकाल, उद्या नोकरी!!!



### ५.४ आता तुम्हीदेखील अशी वाक्ये बनवू या.

१. दाखल – ऑपरेशन – आराम – डिस्चार्ज

.........................................................................................................................................................

२. पुणे – मुंबई – नागपूर – दिल्ली

.........................................................................................................................................................

## ६ पूर्वी, हल्ली, आजकाल....



पूर्वी लोक रेडिओ ऐकायचे.



हल्ली / आजकाल लोक टी. व्ही. पाहतात.



पूर्वी माझे केस काळे होते.



हल्ली / आजकाल माझे केस पांढरे झाले आहेत.

### ६.१ वाक्ये बनवू या.

१. पूर्वी (इतका ट्राफिक नसणे) ... हल्ली (खूप ट्राफिक असणे)

२. पूर्वी (घरगुती औषधे वापरणे) ... हल्ली (नवीन औषधे वापरणे)

३. पूर्वी (बसने प्रवास करणे) ... हल्ली (मेट्रोने प्रवास करणे)

४. पूर्वी (एकत्र जेवणे) ... आजकाल (वेळ नसणे)

५. पूर्वी (पत्र लिहिणे) ... आजकाल (ई-मेल लिहिणे)

## ७ कुटुंब




### ७.१ खालील परिच्छेद वाचू या.

हे आहे बच्चन कुटुंब. आराध्या सात वर्षांची आहे. तिचे आजी-आजोबा, म्हणजेच अमिताभ आणि जया बच्चन यांना दोन मुले आहेत. एक आराध्याचे बाबा-अभिषेक, आणि दुसरी तिची आत्या श्वेता. श्वेता ही अभिषेकची मोठी बहीण आहे. अभिषेकची बायको ऐश्वर्या म्हणजेच छोट्या आराध्याची आई. श्वेताने निखिल नंदाशी लग्न केले आहे. त्यांना दोन मुले आहेत, नव्या आणि अगस्त्य. नव्या अमिताभची लाडकी नात आहे आणि अगस्त्य लाडका नातू. अनेकदा ते दोघे त्यांच्या मामा-मामीकडे, म्हणजेच अभिषेक आणि ऐश्वर्याकडे जातात, त्यांच्या मामेबहिणीला, म्हणजे आराध्याला भेटायला.

### ७.२ आराध्याला नवी नाती कळत नाहीयेत. तिला मदत कराल?

| | | |
|---|---|---|
| मामी | आजोबा | आत्या |
| | आई | |
| आजी | | मामा |
| | काका | |

१. अभिषेकची बहीण, आराध्याची ..............................

२. अभिषेकचे बाबा, आराध्याचे ..............................

३. श्वेताचा भाऊ, नव्याचा ..............................

४. अभिषेकची बायको, नव्याची ..............................

५. श्वेताची आई, नव्याची ..............................

६. अभिषेकची बायको, आराध्याची ..............................

७. अगस्त्यचे बाबा, आराध्याचा ..............................

## ८ वाचू या.

सिस्टर नीता : अरे सखाराम, जनरल वॉर्डची सफाई झाली का?

सखाराम : मला नाही माहीत. तुम्ही प्रवीणला विचारा. त्याला माहीत असेल.

सिस्टर नीता : तुला कधीच काही माहीत नसतं! मी विचारते प्रवीणला!

| एकवचन |
|---|
| शब्दाचे सामान्य रूप + ला |
| उदा॰ : मराठी कसे बोलावे, हे राधिकाला कळत नाही. |

# ९ अपघात व तातडीची सेवा

## ८.१ समजतंय का? चला, तर बघू या.



| | |
|---|---|
| रोहन मित्राला बोलावतो. |  |
| रोहन मैत्रिणीला बोलावतो. |  |
| रोहन मुलाला बोलावतो. |  |
| रोहन मित्रांना बोलावतो. |  |
| रोहन मैत्रिणींना बोलावतो. |  |
| रोहन मुलांना बोलावतो. |  |

**थोडक्यात**

| | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| | सामान्य रूप + ला | सामान्य रूप + ं + ना |
| उदा॰ मित्र | मित्रा + ला = मित्राला | मित्रा + ं + ना = मित्रांना |

अशीच काही उदाहरणे.

पुल्लिंगी नामे

| | ए.व. | अ.व. |
|---|---|---|
| नरेश | नरेशला | - |
| भीम | भीमाला | - |
| रवी | रवीला | - |
| गुरू | गुरूला | - |
| महाराष्ट्र | महाराष्ट्राला | - |
| पेरू | पेरूला | पेरूंना |

नपुंसकलिंगी नामे

| | ए.व. | अ.व. |
|---|---|---|
| केळे | केळ्याला | केळ्यांना |

स्त्रीलिंगी नामे

| | ए.व. | अ.व. |
|---|---|---|
| कांचन | कांचनला | - |
| श्वेता | श्वेताला | - |
| मराठी | मराठीला | - |
| चारू | चारूला | - |

## ८.२ मराठीत आलेले काही इंग्रजी शब्द.

**टीप :** काही इंग्रजी शब्दांची सामान्य रूपे होतात तर काहींची होत नाहीत.
खूप रुळलेल्या इंग्रजी शब्दांची मराठी नामांच्या नियमाप्रमाणेच सामान्य रूपे केली जातात.
**उदा.** तो फोन – फोनला – फोनना (याचप्रमाणे तो मोबाईल, तो लॅपटॉप, तो चार्जर, ती ट्रेन, ती बस, ...). पुढील नामांची सामान्य रूपे होतात. (तो पेपर, ते टेबल, ते पेन, ...)
तो पेपर – पेपरला – पेपरांना (याचप्रमाणे : ते पोस्ट, ते पेन)
तो डॉक्टर – डॉक्टरला – डॉक्टरांना (याचप्रमाणे : तो बिल्डर)
ती बॅग – बॅगेला – बॅगांना (याचप्रमाणे : ती बँक, ती पिन)
ती पेन्सिल – पेन्सिलीला – पेन्सिलींना (याचप्रमाणे : रिफिल, वायर)

**८.३ खाली दिलेल्या शब्दांना 'ला' आणि 'ना' प्रत्यय जोडून परत लिहू या. लिहिताना प्रत्येक शब्दाच्या लिंगाचा विचार करू या.**

बाळ आजी बाबा मामा मित्र पुस्तक
गाडी बाई आजोबा आई मल्लिका
कागद नकुल थालीपीठ बिल्डींग
मोबाईल बाटली

| उदा॰ | बाई | बाईला | बाईंना |
|---|---|---|---|
| १. | .............................. | .............................. | गाड्यांना |
| २. | .............................. | .............................. | .............................. |
| ३. | .............................. | .............................. | .............................. |
| ४. | .............................. | .............................. | .............................. |
| ५. | मोबाईल | .............................. | .............................. |
| ६. | .............................. | .............................. | .............................. |
| ७. | बाटली | .............................. | बाटल्यांना |
| ८. | .............................. | .............................. | .............................. |
| ९ | नकुल | .............................. | .............................. |
| १०. | .............................. | .............................. | .............................. |
| ११. | .............................. | .............................. | .............................. |
| १२. | कागद | .............................. | .............................. |
| १३. | .............................. | .............................. | .............................. |
| १४. | .............................. | .............................. | .............................. |
| १५. | .............................. | .............................. | .............................. |
| १६. | .............................. | .............................. | .............................. |

## ८.४ योग्य पर्याय निवडा.

१. पेशंट काळे, तुमच्या ............................ या फॉर्मवर सह्या करायला सांगा.

अ. बहिणीला

ब. बहिणींना

२. तुमच्या ............................ फोन करा. ते आले की आपण आत जाऊ.

अ. मित्राला

ब. मित्रांना

३. ............................ घाबरू नका. एकच देणार आहे.

अ. इंजेक्शनला

ब. इंजेक्शनना

४. माझ्या ............................ नीट चालता येत नाही.

अ. आजोबांना

ब. आजोबाला

५. एक इमर्जन्सी केस आहे. ............................ कळवले का?

अ. डॉक्टरांना

ब. डॉक्टरला

६. रुम न॰ ४ मधील ............................ खूप उलट्या होतायत.

अ. पेशंटला

ब. पेशंटना

## ९ वाचू या आणि ऐकू या.

ज्येष्ठ नागरिक म्हणजे साठ वर्षांच्या पुढचे लोक. यांची काळजी जास्त चांगल्या प्रकारे घ्यावी लागते. अनेक लोकांना चालताफिरता येत नाही, पलंगाला खिळलेले असतात, त्यांचे औषध, पथ्यपाणी सांभाळावे लागते. काही वेळेला अपघात झालेले व शस्त्रक्रिया झालेले वृद्ध रुग्ण काहीच करू शकत नाहीत. त्यांना मदत करावी लागते.

**रुग्णालयात आलेल्या ज्येष्ठ नागरिकांशी तुम्ही कसे बोलाल?**

१. आजी, तुम्हाला काही मदत हवी आहे का?
२. मी तुम्हाला औषध देते.
३. अगदी हळू चाला, नाही तर पडाल.
४. तुम्हाला बाथरूमला / टॉयलेटला / लघवीला / संडासला जायचे आहे का?
५. आजोबा, गादीवरून अगदी हळू उठा.
६. आजी, तुमचे नातेवाईक नसतील तरी मी आहे इथे.
७. मी तुमची सर्व काळजी घेईन.
८. आजी, ऐकू येतंय का?
९. चालायला, बसायला मदत लागली तर मला लगेच सांगा.
१०. मी जेवण भरवू का?

### ९.१ बोलू या.

तुमच्या रुग्णालयात एक ऐंशी वर्षांच्या आजी दाखल झाल्या आहेत. त्या बाथरूममध्ये घसरून पडल्यामुळे त्यांचे खुब्याचे हाड मोडले आहे. त्यांना डायबेटीस आणि रक्तदाब आहे. तुम्ही त्यांच्याशी काय बोलाल?

..............................................................................................................................

..............................................................................................................................

..............................................................................................................................

..............................................................................................................................

..............................................................................................................................

## १० वाचू आणि ऐकू या.

'परिचारिका सेवा' ही नोकरी किंवा व्यवसाय नाही, तर ते सेवाव्रत आहे. अशा सेवेतून रुग्ण आणि त्यांच्या नातेवाइकांना मिळणाऱ्या समाधानाची तुलना कशाशीही होऊ शकत नाही. रुग्ण-नातेवाइकांशी सुसंवाद साधला, की त्यांचे दडपण हलके होते, दूर होते. सेवाभावातून करिअर कधी घडते, हे कळतसुद्धा नाही. सांगताहेत वेगवेगळ्या शासकीय रुग्णालयांतील परिचारिका.

**जयश्री पळशीकर (बीड जिल्हा रुग्णालय, नेत्र विभागाच्या मुख्य परिचारिका) :** बारा वर्षांपूर्वी 'आयसीयू' मध्ये सेवेत असताना एका प्राध्यापिकेचे अत्यवस्थ वडील दाखल झाले. डॉक्टरांचे प्रिस्क्रिप्शन नसताना अनुभवाच्या जोरावर त्यांच्यावर प्राथमिक उपचार केले. त्या वेळी माझ्यापेक्षा वयाने मोठ्या प्राध्यापिकेने माझे पाय धरले. अशा काही उदाहरणांवरून या सेवेचे महत्त्व लक्षात येते. रुग्णांसाठी उपचार महत्त्वाचे असतात, त्याहून शुश्रूषा अधिक महत्त्वाची असते. रुग्णांशी सुसंवाद साधला तर त्याला आजाराचा विसर पडू शकतो!

**एम. डब्लू. देशमुख (मेट्रन, जिल्हा रुग्णालय, हिंगोली) :** परिचारिकेचे काम हे रुग्ण व त्यांच्या नातेवाइकांचे दुःख, समस्या समजून घेण्याचे आहे. प्रत्येक रुग्णाची सेवा करण्यात मिळणारे समाधान वेगळेच असते. सेवा या अर्थाने परिचारिका म्हणून करिअर करणे महत्त्वाचे आहे. या क्षेत्रात काम करत असताना ती संवेदनशीलपणाने रुग्ण व नातेवाइकांचे दडपण कमी करण्याच्या कामास वाहून घेते. त्यातून परिचारिकेचे करिअर, कार्य आपोआप घडते.

गाडीला अपघात झाल्यामुळे नवरा हातपाय मोडून पडला होता आणि बायको आपल्या मैत्रिणीला फोनवरून सगळे वर्णन करून सांगत होती.

मैत्रीण : फार लागलंय का गं त्याला?

बायको : तीन चार हाडं मोडलीयेत. कपाळावर बारा टाके पडलेत आणि कुठे कुठे खरचटलं आहे. त्याचं काही नाही गं एवढं. पण सगळ्यात आनंदाची गोष्ट म्हणजे गाडीवर एकही ओरखडा पडलेला नाहीये...

| दृष्टिक्षेप | | |
|---|---|---|
| तो मजूर, ते-<br>labourer, -s | ती रुग्णवाहिका, त्या-<br>ambulance, -s | ते पुस्तक, ती पुस्तके, पुस्तकं<br>book, -s |
| तो अपघात, ते-<br>accident, -s | ती मामी, त्या माम्या<br>aunt, s | ते कुटुंब, ती कुटुंबे, कुटुंबं<br>family, -ies |
| तो मणका, ते मणके<br>spinal cord, -s | ती बाई, त्या बायका, बाया<br>lady, -ies | ते बेडपॅन<br>bedpan, -s |
| तो वार, ते-<br>weekday, s | ती कवटी, त्या कवट्या<br>skull, s | |
| तो शिक्षक, ते-<br>teacher, -s | ती नात, त्या नाती<br>granddaughter, -s | |
| तो निकाल, ते-<br>result, -s | ती चाचणी, त्या चाचण्या<br>test, -s | |
| तो रेडिओ, ते-<br>radio, -s | ती पत्नी, त्या-<br>wife, wives | |
| तो नातू, ते-<br>grandson, -s | | |
| तो मामा, ते-<br>uncle, -s | | |
| तो नवरा, ते नवरे<br>husband, -s | | |
| तो मित्र, ते-<br>friend, -s | | |
| तो फॉर्म, ते-<br>form, -s | | |
| तो आजोबा, ते-<br>grandfather, -s | | |
| तो केस, ते-<br>a strand of hair | | |

| क्रियापद<br>Verbs | प्रश्नशब्द<br>Question words |
|---|---|
| घसरणे – to slip | कसे – how |
| वाहणे – to flow | कधी – when |
| लागणे – to get hurt | कोणता – which |
| वळणे – to turn | का – why |
| ऐकणे – to listen | |
| पाहणे – to look | |
| वापरणे – to use | |
| विचारणे – to ask | |
| बोलणे – to talk | |

# १० स्वच्छता




## चला, शिकू या :

- स्वतःची आणि रुग्णालयातील स्वच्छता
- काम करून घेणे
- स्वच्छता आणि तिचे महत्त्व
- आधी, लगेच, पुन्हा, नंतर पण, आणि
- सूचना देणे




**१** शिक्षिका वरील वस्तूंपैकी जितक्या जमतील तितक्या गोष्टी वर्गात आणेल व विद्यार्थ्यांना एक एक करून विचारेल, की ही वस्तू तुम्ही वापरली आहे का? ही वस्तू कशासाठी वापरतात?

### १.१ योग्य जोड्या लावू या.

| | |
|---|---|
| १. (तो) साबण | क. खोली झाडणे |
| २. (ते) सॅनिटायझर | ख. दात घासणे |
| ३. (ते) डेटॉल | ग. हात धुणे |
| ४. (तो) टॉवेल | घ. फरशी पुसणे |
| ५. (तो) झाडू | च. हात निर्जंतुक करणे |
| ६. (तो) टूथब्रश | छ. हात / अंग पुसणे |
| ७. (ते) फडकं | ज. जखम निर्जंतुक करणे |

१. .............................. २. .............................. ३. .............................. ४. ..............................

५. .............................. ६. .............................. ७. ..............................

## १.२ गाळलेल्या जागा भरू या.

**(डेटॉल, झाडू, फडकं, दात, टॉवेल, सॅनिटायझर)**

१. शांतामावशी, जनरल वॉर्डमधली फरशी पुसायची आहे. ............................ घेऊन या.

२. तुम्हाला बरंच लागलंय. मी आधी ............................ ने जखम स्वच्छ करून घेते.

३. तुम्हाला चेहरा पुसायचा आहे का? ............................ हवा आहे का?

४. तुमच्या भावाचे डोळे आले आहेत. घरात सर्वांनी दरवेळी ............................ वापरा.

५. तुमचा ............................ घासायचा ब्रश कुठे आहे?

## १.३ तुम्ही रुग्णालयातील सफाईकामगारांना काही सूचना देत आहात. उत्तरासाठी योग्य सूचना लिहू या.

| प्रश्न | उत्तर |
|---|---|
| १. मावशी, केर काढायचाय. | हो, काढतेय. |
| २. ................................................................................ | हो, बाथरूम साफ करतेय. |
| ३. ................................................................................ | हो, कचरा पेटीत टाकतेय. |
| ४. ................................................................................ | हो, कपडे वाळत घालतेय. |
| ५. ................................................................................ | हो, फरशी पुसतेय. |
| ६. ................................................................................ | हो, खोली साफ करतेय. |

## १.४ वाक्य दुरुस्त करून लिहू या.

उदा॰ राजू, चादर **पुसलीस** का?

राजू, चादर धुतलीस का?

१. कामतमावशी, खोलीतला पंखा **धुतला** का?

................................................................................

२. सिस्टर रेखा, इंजेक्शन **धुतले** का?

................................................................................

३. मानेकाका, संडास फिनेल घालून **बदलले** का?

................................................................................

४. सरिताबाई, खोली नंबर ५ **वाळत घातलीत** का?

................................................................................

५. सिस्टर, बेडवरची चादर **टाकली** का?

................................................................................

६. कचरा कचरापेटीत **पुसला** का?

................................................................................

७. हात डेटॉलने **वाळत** घातले का?

................................................................................

८. मावशी, इथे फडकं **काढलं** का?

................................................................................

## १.५ वाचू या. तुमच्या रुग्णालयात हे रोज होत असल्यास ✓ आणि होत नसेल तर ✗ अशी खूण करा.

| आमच्या रुग्णालयात... | | ✓ | ✗ |
|---|---|---|---|
| १. | रोज झाडू मारतात. | | |
| २. | रोज फिनाईल घालून फरशी पुसतात. | | |
| ३. | सर्व जण हात स्वच्छ धुतात. | | |
| ४. | सर्व रुग्ण एकच हातरुमाल वापरतात. | | |
| ५. | सर्व परिचारिका स्वच्छ कपडे घालतात. | | |
| ६. | सर्व कचरा कचरापेटीत टाकला जातो. | | |
| ७. | ओला कचरा रिसायकल केला जातो. | | |
| ८. | रुग्णालयातील सर्व साहित्य / उपकरणे निर्जंतुक केली जातात. | | |
| ९. | बेडवरच्या चादरी रोज बदलल्या जातात. | | |
| १०. | धूम्रपान केले जात नाही. | | |
| ११. | संडास-बाथरूम रोज स्वच्छ केले जातात. | | |
| १२. | सर्व परिचारिका व डॉक्टर हॅण्डसॅनिटायझर वापरतात. | | |
| १३. | महिन्यातून एकदा सर्व खिडक्या-दारे स्वच्छ केली जातात. | | |

वरीलपैकी वाक्यांमध्ये अशी ✓ १० चिन्हे असतील तर तुमचे रुग्णालय “स्वच्छ रुग्णालय” आहे.

## २ वाचू आणि ऐकू या.

**सिस्टर लक्ष्मी आणि रुग्णालयात सफाई करणाऱ्या रतनमावशी या दोघींमधील संवाद वाचू या.**

सिस्टर लक्ष्मी : रतनमावशी, वॉर्ड नंबर ५ ची सफाई झाली का?

रतनमावशी : आत्ता लगेच करते.

सिस्टर लक्ष्मी : आधी वॉर्ड ५ ची सफाई करा, नंतर ६ ची फरशी पुसा.

रतनमावशी : ठीक आहे, सिस्टर. आधी ६ ची सफाई करते, नंतर ५ ची फरशी पुसते.

सिस्टर लक्ष्मी : अहो मावशी, पुन्हा एकदा सांगते. नीट ऐका. आधी ५ ची सफाई करा, नंतर ६ ची फरशी पुसा. लक्षात राहील का?

रतन मावशी : हो, राहील. आधी ५, नंतर ६.

### २.१ वरील संवादाप्रमाणे सफाईकामगाराबरोबरचा संवाद लिहू या. लिहिताना वर्गातील कोणाबरोबर तरी जोडी जमवून लिहू या.

१. बाथरूमची सफाई – संडासाची सफाई

२. रूम नं. १२ – रूम नं. १३

३. जनरल वॉर्ड – स्पेशालिटी वॉर्ड

### २.२ सांगा पाहू.

१. आधी एकोणतीस येतात की एकवीस?

..........................................................................................

२. मार्च महिना फेब्रुवारीनंतर येतो की आधी?

..........................................................................................

३. तुम्ही नाश्त्याच्या आधी चहा घेता की नाश्त्यानंतर?

..........................................................................................

४. लग्न आधी करतात की साखरपुडा?

..........................................................................................

५. प्रसूतीचे बिल कधी द्यायचे? प्रसूतीआधी? की प्रसूतीनंतर?

..........................................................................................

## २.३ 'लगेच' वापरून संवाद साधू या.

| उदा. रिपोर्ट लिहिला का? | लगेच लिहिते. |
|---|---|
| २. औषध दिले का? | लगेच ...................................................... |
| ३. डॉक्टरांशी बोलणे | ...................................................... |
| ४. बिल बनवणे | ...................................................... |
| ५. बाथरूम साफ करणे | ...................................................... |
| ६. फिनेल घालणे | ...................................................... |
| ७. फरशी पुसून घेणे | ...................................................... |
| ८. सलाईन लावणे | ...................................................... |
| ९. हात धुणे | ...................................................... |
| १०. बेडपॅन साफ करणे | ...................................................... |

## २.४ गाळलेल्या जागा भरू या. (आधी, नंतर, पुन्हा, लगेच x २)

नीता : लता, कुठे चालली आहेस?

लता : बालरोग विभागात चालले आहे. आज तिथे एक इमर्जन्सी केस आली आहे. डॉ. मेहतांनी (१) .................................. बोलावले आहे.

नीता : त्या लहान मुलाची केस ना? त्याला (२) .................................. मलेरिया झाला होता आणि (३) .................................. मेंदूज्वर झाला तो?

लता : बरोबर. तोच पेशंट (४) .................................. आला आहे.

नीता : ठीक आहे. त्याला (५) .................................. बरं वाटू दे.

## ३ पण....आणि...



पेन **आणि** वही



मी **आणि** माझा भाऊ




दोन **आणि** दोन चार



अन्न, वस्त्र **आणि** निवारा



मी बाहेर फिरायला गेलो, **पण** तेवढ्यात पाऊस आला.



ऑपरेशन झाले, **पण** पेशंट वाचला नाही.

**आणि (and)** हा दोन शब्दांना किंवा दोन वाक्यांना जोडतो.
**पण (but)** हा कारण देतो आणि दोन वाक्यांना जोडतो.

### ३.१ सोडवू या.

१. सहा आणि पाच किती होतात? ....................................

२. बारा आणि बावीस किती होतात? ....................................

३. ब्रेड आणि चटणी मिळून काय बनतं? ....................................

४. पाणी, साखर, लिंबू आणि मीठ एकत्र केलं की काय तयार होतं? ....................................

### ३.२ गाळलेल्या जागा भरू या. 'आणि' की 'पण'?

१. पेशंट जहागीरदार त्यांच्या खोलीत आहेत, ............................ त्यांचा केसपेपर तिथे नाहीये.

२. जनरल वॉर्डमध्ये पाणी ................................... कापूस नाहीत का?

३. त्यांचं ऑपरेशन आज आहे, ........................ अजून त्यांच्या नातेवाईकांची सही झाली नाहीये.

४. पेशंटचे नातेवाईक ............................... मित्र, तुम्ही सगळे बाहेर थांबा.

५. तुमचे दागिने ............................... पर्स इथे ठेवा.

६. लहान मुले ............................... पाळीव प्राणी यांना दवाखान्यात आणू नका.

७. डॉक्टर भेटतील, ............................... आधी हा फॉर्म भरून द्या.

### ३.३ वाक्ये बनवू या.

१. मी आणि माझी मैत्रीण रोज फिरायला जातो / एकत्र जेवतो / ...

२. आम्ही हॉटेलमध्ये गेलो, पण ...............................

३. नागपूर आणि औरंगाबाद ...............................

४. तपासणीसाठी रुग्ण आले होते, पण ...............................

५. तो बसमध्ये बसला आणि ...............................

## ४ रुग्णाचे स्पंजिंग. ऐकू या.

१. चला, तुमच्या आंघोळीची वेळ झाली.

२. पाणी फार गरम नाहीये ना?

३. पाणी फार थंड नाहीये ना?

४. पंखा बंद करतेय.

५. तुमचे कपडे काढायला मी मदत करतेय.

६. आता मी पुसून घेतेय.

७. एका कुशीवर वळा.

८. थंडी वाजतेय का?

९. तुमचे केस विंचरून देऊ का?

१०. बेड सोअर दुखतंय का?

११. तुमचे कपडे बदलतेय.

**४.१ रुग्णाचे स्पंजिंग करताना तुम्ही काय बोलाल? तक्त्यामध्ये वाक्याचा योग्य क्रमांक लिहू या.**

| स्पंजिंगच्या आधी | स्पंजिंगच्या वेळी | स्पंजिंगनंतर |
|---|---|---|
| ४. | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |

| रुग्णालयाची स्वच्छता |
|---|
| केर काढणे – to sweep |
| झाडू मारणे – to sweep |
| फरशी पुसणे – to clean / wipe / mop the floor |
| स्टरलाइझ (निर्जंतुक) करणे – to sterilize |
| वाळत घालणे – to let dry |
| साफ करणे – to clean |
| डेटॉलने धुणे – to clean with Dettol |
| फडके मारणे – to mop |
| स्वच्छ करणे – to clean |
| कचरा टाकणे – to put the garbage in the bin |
| फिनेल घालून स्वच्छ करणे – to mop with phenyl |
| चादर बदलणे – to change the bedcover |
| संडास / बाथरूम साफ करणे – to clean the toilet and bathroom |

## ५ विचारणे आणि सांगणे

**नर्स पेशंटला काय विचारेल किंवा सांगेल?**

| | |
|---|---|
| काय होतंय? | What's the matter? |
| त्रास होतोय का? | Is there any trouble? Is something bothering you? |
| पहिल्यापेक्षा बरं वाटतंय ना? | Are you better than earlier? |
| जखम दुखते आहे का? | Is your injury hurting? |
| टाके दुखतायत का? | Are the stitches hurting? |
| उलटी होईल असे वाटत आहे का? | Are you feeling like vomiting? |
| खूप त्रास होतो आहे का?<br>डॉक्टरांना बोलवू का? | Are you very much in pain?<br>Should I call the doctor? |
| गरम होतंय का? | Are you feeling hot? |
| थंडी वाजते आहे का? | Are you feeling cold? |
| घाम येतो आहे का? | Are you sweating? |
| ताप / सर्दी / खोकला आहे का? | Do you have fever, cold, cough? |
| पाणी हवं आहे का? | Do you need water? |
| तहान लागली आहे का? | Are you thirsty? |
| भूक लागली आहे का? | Are you hungry? |
| नाश्ता झाला का? | Did you have breakfast? |
| चांगली झोप झाली का? | Did you sleep well? |
| संडासचं भांडं हवंय का? | Do you need the latrine pot / bedpan? |
| लघवीचं भांडं हवंय का? | Do you need the urine pot? |
| खिडकी बंद करू का? | Should I shut the window? |
| खिडकी उघडू का? | Should I open the window? |
| दार बंद करू का? | Should I shut the door? |
| दार उघडू का? | Should I open the door? |

| | |
|---|---|
| काही लागत असेल तर लगेच मला बोलवा. | Call me immediately if you need something. |
| तुमचे रिपोर्ट कुठे आहेत? | Where are your reports? |
| तुम्हाला जनरल वॉर्डमध्ये न्यायचे आहे. | I want to take you to the general ward. |
| तुमची फाईल मला द्या. | Give your file to me. |
| तुमची फाईल बिलिंगला दिलीये. | I have given your file to the billing desk. |
| इथे सही करा. | Please sign here. |
| तुमचे कपडे काढून हा गाऊन घाला. | Please remove your clothes and put on this gown. |
| शांत राहा. ओरडू नका. | Be quiet. Do not shout. |
| बाहेरून ही औषधे मागवा. | Get these medicines from an outside medical shop. |
| तुमच्या नातेवाईकांना बोलवा. | Call your relatives. |
| इथे गर्दी करू नका. | Do not gather here. |
| ही खोली आज रिकामी करा. | Please empty this room today. |
| हळू / सावकाश ऊठा. | Get up slowly. |
| जरा उठता का? चादर बदलायची आहे. | Will you please get up? I want to change the bed sheet. |
| हात / पाय / डोकं अलगद उचला. | Lift your hand / leg / head slowly. |
| जास्त हालचाल करु नका. | Don’t move much. |
| रोज व्यायाम करा. | Exercise daily. |
| जोराने श्वास घेऊ नका. | Don’t breathe heavily. |
| श्वास घ्या. | Breathe in |
| श्वास सोडा. | Breathe out |
| हळू श्वास घ्या. | Breathe slowly |
| लांब श्वास घ्या. | Take a deep breath |

| | |
|---|---|
| औषध घेतलं का? | Did you take your medicine? |
| डोळे मिटून शांत पडून राहा. | Close your eyes and rest. |
| उजव्या कुशीवर वळा. | Please turn to your right side. |
| डाव्या कुशीवर वळा. | Please turn to your left side. |
| मूठ घट्ट आवळून धरा. | Clench your fist. |
| मान वर करा. | Lift your neck. |
| हात / पाय वर उचला. | Lift your hand / leg. |
| हात / पाय खाली ठेवा. | Keep your hand / leg down. |
| हात / पाय सरळ करा. | Straighten your hand / leg. |
| गुडघे वाकवा. | Bend your knees. |
| मांडी घालून बसा. | Fold your legs and sit. |
| मान / हात / पाय उजवीकडे वळवा. | Turn your neck / hand / leg to the right side. |
| मान / हात / पाय डावीकडे वळवा. | Turn your neck / hand / leg to the left side. |
| उठून बसा. | Get up and sit |
| ताठ बसा. | Sit straight. |
| आडवे झोपा. | Sleep on your side. |
| पालथे झोपा. | Sleep on your back. |
| पोटावर झोपा. | Sleep on your stomach. |
| डोळे बंद करा. | Shut your eyes. |
| डोळे घट्ट बंद करा. | Shut your eyes tight. |
| एक डोळा उघडा. | Open one eye. |
| डोळे उघडू नका. | Do not open your eyes. |
| डावा / उजवा डोळा बंद करा. | Close your left / right eye. |
| ‘आ’ करा. | Open your mouth. |

| | |
|---|---|
| मोठा 'आ' करा. | Open your mouth wide. |
| जीभ दाखवा. | Show your tongue. |
| गोळ्या घेताय ना? | Are you taking the tablets? |
| डॉक्टरांनी सांगितलेल्या गोळ्या वेळेवर घ्या. | Take the tablets prescribed by the doctor on time. |
| मलम लावून देऊ का? | Should I apply the ointment? |
| इंजेक्शन देणार आहे. घाबरू नका. अगदी बारीक टोचेल. | I am going to give you an injection. Don't be afraid. It will prick only a little bit. |
| सलाईन लावायचे आहे. | I want to put the saline. |
| रक्ताची बाटली लावायची आहे. | I want put the blood bottle. |
| तुमचे बी.पी. तपासायचे आहे. | I want to check your blood pressure. |
| थोड्या दिवसांसाठी पातळ पदार्थ खा. | Have a liquid diet for a few days. |
| तिखट पदार्थ खाऊ नका. | Do not eat spicy food. |
| गोड पदार्थ खाऊ नका. | Do not have sweets. |
| जास्त मीठ खाऊ नका. | Do not eat too much of salt. |

**पेशंट नर्सला काय विचारेल किंवा सांगेल?**

| | |
|---|---|
| मला बरं वाटत नाहीये. | I am not feeling well. |
| जरा घाबरल्यासारखं वाटतंय. | I am feeling a little afraid. |
| जरा अस्वस्थ वाटतंय. | I am feeling uneasy. |
| गरगरल्यासारखं होतंय. चक्कर येतेय. | I am feeling queasy. |
| उलटीसारखं वाटतंय. / मळमळतंय. | I feel like vomiting. |
| गिळता येत नाहीये. | I cannot swallow. |
| अन्न पचत नाहीये. | I have digestion problem. |
| गॅस झाले आहेत. | I have gas trouble. |
| मला रक्त जातंय. | I am bleeding. |

| | |
|---|---|
| अशक्त वाटतंय. | I am feeling weak. |
| डोकं जड झालंय. | My head is heavy. |
| पाठ / पोट / कंबर दुखतेय. | My back / stomach / waist is hurting. |
| हात / पाय आखडले आहेत. | The hands and legs have stiffened. |
| हातापायाला मुंग्या आल्या आहेत. | I have a tingling sensation in my hands and legs. |
| गालाला / हाताला / पायाला / पोटाला सूज आलीये. | My cheek / hand / leg / tummy is swollen. |
| जखम दुखते आहे. | My wound is hurting. |
| जखमेत पू झालाय. | There is pus in my wound. / My injury is infected. |
| झोप येत नाहीये. | I cannot sleep. |
| मला उठायला मदत करता का? | Will you help me get up? |
| मला वळता येत नाहीये. | I cannot turn. |
| संडासला लागली आहे. | I want to go to the toilet. |
| बाथरूमला जायचय. | I want to go to the bathroom. |
| मला बाथरूममध्ये न्याल का? | Will you take me to the bathroom? |
| लघवीला लागली आहे. | I want to pee. |
| संडासला होत नाहीये. | I cannot pass stool. |
| लघवीला होत नाहीये. | I cannot urinate. |
| मला औषध / गोळ्या देता का? | Will you give me the medicine / tablets? |
| ही गोळी कधी घ्यायची? | When should I take this tablet? |
| बेडवरची चादर खराब झाली आहे. | The bed-sheet is dirty. |
| इथला पडदा लावाल का? | Will you please slide the curtain over here? |
| डॉक्टरांना बोलावता का? | Will you please send for the doctor? |

| | |
|---|---|
| मला डॉक्टरांना भेटायचे आहे. ते कधी येतील? | I want to see the doctor. When will he / she come? |
| डॉक्टरांशी बोलायचे आहे. | I want to talk to the doctor. |
| रिपोर्ट कधी मिळतील? | When will I get the report? |
| ऑपरेशन आज आहे की उद्या? | Will the operation take place today or tomorrow? |
| डिस्चार्ज कधी मिळेल? | When will I get the discharge? |

## ५.१ आता योग्य उत्तर शोधा.

१. I cannot swallow.

अ) गिळता येत नाहीये.

ब) खाता येत नाहीये.

क) झोपता येत नाहीये.

२. Should I apply the ointment?

अ) इंजेक्शन देऊ का?

ब) मलम लावून देऊ का?

क) गोळी देऊ का?

३. I am feeling dizzy.

अ) मला चक्कर येतेय.

ब) मला जखम झालीये.

क) मला लघवीला जायचय.

४. Clench your fist.

अ) हात आवळून धरा.

ब) पाय आवळून धरा.

क) मूठ घट्ट आवळून धरा.

५. Breathe in.

अ) श्वास बाहेर सोडा.

ब) श्वास घेऊ नका.

क) श्वास घ्या.

### ५.२ योग्य जोड्या जुळवा.

| | |
|---|---|
| डोकं जड झालंय. | १. |
| इथे सही करा. | २. |
| अशक्त वाटतंय. | ३. |
| लघवीला होत नाहीये. | ४. |
| जास्त मीठ खाऊ नका. | ५. |
| झोप येत नाहीये. | ६. |
| टाके दुखतायत का? | ७. |
| मला बरं वाटत नाहीये. | ८. |
| भूक लागत नाहीये. | ९. |
| जखम दुखते आहे का? | १०. |

| | |
|---|---|
| क. | Are the stitches hurting? |
| ख. | I don’t feel hungry. |
| ग. | Is your injury hurting? |
| घ. | I am feeling weak. |
| ङ. | I cannot urinate. |
| च. | I am not feeling well. |
| छ. | I cannot sleep. |
| ज. | Please sign here. |
| झ. | Avoid too much of salt. |
| ञ. | My head is heavy. |

### चिंटू.



| दृष्टिक्षेप | | |
|---|---|---|
| तो टॉवेल, ते-<br>towel, -s | | ते सॅनिटायझर, ती-<br>sanitizer, -s |
| तो झाडू, ते-<br>broom, -s | | ते हॉटेल, ती हॉटेले / हॉटेलं<br>hotel, -s |
| तो टूथब्रश, ते-<br>toothbrush, -es | | ते वस्त्र, ती वस्त्रे / वस्त्रं<br>clothing |
| तो ब्रेड, ते-<br>bread, -s | | |
| तो प्राणी, ते-<br>animal, -s | | |
| तो पंखा, ते पंखे<br>fan, -s | | |
| तो महिना, ते महिने<br>month, -s | | |

| क्रियापद<br>Verbs |
|---|
| झाडणे – to dust |
| घासणे – to rub |
| धुणे – to wash |
| पुसणे – to wipe |
| वळणे – to turn |
| लावणे – to apply |
| घालणे – to wear |
| विंचरणे – to comb |
| बोलावणे – to call |
| वाटणे – to feel |
| झाडणे – to dust |

## पाठ १ – ओळख

१. बरोबर की चूक?

अ. डॉक्टर रुग्णालयात नवीन आहेत.

ब. वॉर्डबॉय डॉक्टरांना रुग्णालयाची ओळख करून देत नाहीत.



२. पहिल्या पेशंटला काय झाले आहे?

अ. फ्रॅक्चर

ब. जखम

क. पोटदुखी

३. दुसऱ्या पेशंटला कसला त्रास आहे?

अ. कानाचा

ब. डोळ्याचा / डोळ्यांचा

क. नाकाचा

४. तिसऱ्या पेशंटला कशाचा त्रास आहे?

अ. घशाचा

ब. लिव्हरचा

क. पोटाचा

५. योग्य पर्यायासमोर ✓ अशी खूण करू या.

रुग्णालयात डॉक्टर भरत पाटील यांची ओळख कोणाकोणाशी होते?

| | | | |
|---|---|---|---|
| वॉर्डबॉय | ☐ | नर्स | ☐ |
| रिसेप्शनिस्ट | ☐ | सफाईकामगार | ☐ |
| इतर डॉक्टर | ☐ | हॉस्पिटलचे डीन | ☐ |

**फिल्म : भरत आला परत**

## पाठ २

### १. योग्य पर्याय निवडा.

१. रुग्णालयाचे नाव काय आहे?

अ. सेवाधाम नर्सिंग होम

ब. गावसेवा नर्सिंग होम

क. पप्पी लेले नर्सिंग होम



२. पेशंट कोणत्या वॉर्डमध्ये आहे?

अ. लेडीज वॉर्ड

ब. जनरल वॉर्ड

क. जेन्ट्स वॉर्ड

३. नर्सला कोणती दोन कामं होती?

अ. बी.पी. तपासणे आणि लिपस्टिक लावणे

ब. इंजेक्शन देणे आणि बी.पी. तपासणे

क. औषध देणे आणि वर्तमानपत्र वाचणे

### २. चूक की बरोबर

१. पेशंटचे नाव लप्पी बेले आहे.

२. पेशंटला बाटली वॉर्डबॉयने दिली.

३. डॉक्टर आनंदित आहेत.

४. नर्स पुस्तक वाचतेय.

५. सर्व पेशंट शांतपणे झोपले आहेत.

६. डॉक्टर रागावले आहेत.

**फिल्म : डॉक्टर डॉक्टर**

## पाठ ३ – तुम्हाला काय होतंय?

**१. योग्य पर्याय निवडून या.**

१. पेशंटला काय होतंय?

अ. डोकं दुखतंय.

ब. पोट दुखतंय.

क. पाय दुखतोय.

२. डॉक्टर पेशंटला काय सांगतात?

अ. प्लास्टर घालावे लागेल.

ब. इंजेक्शन द्यावे लागेल.

क. ऑपरेशन करावे लागेल.

३. डॉक्टर आणि वॉर्डबॉय पेशंटला कुठे घेऊन जातात?

अ. रडिओलॉजिस्ट कडे

ब. ओ.टी.मध्ये

क. बाहेर

४. पेशंटला काय झालेलं असतं?

अ. काहीच नाही

ब. पाठदुखी

क. पाय फ्रॅक्चर

**२. बरोबर की चूक? ✓ किंवा ✗ खूण करून या.**

१. पेशंट खूप आजारी आहे.

२. डॉक्टर आणि वॉर्डबॉय खोटं ऑपरेशन करतात.

**फिल्म : भरत आला परत**

## पाठ ४ – एक दिवस सूचनांचा

**१. योग्य पर्याय निवडू या.**

१. आजोबांच्या हातात काय आहे?

अ. औषध

ब. रिपोर्ट

क. कागद

२. आजोबांना कोणाला भेटायचे आहे?

अ. सिस्टरला

ब. पेशंटला

क. डॉक्टरांना



३. सर्जन म्हणजे कोण?

अ. टेस्ट करणारा

ब. रिपोर्ट देणारा

क. ऑपरेशन करणारा

४. दवाखाना कधी बंद असतो?

अ. सोमवार – मंगळवार

ब. शुक्रवार – शनिवार

क. शनिवार – रविवार

**२. बरोबर की चूक? ✓ किंवा ✗ खूण करू या.**

१. दवाखान्यात आज फार गर्दी नाहीये.

२. रिसेपशनिस्ट आजोबांना आत जायची परवानगी देते.

३. आजोबा एका लहान मुलाबरोबर आले आहेत.

४. डॉक्टरांनी आजोबांना आज भेटायला बोलावले आहे.

५. डॉक्टर आजोबांना भेटतात.

**फिल्म : श्वास**

## पाठ ८ – तपासण्या आणि चाचण्या

**१. योग्य पर्याय निवडा.**

१. डॉक्टर पेशंटना कागदावर काय लिहून देतात?

अ. सर्जरीची वेळ  ब. गोळ्या आणि औषधे  क. भेटण्याची वेळ

२. डॉक्टर लहान मुलाचे काय तपासतात?

अ. डोळे  ब. कान  क. डोकं



३. लहान मुलाला काय त्रास होत असतो?

अ. लांबचं दिसायला त्रास होतो.

ब. कंबरदुखीचा त्रास होतो.

क. जवळचं दिसायला त्रास होतो.

४. डॉक्टर कोणत्या तपासण्या करायला सांगतात?

अ. रक्त तपासणी

ब. सोनोग्राफी

क. एम॰आर॰आय॰ आणि सी॰ टी॰ स्कॅन

५. डॉक्टर रिसेपशनिस्टकडून काय मागवतात?

अ. पाणी  ब. रजिस्टर  क. रिपोर्ट

**२. बरोबर की चूक? ✓ किंवा × खूण करू या.**

१. डॉक्टरांना आज खूप वेळ आहे.

२. परशुरामला लांबचं नीट दिसत नाही.

३. डॉक्टर परशुरामला मदत करायला तयार नाहीत.

४. डॉक्टर परशुरामचा कान तपासतो.

५. शाळा सातवीपर्यंत आहे.

**फिल्म : श्वास**

## पाठ ९ – अपघात आणि तातडीची सेवा

**क. कविता**

१. सुरुवातीच्या कवितेमध्ये रुग्णालयाशी संबंधित कोणते शब्द ऐकू येतात ते लिहू या.
औषध, ____________, __________, __________.

२. बरोबर की चूक? ✓ किंवा ✗ खूण करू या.
१. डॉ॰ मनीषा व डॉ॰ संदेश रुग्णांना तपासतायत.
२. डॉ॰ मनीषा व डॉ॰ संदेश नवरा बायको आहेत.

**फिल्म : भारत आला परत**

**ख. डॉक्टर, नर्स आणि वॉर्डबॉय**

१. बरोबर की चूक? ✓ किंवा ✗ खूण करू या.
१. डॉक्टर फोनवर डॉक्टर शर्मांशी बोलत आहेत.
२. सर्व पेशंटना मिळून वाढदिवस साजरा करायचाय.

२. योग्य पर्याय निवडा.
१. नर्स वॉर्डबॉयला फाईल कोणाला द्यायला सांगते?
अ. पेशंटला ब. नर्सला क. डॉक्टरांना

२. डॉक्टर कुठे जाणार आहेत?
अ. मुंबईला ब. पुण्याला क. नागपूरला

३. नर्सने वॉर्डबॉयला कोणते काम सांगितले?
अ. बेडवरच्या चादरी बदलायला सांगितले.
ब. पेशंटचं स्पॉंजिंग करायला सांगितले.
क. फरशी पुसायला सांगितले.




३. रिकाम्या जागा भरा.
१. पेशंट वाढदिवस .................................... करणार आहे.
२. गरुड साहेब .................................... परत येणार.

**फिल्म : डॉक्टर डॉक्टर**

# परीक्षा १२



- तोंडी परीक्षा : ५० गुण
- लेखी परीक्षा : १०० गुण

## तोंडी परीक्षा : ५० गुण

**१. वर्गात स्वतःची ओळख करून द्या.** **(१०)**

- नाव
- व्यवसाय
- वय
- राहायला कुठे?
- कुठल्या रुग्णालयात / कुठल्या विभागात काम करता?

**२. तुम्हाला एका रुग्णाची विचारपूस करायची आहे.**
**तुम्ही त्याच्याशी कशा प्रकारे संवाद साधाल?** **(१०)**

- उठायला सांगणे
- काही हवे आहे का ते विचारणे
- औषध घेतले का ते विचारणे ...

**३. खालील परिस्थितीमध्ये तुम्ही काय बोलाल?** **(१०)**

१. रुग्ण झोपला आहे. तुम्हाला त्याला औषध द्यायचे आहे.
२. रुग्णाचे ऑपरेशन आहे. त्याचे कपडे बदलायचे आहेत.
३. तुम्हाला रुग्णाचे रिपोर्टस् हवे आहेत.
४. तुम्हाला सुट्टी हवी आहे. मेट्रनशी बोला.
५. रुग्णाला उठायला त्रास होत आहे.

**(वाचणे)** **(१०)**

**१. खालील उतारा वाचा.**

डेंगीचे डास स्वच्छ पाण्यामध्ये राहतात. हे डास दिवसासुद्धा चावतात. डेंगीची लक्षणे म्हणजे जोरात थंडी वाजून ताप येणे, अंग दुखणे, अशक्तपणा वाटणे, थकवा येणे, भूक कमी होणे वगैरे. काही वेळा नाडीचे ठोके सुद्धा संथ होतात. अंगावर लाल पुरळ येतो. डेंगीवर उपाय म्हणजे घरात किंवा आजूबाजूच्या परिसरात पाणी साठू न देणे. लहान मुलांना अंग पूर्ण झाकले जाईल असे कपडे घालावेत. डेंगीच्या रुग्णांनी डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय कोणतेही उपाय करू नयेत. तापाकरता पॅरासिटामोल घ्यावे. आहार हलका ठेवावा.

(ऐकणे) (१०)

संवाद १

१. **संवाद ऐकून योग्य पर्याय निवडा.** (२)

१. ५ नंबर खोलीतील रुग्णाला काय झाले आहे?

अ. फ्रॅक्चर झाले आहे.

आ. ताप आला आहे.

इ. हात सुजला आहे.

२. चूक की बरोबर? योग्य ✓ किंवा ✗ खूण करा.

अ. सिस्टर अनिता कापूस शोधत आहेत.

आ. सिस्टर अनिताला थर्मामीटर सापडत नाहीये.

इ. ८ नंबर खोलीतील पेशंटला फ्रॅक्चर आहे.

संवाद २

१. **संवाद ऐकून योग्य पर्याय निवडा.** (२)

१. पेशंटला कोणत्या विभागात जायचे आहे?

अ. बालरोग विभाग

आ. ओपीडी

इ. रेडिओलोजी विभाग

२. चूक की बरोबर? योग्य ✓ किंवा ✗ खूण करा.

अ. रुग्णाला एक्स-रे काढायचा आहे.

आ. रेडिओलोजी विभाग सरळ जाऊन उजवीकडे आहे.

इ. रेडिओलोजी विभाग ओपीडी शेजारी आहे.

संवाद ३

१. **संवाद ऐकून योग्य पर्याय निवडा.** (२)

१. मिस्टर खान यांचे ऑपरेशन

अ. होणार आहे.

आ. झाले आहे.

इ. होणार नाहीये.

२. चूक की बरोबर? योग्य ✓ किंवा ✗ खूण करा.

अ. मिस्टर खान यांचे पायाचे ऑपरेशन झाले आहे.

आ. पांढरी गोळी रात्री घ्यायची आहे.

इ. मिस्टर खान आज फक्त सूप घेणार आहेत.

संवाद ४

**१. संवाद ऐकून योग्य पर्याय निवडा.** **(२)**

१. जय काय खाणार आहे?

अ. उपमा

आ. उपमा आणि एक बटाटावडा

इ. बटाटावडा

२. चूक की बरोबर? योग्य ✓ किंवा ✗ खूण करा.

अ. जयला खूप भूक लागली आहे.

आ. सारा सरबत पिणार आहे.

इ. सारा उपमा आणि बटाटावडा खाणार आहे.

संवाद ५

**१. संवाद ऐकून योग्य पर्याय निवडा.** **(२)**

१. सिस्टर मिस्टर काळ्यांना काय देते?

अ. घड्याळ

आ. अपॉइंटमेंट

इ. फाईल

२. चूक की बरोबर? योग्य ✓ किंवा ✗ खूण करा.

अ. डॉक्टर अंजली आज रुग्णालयात नाहीयेत.

आ. मिस्टर काळ्यांना फिझिओथेरपीस्टला भेटायचं आहे.

इ. आत्ता तीन वाजले आहेत.

## लेखी परीक्षा : १०० गुण

**वेळ : ३ तास**

**१. अ) चित्र पाहून योग्य जोड्या लावा.** **(५)**

| | |
|---|---|
|  | १. |
|  | २. |
|  | ३. |
|  | ४. |
|  | ५. |

| | |
|---|---|
| अ. | तुम्हाला खोकला झालाय. |
| ब. | तुम्हाला प्लास्टर घातलं आहे. |
| क. | परिचारिका तुम्हाला सलाईन लावते आहे. |
| ड. | परिचारिका तुम्हाला इंजेक्शन देते आहे. |
| ई | परिचारिका तुमचा ताप मोजते आहे. |

**१. ब) योग्य प्रश्नशब्द भरा. (कोणते, कुठे, कोणाला, कधी, कोण)** **(५)**

१. ताप ………………………… आला होता? काल की आज?

२. तुमच्याबरोबर ………………………… आले आहे?

३. तुम्हाला ………………………… दुखते आहे? पोटात उजवीकडे की डावीकडे?

४. दुपारी ………………………… औषध घ्यायचे आहे? बाटलीतले की पुडीतले?

५. तुम्ही ………………………… भेटायला आला आहात? आत्ता भेटायची वेळ संपली आहे.

**२. योग्य सर्वनामाखाली खूण करा.** **(१०)**

| | तो | आपण | त्या | ते | मी | ती | तुम्ही | तू |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| येतात | | | | | | | | |
| खाते | | | | | | | | |
| झोपा | | | | | | | | |
| काम करतो | | | | | | | | |
| रिपोर्ट लिहितात | | | | | | | | |
| वाचतेस | | | | | | | | |
| बोलतोस | | | | | | | | |
| बघते | | | | | | | | |
| तपासतो | | | | | | | | |
| शोधते | | | | | | | | |

**२. अ) सल्ला द्या. आज्ञार्थी वाक्ये लिहा.** **(५)**

१. मला झोप येत नाहीये. ………………………… (एका कुशीवर वळून झोपणे)

२. पोटात खूप दुखतंय. ………………………… (औषध घेणे)

३. मला रुग्णाला भेटायचंय. ………………………… (भेटायच्या वेळेत येणे)

४. प्लास्टर घातलं आहे. ………………………… (हात न हलवणे)

५. डिस्चार्ज हवा आहे. ………………………… (इथे सही करणे)

**३. ब) चूक की बरोबर. खूण करा.** **(५)**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | रोज फिनाईल घालून फरशी पुसा. | | |
| २. | वॉर्डमध्ये आवाज करा. | | |
| ३. | सर्व कचरा बाहेर टाका. | | |
| ४. | ओला कचरा रिसायकल करा. | | |
| ५. | धूम्रपान करू नका. | | |

**४. अ) खालील शब्द योग्य गटात लिहा.** **(६)**

(उश्या, दार, चादर, बाटल्या, सुई, गोळ्या)

| ए.व. | अ.व. |
|---|---|
| ............................................................ | ............................................................ |
| ............................................................ | ............................................................ |
| ............................................................ | ............................................................ |
| ............................................................ | ............................................................ |
| ............................................................ | ............................................................ |
| ............................................................ | ............................................................ |

**४. ब) किती वाजले आहेत, ते लिहा** **(४)**

| | | | |
|---|---|---|---|
|  |  |  |  |
| १. .................... | २. .................... | ३. .................... | ४. .................... |

५. **अ) रिकाम्या जागेत योग्य विशेषण लिहा.** **(६)**

(गरम, कडू, छान, थंड, अस्वच्छ, बरं)

१. औषध जरा ................................ आहे. पटकन गिळून टाका.

२. ................................ होतंय का? पंखा लावू का?

३. सुषमामावशी, रूम नं. १३ फारच ................................ झाली आहे. स्वच्छ करून घ्या.

४. ................................ पाण्यानं आंघोळ करा. तुम्हाला बरं वाटेल.

५. अ : तुमची तब्येत कशी आहे?

ब : आता ................................ आहे. काल ................................ वाटत नव्हतं.

५. **ब) योग्य शब्द शोधा.** **(४)**

१. रुग्णालयाच्या सफाईसाठी कोणते सामान लागत नाही?
- फरशी, फिनाईल, सुई,

२. रुग्णाच्या खोलीत काय नसते?
- पंखा, सलाईन, स्टेथोस्कोप

३. कोणते आजार संसर्गजन्य आहेत?
- कर्करोग, मधुमेह, डोळे येणे

४. यातील कोणता पदार्थ मधुमेहाच्या रुग्णाला चालेल?
- गोड शिरा, अळणी जेवण, बिन साखरेचा चहा

६. **अ) खालील उताऱ्यात रिकाम्या जागी 'होणे' क्रियापदाची भूतकाळातील योग्य रूपे लिहा.** **(५)**

अनिताची शिफ्ट सकाळी बरोबर साडेसातला सुरू (१) ................................. तिचा नाश्ता घरीच (२) ................................. हॉस्पिटलमध्ये आल्यावर तिने आधी प्रत्येक रुग्णाचे कार्ड तपासले आणि मगच तिची कामे चालू (३) ................................. त्यानंतर तिने रुग्णाचे व्हायटल्स (ताप, रक्तदाब, नाडी) तपासले. मग त्यांना स्पंजिंग केले, औषध दिले, काय खाल्ले-प्यायले ते विचारले. दुपारी तिचा कामाचा रिपोर्ट लिहून झाला. (४) ................................. तिचे जेवण इतर परिचारिकांबरोबर हॉस्पिटलमध्येच (५) ................................. चार वाजता तिचे काम संपले.

६. ब) रिकाम्या जागेत योग्य अवयव लिहा. (५)

१. माझ्या ................................ कळ येते आहे.
२. माझी ................................ ठणकते आहे.
३. माझ्या ................................ गडबड आहे.
४. मला ................................ दुखी आहे.
५. माझी ................................ लचकली आहे.

७. अ) तक्ता पूर्ण करा. (५)

| लक्षण | आजार | उपचार |
|---|---|---|
| १. | कुपोषण | योग्य आहार |
| २. दाताला ठणका लागणे | दातदुखी | |
| ३. घशात टोचल्यासारखे होणे | टॉन्सिल्स | |
| ४. डोळे जळजळणे | | डोळ्यात औषध |
| ५. | जंत | गोळी घेणे |

७. ब) क्रियापदाचे भूतकाळातील रूप लिहा. (५)

(नव्हते, नव्हता होती नव्हत्या, होता)

हेड नर्स : काल वॉर्ड नंबर चारमध्ये ड्यूटीला तू होतीस का?
सिस्टर सुनिता : नाही. मी (१) ................................ .
हेड नर्स : मग सिस्टर अनिता आणि सिस्टर रेखा होत्या का?
सिस्टर सुनिता : नाही. त्या (२) ................................ .
हेड नर्स : मग होतं कोण?
सिस्टर सुनिता : सिस्टर कामिनीची ड्यूटी (३) ................................ तिथे.
हेड नर्स : अच्छा. आणि ब्रदर रमेश काल आला (४) ................................ का?
सिस्टर सुनिता : नाही. तो काल आला (५) ................................. त्याची सुट्टी होती.

८. जोड्या लावा. (१०)

| | |
|---|---|
| हात वर उचला. | १. |
| पाय सरळ करा. | २. |
| डोळे घट्ट बंद करा. | ३. |
| उठून बसा. | ४. |
| ताठ बसा. | ५. |
| मोठा आ करा. | ६. |
| मान वर करा. | ७. |
| डावीकडे वळा. | ८. |
| जीभ दाखवा. | ९. |
| मान उजवीकडे वळवा. | १०. |

| | |
|---|---|
| क. | Shut your eyes tight. |
| ख. | Sit straight. |
| ग. | Lift your hand. |
| घ. | Lift your neck. |
| ङ. | Turn your neck to the right. |
| च. | Show your tongue. |
| छ. | Turn to the left side. |
| ज. | Open your mouth wide. |
| झ. | Get up and sit. |
| ञ. | Straighten your leg. |

९. अ) योग्य क्रियाविशेषण लिहा. (५)

(जरा, पटपट, दररोज, फार, सध्या)

१. किती हळू काम करतेस ! जरा ........................ काम कर.

२. बाबू, तू ........................ उशिरा येतोस. वेळेवर येत जा.

३. आम्ही ........................ मुंबईत राहत नाही, मुंबईबाहेर राहतो.

४. तुम्ही ........................ मोठ्या आवाजात बोलत आहात. जरा हळू बोला.

५. मिसळीत मीठ ........................ कमी आहे.

९. ब) खाली दिलेली वर्तमानकाळातील वाक्ये भविष्यकाळात लिहा. (५)

१. मी केर काढते.

२. मिस्टर शर्मा पुस्तक लिहितात.

३. आम्ही सगळ्या जणी वडापाव खातो.

४. सुरेश रोज अभ्यास करतो.

५. कमल पाण्याचे पिंप भरते.

१०. पेशंटला बरं वाटत नाही. पेशंट आणि नर्समधील संवाद लिहा. (१०)

*********

## धडा १

१.२ अभिवादन : नमस्कार / नमस्ते / हॅलो / हाय

प्रश्न : तुमचं नाव काय? उत्तर : माझं नाव रमा आहे. / मी रमा.

प्रश्न : तुम्ही कुठले / कुठल्या? उत्तर : मी मुंबईचा. / मी मुंबईची.

प्रश्न : तुंम्ही कोणता व्यवसाय करता? उत्तर : मी परिचारिका आहे.

निरोप घेणे : अच्छा / टाटा / उद्या भेटू / उद्या भेटू या

२.१ १. गोळी २. हात ३. कप ४. पाणी ५. बाटली

३.१ १. ते डोकं २. तो कान ३. तो पंजा ४. तो खांदा ५. तो हात ६. ते कोपर ७. ते पोट ८. तो गुडघा ९. ते पाऊल १०. ती मांडी ११. ते बोट

३.२ १. डोळे २. कान ३. बोट ४. दात ५. पाय ६. हात ७. नाक ८. तोंड

३.३ १. हात २. दात ३. कान ४. नाक ५. पोट

४.१ कशा, कुठल्या, कुठे, काय

४.२ १–ब, २–अ, ३–ड, ४–इ, ५–क

५.१

| व्यक्ती १ | व्यक्ती २ |
|---|---|
| नाव : ललिता शेट्टी<br>कुठल्या? : कोची<br>व्यवसाय : परिचारिका | नाव : छाया जाधव<br>कुठल्या? : ठाणे<br>व्यवसाय : परिचारिका |

| तुम्ही कुठ + ले? | तुम्ही कुठ + ल्या? |
|---|---|
| मी कल्याणचा. | मी कल्याणची. |

६.१ शून्य – ०, एक – १, दोन – २, तीन – ३, चार – ४, पाच – ५, सहा – ६, सात – ७, आठ – ८, नऊ –९, दहा – १०, अकरा – ११, बारा – १२

६.२ **क)** १, २, ३, ४, ५, ६, ७, ८, ९, १०, ११, १२, १३, १४, १५, १६, १७, १८, १९, २०.

| ७.१ | | ७.३ | | ७.५ |
|---|---|---|---|---|
| क् + क = अक्कल<br>त् + त = अत्तर<br>प् + प = चप्पल<br>व् + व = अव्वल<br>य् + य = अय्या<br>ल् + ल = सल्ला | | क् + य = वाक्य<br>क् + ट = डॉक्टर<br>स् + व = स्वर<br>स् + त = पुस्तक<br>ब् + द = शब्द<br>स् + ता = रस्ता | | त् + र = मित्र<br>ग् + र = ग्रह<br>र् + फ = बर्फ<br>र् + या = कैऱ्या<br>ट् + र = ट्रेन |

८. क – कान, क – कपाळ, प – पाय, द – दात

## धडा २

**१.** १. सिस्टर सुनिता बालरोग विभागात काम करते.
२. सिस्टर रोझी दंतचिकित्सा विभागात काम करते.

**१.१** १. नेत्रविभाग – च २. अस्थिरोगविभाग – झ ३. हृदयरोग विभाग – क
४. कान नाक घसा विभाग – घ ५. दंतचिकित्सा विभाग – ख
६. प्रसूतिविभाग – ज ७. बालरोग विभाग – छ ८. नेफ्रॉलॉजी विभाग – ग
तुम्ही कोणत्या विभागात काम करता? मी **नेत्रविभागात** /... विभागात काम करते.

**१.२** १. नाक २. डोकं ३. बोट ४. गुडघा ५. मनगट

**२.२** १. ४० – चाळीस २. २७ – सत्तावीस ३. १३ – तेरा ४. १४ – चौदा ५. ६ – सहा
६. १८ – अठरा ७. १० – दहा ८. ४८ – अठ्ठेचाळीस

**३.१** १. हा महिना सप्टेंबर आहे. पुढचा महिना कोणता आहे? **उत्तर : ऑक्टोबर**
मागचा महिना कोणता होता? **उत्तर : ऑगस्ट**
२. हा महिना कोणता आहे? पुढचा महिना जून आहे. **उत्तर : जुलै**
मागचा महिना कोणता होता? **उत्तर : मे**
३. हा महिना कोणता आहे? मागचा महिना ऑगस्ट होता. **उत्तर : सप्टेंबर**
पुढचा महिना कोणता आहे? **उत्तर : ऑक्टोबर**

**४.** १. ख २. क ३. च ४. छ ५. घ ६. ग

**५.** १. दार २. सुई ३. गाल ४. चाक ५. खोली

**६.१** १. अ : नमस्कार. बाह्यरुग्ण विभाग कुठे आहे?
ब : इथून सरळ जा. बाह्यरुग्ण विभाग **उजवीकडे** आहे.
२. अ : नमस्कार. दंतचिकित्सा विभाग कुठे आहे?
ब : इथून सरळ जा. दंतचिकित्सा विभाग **डावीकडे** आहे.
३. अ : हॅलो, वॉर्ड नंबर ४ कुठे आहे?
ब : वॉर्ड नंबर ४ **वर** आहे.
४. अ : डॉक्टर सिंन्हांची केबिन कुठे आहे?
ब : डॉक्टर सिंन्हांची केबिन **खाली** आहे.

**६.२** १. (क) नेत्रचित्त्सा विभागात जायला सांगा.
२. (अ) रक्तपेढीत जायला सांगा.
३. (ब) ट्रॉमा केअर युनिटमध्ये जायला सांगा.
४. (क) क्ष-किरण विभागात जायला सांगा.

**६.३** क–४, ख–७, ग–६, घ–३, च–२, छ–५, ज–१

**६.४** १. रक्त व लघवी तपासणी २. ऑंकॉलॉजी ३. शस्त्रक्रिया ४. ओपीडी ५. रक्तपेढी

**७.१** १. तुम्ही २. त्या ३. तुम्ही, आम्ही ४. मी ५. तू ६. तो ७. ते

७.३

| **ए॰व॰** | **अ॰व॰** | **आदरार्थी** |
|---|---|---|
| मी **आहे** | आम्ही / आपण **आहोत** | आम्ही / आपण **आहोत** |
| तू **आहेस** | तुम्ही / आपण **आहात** | तुम्ही / आपण **आहात** |
| तो **आहे** | ते **आहेत** | ते **आहेत** |
| ती **आहे** | त्या **आहेत** | त्या **आहेत** |
| ते **आहे** | ती **आहेत** | ती **आहेत** |

७.४

| **ए॰व॰** | **अ॰व॰** |
|---|---|
| मी **आहे.** | आम्ही / आपण **आहोत.** |
| तू **आहेस.** | तुम्ही / आपण **आहात.** |
| तुम्ही / आपण **आहात.** | तुम्ही / आपण **आहात.** |
| तो / ती **आहे.** | ते / त्या **आहेत.** |
| ते **आहे.** | ती **आहेत.** |

७.५ १. आहेत २. आहेत ३. आहात ४. आहेस ५. आहेत ६. आहेस, आहे

८. १. दहा वाजले २. सात वाजले ३. पाच वाजले ४. बारा वाजले ५. आठ वाजले ६. नऊ वाजले ७. तीन वाजले ८. अकरा वाजले

८.१

| | |
|---|---|
| **क.** | पावणेपाच वाजले आहेत.<br>पावणेपाच झाले आहेत.<br>पाचला पंधरा मिनिटे बाकी. |
| **ख.** | सव्वादोन वाजले आहेत.<br>सव्वादोन झाले आहेत.<br>दोन वाजून पंधरा मिनिटे झाली आहेत. |
| **ग.** | साडेपाच वाजले आहेत.<br>साडेपाच झाले आहेत.<br>पाच वाजून तीस मिनिटे झाली आहेत. |
| **घ.** | पावणेअकरा वाजले आहेत.<br>पावणेअकरा झाले आहेत.<br>अकराला पंधरा मिनिटे बाकी आहेत.<br>दहा वाजून पंचेचाळीस मिनिटे झाली आहेत. |

| | |
|---|---|
| च. | दीड वाजला आहे.<br>दीड झाला आहे.<br>एक वाजून तीस मिनिटे झाली आहेत. |
| छ. | सव्वादहा वाजले आहेत.<br>सव्वादहा झाले आहेत.<br>दहा वाजून पंधरा मिनिटे झाली आहेत. |
| ज. | अकरा पन्नास वाजले आहेत.<br>अकरा पन्नास झाले आहेत.<br>बाराला दहा मिनिटे बाकी आहेत. |
| झ. | साडेआठ वाजले आहेत.<br>साडेआठ झाले आहेत.<br>आठ वाजून तीस मिनिटे झाली आहेत. |
| ञ. | सहा अडतीस वाजले आहेत.<br>सहा अडतीस झाले आहेत.<br>सहा वाजून अडतीस मिनिटे झाली आहेत. |

८.२ १. माझी ड्यूटी ९ वाजता सुरू होते. /...
२. माझं काम ८ वाजता संपतं. /...
३. माझी जेवणाची सुट्टी १२:३० वाजता होते. /...

## धडा ३

१. क. पोट दुखणे ख. सर्दी होणे ग. ताप येणे घ. चक्कर येणे च. फ्रॅक्चर होणे छ. ऑपरेशन होणे ज. हाड मोडणे.

१.१ तुम्हाला काय होत आहे?
१. तुम्हाला चक्कर येतेय का?
२. तुम्हाला फ्रॅक्चर झालंय का?
३. तुमचं ऑपरेशन झालंय का?
४. तुमचं हाड मोडलंय का?
५. तुम्हाला सर्दी झालीय का?
६. तुमचं पोट दुखतंय का?

१.२ १–क २–इ ३–ड ४–ब ५–अ

२.

| खोली | पेशंटचे नाव | समस्या | काय करायचे आहे? |
|---|---|---|---|
| १ | मि॰ कदम | हात दुखतो आहे. | एक्स-रे काढायचा आहे. |

| | | | |
|---|---|---|---|
| २ | दातेआजी | रक्तदाब ९९/५९ आहे. | सि॰टी॰ स्कॅन करायचा आहे. |
| ३ | श्री॰ काळे | पायाला जखम झाली आहे. | नवीन ड्रेसिंग करायचे आहे. |

३. १. **रूम नंबर १**

नर्स : रूम नंबर १ मधल्या पेशंटच्या छातीत दुखतंय.

डॉक्टर : त्यांना मी तपासलंय. त्यांची अँन्जियोप्लास्टी करावी लागेल.

नर्स : ठीक आहे. मी त्यांना कळवते.

२. **रूम नंबर २**

नर्स : रूम नंबर २ मधल्या पेशंटला कळा येतायत.

डॉक्टर : त्यांना ओ॰टी॰मध्ये घेऊन जा आणि सीझरची तयारी करा.

नर्स : ठीक आहे.

३. **रूम नंबर ३**

नर्स : डॉक्टर वैद्य, रूम नंबर ३ मधल्या पेशंटला सायटिकाचा त्रास होतोय.

डॉक्टर वैद्य : बरं. त्यांना बाम लावून द्या. मी त्यांना तपासायला येतो.

नर्स : ओके, डॉक्टर.

४. अ) सकाळ : १ ब) दुपार : ४ क) संध्याकाळ : ३ ड) रात्र : २

४.१ १. सकाळी २. संध्याकाळी

४.३

| **क्रियापद** | **वर्तमानकाळ** |
|---|---|
| उठणे | उठते |
| करणे | करते |
| देणे | देते |
| झोपणे | झोपते |
| वाचणे | वाचते |
| घेणे | घेते |
| भरणे | भरते |
| पकडणे | पकडते |
| होणे | होते |

४.४ **क.** योगासन करते, **ख.** संध्याकाळी

५. २. तो खातो आहे. ३. ती रिपोर्ट लिहीत आहेत. ४. ते पेशंट तपासत आहेत.

५. ती इंजेक्शन देत आहे.

५.२

| क्रियापद | धातू | अपूर्ण वर्तमानकाळ |
|---|---|---|
| तू (करणे) | कर | करत + आहेस |
| मी (पळणे) | पळ | पळत + आहे |
| तू (खाणे) | खा | खात + आहेस |
| तुम्ही / आपण (जाणे) | जा | जात + आहात |
| ती (येणे) | ये | येत + आहे |
| ते (होणे) | हो | होत + आहे |
| ते (बोलणे) | बोल | बोलत + आहे |
| आम्ही / आपण (जेवणे) | जेव | जेवत + आहोत |

६.२ १. तुम्ही काय करताय? मी मशीन लावतेय.
२. तो काय करतोय? तो पाणी देतोय.
३. त्या काय करत आहेत? त्या सफाई करतायत.
४. ते काय करत आहेत? ते नियम सांगतायत.
५. ती काय करतेय? ती मास्क घालतेय.



६.४

| | | | |
|---|---|---|---|
| १. | हव + आहे = हवय | हवा = हेआ + हवाय | हवी + आहे = हवीय |
| २. | नको + आहे = नकोय | ३. होत + आहे = होतंय | ४. नाही + आहे = नाहीय |

६.५ १. मला कातर / कातरी हवीय.
२. मला सुई हवीय.
३. मला मास्क हवाय.
४. मला थर्मामीटर हवाय.
५. मला रिपोर्ट हवाय.

७.१ १. ६९ २. ९९ ३. ६४ ४. ९२ ५. ८९ ६. ७६.

८.२ १. ही खोली कशी आहे? ही खोली हवेशीर आहे.
२. ते औषध कसं आहे? ते औषध कडू आहे.
३. तो एप्रन कसा आहे? तो एप्रन मळकट आहे.
४. त्या बाटल्या कशा आहेत? त्या बाटल्या खराब आहेत.
५. ह्या गोळ्या कशा आहेत? ह्या गोळ्या रंगीबेरंगी आहेत.
६. ती खाट कशी आहे? ती खाट मोडकी आहे.

७. ते बाळ कसं आहे? ते बाळ छोटे आहे.
८. ते बूट कसे आहेत? ते बूट पांढरे आहेत.
९. ती मशीन्स कशी आहेत? ती मशीन्स मोडकी आहेत.
१०. हा केसपेपर कसा आहे? हा केसपेपर जुना आहे.

९.१ १. उष्माघात, विषमज्वर २. फ्लू, सर्दी ३. डेंगी, न्युमोनिया

१०.१ १. असतात २. असतात ३. असतो, असते ४. आहेत

११ १. ते तोंड २. ती अन्ननलिका ३. ते यकृत ४. ते मोठे आतडे ५. ते जठर ६. ते स्वादुपिंड ७. ते छोटे आतडे ८. ते गुदद्वार

१२.२

| | | बरोबर | चूक |
|---|---|---|---|
| १. | अनिताची शिफ्ट सकाळी पावणे सातला सुरू होते. | | ✓ |
| २. | तिचा नाश्ता हॉस्पिटलमध्ये होतो. | | ✓ |
| ३. | रुग्णाचे कार्ड तपासल्यानंतरच तिचे काम सुरू होते. | ✓ | |
| ४. | रुग्णाला त्रास होत असेल तर अनिता त्यांना मदत करते. | | ✓ |
| ५. | अनिताचे जेवण हॉस्पिटलमध्येच होते. | ✓ | |

१२.३ १. होतो २. होतात ३. होतो ४. होते ५. होतं.

## धडा ४

१.१

| अनौपचारिक | ev+ | ev- |
|---|---|---|
| २. दाखवणे | दाखव | दाखवू नकोस |
| ३. घेणे | घे | घेऊ नकोस |
| ४. करणे | कर | करू नकोस |
| ५. हलवणे | हलव | हलवू नकोस |

१.२

| औपचारिक | ev+ | ev- |
|---|---|---|
| २. उघडणे | उघडा | उघडू नका |
| ३. राहणे | राहा | राहू नका |
| ४. घालणे | घाला | घालू नका |
| ५. लावणे | लावा | लावू नका |

१.३

| | | तू | | तुम्ही | |
|---|---|---|---|---|---|
| **उघडणे** | उघडणे | उघड | उघडू नकोस | उघडा | उघडू नका |
| **सांगणे** | सांगणे | सांग | सांगू नकोस | सांगा | सांगू नका |
| **लावणे** | लावणे | लाव | लावू नकोस | लावा | लावू नका |
| **काढणे** | काढणे | काढ | काढू नकोस | काढा | काढू नका |
| **ठेवणे** | ठेवणे | ठेव | ठेवू नकोस | ठेवा | ठेवू नका |
| **उचलणे** | उचलणे | उचल | उचलू नकोस | उचला | उचलू नका |
| **येणे** | येणे | ये | येऊ नकोस | या | येऊ नका |

१.४ **तू** – तू हा ड्रेस घालू नकोस. तू खुर्चीत बस. (अनेक उत्तरे शक्य)
**तुम्ही** – तुम्ही इथे चपला काढा. तुम्ही माझ्या फोनला हात लावू नका. (अनेक उत्तरे शक्य)

१.५ **आज्ञार्थी क्रियापदे :** साफ कर, भरून ठेव, काढू नकोस, कचरा टाक, विसरू नकोस.

१.६
१. **तू** वॉर्डची सफाई कर. **तुम्ही** वॉर्डची सफाई करा.
२. **तू** फारशी पूस. **तुम्ही** फारशी पुसा.
३. **तू** संडास आणि बाथरूम स्वच्छ कर. **तुम्ही** संडास आणि बाथरूम स्वच्छ करा.
४. **तू** कचरा टाक. **तुम्ही** कचरा टाका.
५. **तू** सामान आवर. **तुम्ही** सामान आवरा.
६. **तू** खोली साफ कर. **तुम्ही** खोली साफ करा.
७. **तू** फडकं डेटॉलने धू. **तुम्ही** फडकं डेटॉलने धुवा.
८. **तू** फर्निचर फडकं मार. **तुम्ही** फर्निचर फडकं मारा.



२.२

| क्रियापद | | विनंतीरुप | |
|---|---|---|---|
| | तुम्ही | तू (पु.) | तू (स्त्री.) |
| **पाहणे** | पाहता का? | पाहशील का? | पाहशील का? |
| **देणे** | देता का? | देशील का? | देशील का? |
| **करणे** | करता का? | करशील का? | करशील का? |
| **आणणे** | आणाल का? | आणशील का? | आणशील का? |
| **सांगणे** | सांगाल का? | सांगशील का? | सांगशील का? |

**२.३** १. ठेवशील २. सांगशील ३. बसाल ४. बघाल ५. बोलावशील

**३.१** १. १०५ – एकशे पाच २. २२२ – दोनशे बावीस ३. ५३३ – पाचशे तेहतीस
४. ६७१ – सहाशे एकाहत्तर ५. १००१ – एकहजार एक ६. ३४६ – तीनशे सेहचाळीस
७. ९९६ – नऊशे शहाण्णव

**३.२** १. एकशे दहा – ११० २. तीनशे सतरा – ३१७ ३. सातशे सत्तर – ७७०
४. आठशे अठ्ठ्यात्तर – ८७८ ५. एकहजार नऊ – १००९ ६. नऊशे नव्व्याण्णव – ९९९
७. सहाशे एकावन्न – ६५१ ८. दोनशे वीस – २२० ९. चारशे पंचवीस – ४२५

**३.३** क–५, ख–१, ग–२, घ–३, च–४

**४.** १–ब, २–क, ३–अ, ४–ई, ५–ड

**४.१** १. ट्रेन भरभर जाते.
२. हत्ती सावकाश चालतो.
३. बैलगाडी हळूहळू जाते.
४. गोगलगाय हळूहळू चालते.
५. घोडा भरभर पाळतो.

**४.२**

| हे करा | हे करु नका |
|---|---|
| पेशंटची खोली स्वच्छ ठेवा. | फोनवर जोरजोरात बोलू नका. |
| रुग्णाला भेटायची वेळ पाळा. | इथे कचरा टाकू नका. |
| रुग्णालयात स्वच्छता राखा. | रुग्णाच्या खोलीत जास्त वेळ थांबू नका. |
| शांतता राखा. | रुग्णालयातील कर्मचाऱ्यांशी वाद घालू नका. |
| रुग्णालयाचे बिल वेळेत भरा. | रुग्णाला बाहेरील जेवण देऊ नका. |
| डॉक्टरांच्या सूचनांचे पालन करा. | अपॉईंटमेंट शिवाय डॉक्टरांना भेटू नका. |
| रांगेत उभे रहा. | रुग्णालयात धूम्रपान करू नका. |

**४.३** १. कृपया, मोठ्याने बोलू नका.
२. हळूहळू एका कुशीवर वळा.
३. भेटायची वेळ संपली आहे. आता निघा.
४. मूठ घट्ट बंद करा.
५. सावकाश कंबर वर उचला.

**४.४** १. कृपया, इथे गाडी लावू नका.
२. कृपया, रुग्णालयात शांतता राखा.

५.२

| विशेषण | पु.ए.व. | पु.अ.व. | स्त्री.ए.व. | स्त्री.अ.व. | नपुं.ए.व. | नपुं.अ.व. |
|---|---|---|---|---|---|---|
| निळा | निळा बॉल | निळे बॉल | निळी छत्री | निळ्या छत्र्या | निळे पुस्तक | निळे पुस्तके / पुस्तकं |
| पिवळा | पिवळा बॉल | पिवळे बॉल | पिवळी छत्री | पिवळ्या छत्र्या | पिवळे पुस्तक | पिवळे पुस्तके / पुस्तकं |
| पांढरा | पांढरा बॉल | पांढरे बॉल | पांढरी छत्री | पांढऱ्या छत्र्या | पांढरे पुस्तक | पांढरे पुस्तके / पुस्तकं |
| काळा | काळा बॉल | काळे बॉल | काळी छत्री | काळ्या छत्र्या | काळे पुस्तक | काळे पुस्तके / पुस्तकं |
| हिरवा | हिरवा बॉल | हिरवे बॉल | हिरवी छत्री | हिरव्या छत्र्या | हिरवे पुस्तक | हिरवे पुस्तके / पुस्तकं |

५.३ १. पांढऱ्या गोळ्या २. लाल-पिवळ्या गोळ्या

५.४ १. निळी गोळी सकाळी एकदा घ्यायची आहे.
२. जेवण झाल्यावर गुलाबी आणि पांढरी गोळी घ्यायची आहेत.
३. रात्री पांढरी गोळी घ्यायची आहे.



## धडा ५

१.१ १. अपघात २. ९८° ३. सकाळी सहा वाजता.

१.२ १. टेम्परेचर पाहणे आणि त्याची नोंद करणे.
२. पल्स पाहणे, त्याची नोंद करणे आणि ते डॉक्टरांना सांगणे.
३. पेशंटचे स्पंजिंग करणे.
४. ड्रेसिंग बदलणे.
५. पेशंटला औषध देणे.
६. पेशंटची लघवी तपासायला पाठवणे.

१.३ १–ब, २–ड, ३–ई, ४–क, ५–अ

१.४ १. कापूस २. सुई ३. बँडेजपट्टी ४. सलाईन ५. सॅनिटायझर ६. बेडपॅन
७. कातर / कातरी ८. थर्मामीटर ९. युरीन पॉट

१.५ १. पेशंटची इंजेक्शनची वेळ झाली आहे. सिरिंज कुठे आहे?
२. पेशंटला हाताला लागले आहे. मी त्याला बँडेजपट्टी बांधते.
३. तुमचे हात डेटॉलने स्वच्छ धुवा.
४. लघवीला जायचे आहे का? बेडपॅन हवाय का?
५. पेशंटचा ताप मोजायचा आहे. थर्मामीटर शोधते आहे.

६. डॉक्टर जाधव दंतवैद्य आहे. ते आता दंत विभागात आहे.
७. तुमचा रक्तदाब पहायचाय. हात पुढे करा.
८. त्याचा पाय फ्रॅक्चर झालेलं आहे. अस्थिरोग विभागात पाठवा.

२. १. **सिस्टर अंजलीचा चष्मा** नवीन आहे.
२. **रमाची छत्री** लाल रंगाची आहे.
३. **डॉक्टर सुरांणांचा मुलगा** दहा वर्षाचा आहे.
४. **साहिलचे सामान** कुठे आहे?
५. **रोहनचे घर** मोठे आहे.
६. **मामाची गाडी** जोरात धावते.

२.१

| | | बरोबर | चूक | बरोबर वाक्य |
|---|---|---|---|---|
| १. | प्रदीपची वॉर्ड डावीकडे आहे. | | ✓ | प्रदीपचा वॉर्ड डावीकडे आहे. |
| २. | सकीनाचा थर्मॉमीटर मिळत नाहीये. | | ✓ | सकीनाचं थर्मॉमीटर मिळत नाहीये. |
| ३. | भूषणच्या गाडीच्या चाव्या हिरव्या रंगाच्या आहेत. | ✓ | | |
| ४. | रामचे पुस्तक टेबलच्या खाली आहे. | ✓ | | |
| ५. | सुनिताचा फाईल इथे नाहीये. | | ✓ | सुनिताची फाईल इथे नाहीये. |

२.२ १. **ती** पिशवी **कोणाची** आहे? **ती** पिशवी **रंजनाची** आहे. /...
२. **तो** मोबाइल **कोणाचा** आहे? **तो** मोबाइल **सुरेशचा** आहे. /...
३. **ते** घड्याळ **कोणाचं** आहे? **ते** घड्याळ **जॉर्जचं** आहे. /...
४. **ते** घर **कोणाचं** आहे? **ते** घर अमित आणि **सुनीताचं** आहे. /...
५. **ती** साडी **कोणाची** आहे? **ती** साडी **सकीनाची** आहे. /...
६. **ते** घर **कोणाचं** आहे? **ते** पेन **अक्षय आणि राजचं** आहे. /...
७. **तो** स्टेथोस्कोप **कोणाचा** आहे? **तो** स्टेथोस्कोप **लेलेकाकांचा** आहे. /...
८. **तो** कॉम्प्युटर **कोणाचा** आहे? **तो** कॉम्प्युटर **अदितीचा** आहे. /...
९. **ते** पुस्तक **कोणाचं** आहे? **ते** पुस्तक **सई आणि मोहितचं** आहे. /...
१०. **ती** खोली **कोणाची** आहे? **ती** खोली **ललिताची** आहे. /...

२.४ १. बाळाची बाटली. २. प्रदीपची खुर्ची. ३. रझियाचे मोजे. ४. पेशंटच्या गोळ्या. ५. सिस्टर रोझीची फाईल.

२.७ षष्ठीची रूपे : माझे, माझा, माझ्या, त्यांची, माझी, माझ्या.

२.८ नमस्कार ! माझे नाव विभा. मी सांगलीची आहे. माझे गाव छोटे आहे. माझी आई बँकेत नोकरी करते आणि बाबा सरकारी नोकरी करतात. माझा छोटा भाऊ कॉलेज मध्ये शिकतो. मी सध्या मुंबई मध्ये राहते. माझ्या रूग्णालयाचे नाव गोडबोले रुग्णालय आहे. माझे काम रुग्णांना मदत करणे आहे. त्यांची माहिती लिहून घेणे, विचारपूस करणे, औषध देणे, स्वच्छता करणे, ही सुद्धा माझी कामे आहेत. या रुग्णालयात माझ्या अनेक मैत्रिणी आहेत. माझे सहाय्यकही अतिशय चांगले आहेत. माझे काम मला खूप आवडते. (अनेक उत्तरे शक्य)

३. १. त्याची २. त्यांचा ३. माझी ४. तुमची ५. तुझा ६. आपली ७. त्याचं ८. तिचं (अनेक उत्तरे शक्य)

३.१ १. त्याचं २. माझी ३. त्यांचा ४. तुझी ५. आमचे

४.१ १–क, २–ड, ३–अ, ४–ब

४.२ १. अचानक २. पटापट ३. अनेकदा ४. उगीच ५. अनेकदा ६. अचानक ७. पटापट ८. उगीच

५.

| | | कोण? | काय? |
|---|---|---|---|
| १. | रचना रोज एक सफरचंद **खाते.** | रचना | सफरचंद |
| २. | माझी आजी रोज रात्री गोष्ट **सांगते.** | आजी | गोष्ट |
| ३. | पेशंट पाणी **मागतोय.** | पेशंट | पाणी |
| ४. | सिस्टर आयव्ही ड्रीप **लावतेय.** | सिस्टर | आयव्ही ड्रीप |
| ५. | सकाळी नऊ वाजता आम्ही नाश्ता **करतो.** | आम्ही | नाश्ता |
